म.ग्रं.सं., संग्रह शाखा, ठाणे.
विषय : नाटक
सं.क्र. : २०२४३

म. ग्रं. सं. वाचनालय ठाणे

नाटक
20243

सावंत

IRBK-0120243
IRBK-0120243

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

त्रना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, न केल्यास घटना नियम क्र. ५ [८] नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा ी भरावी लागेल.

4 NOV 1997

9 APR 1984

5 MAY 1984

2 MAY 1984

AUG 198

20 MAR 1985

28 NOV 199

8 FEB 2

1 DEC 19

30 ... 200

21 MAY 20

8 APR 20

AUG 2003

3 DEC 20

( क्र. म

५०००-

वाचनालय
नाटक
२०२४३
८/३/८४

# छावा

# छावा

तीन अंकी
ऐतिहासिक नाटक

शिवाजी सावंत

IRBK-0120243
IRBK-0120243

कॉन्टिनेन्टल

प्रकाशक
अनंत अंबादास कुलकर्णी
कॉन्टिनेन्टल प्रकाशन
विजयानगर, पुणे ३०

मुद्रक
चिं. स. लाटकर
कल्पना मुद्रणालय
४६१/४ सदाशिव पेठ, टिळक रोड,
पुणे ४११०३०

मुखपृष्ठ
अनंत सालकर, पुणे

लेखकाचा पत्ता
विवेकानंद गृहरचना
फ्लॅट नं. ३
“ राधाकुंद ”
पर्वती पुलानजीक,
पुणे ३०

© सर्व हक्क सुरक्षित
नाटकाचे प्रयोग करण्यापूर्वी
लेखकाची संमती घेणे व
त्याबाबतच्या व्यावहारिक अटी
पूर्ण करणे आवश्यक आहे.

प्रकाशन क्रमांक : ९३८
प्रथमावृत्ती : १९८३

किंमत दहा रुपये

म. ग्रं. सं. ठाणे. वाचनालय शाखा.
वा. क्र. २०२४३ नों. दि. ८.३.९४
वि. नाटक

## प्रथमावृत्तीच्या निमित्ताने

'छावा' ही संभाजीराजांच्या अशरण जीवनसंघर्षावरील माझी दुसरी कादंबरी १९७९ मध्ये प्रकाशित झाली. तिच्यावर आधारित ही नाट्यकृती!

८२ च्या डिसेंबरात 'मृत्युंजया'च्या एका नाट्यप्रयोगप्रसंगी 'चंद्रलेखा' च्या मोहनराव वाघांनी मला हसत साकडे घातले ते 'छावा' नाटकाचे. सहज बैठकीत त्यांनी 'छावा' नाटकाच्या अनोख्या सुरुवातीची त्यांची कल्पना ऐकवली. "शिवाजीराव, छावा नाटकाचा प्रारंभच तुळापूर—वढू येथील संभाजीराजांची समाधीच दुभंगते व तिच्यातून प्रत्यक्ष संभाजीराजेच प्रकटतात आणि आपली जीवनकथा सांगतात अशी घ्यायची आपण!"

मी ती या कसबी व अभिजात कलावंताची कल्पना ऐकताना रोमांचून उठलो. सहज त्यांना तळहात पुढे करून न कळतचे वचन देऊन बसलो.

"अफलातून सुंदर कल्पना! मी नाटकाचा प्रयत्न करतो. यश जगदंबेवर सोपवू या आपण."

मुंबईहून परत आलो नि नाटकावर विचार करायला लागलो. चटकन ध्यानी आलं—'वाघांनी कौशल्यानं पंजा मारला आहे!' त्यांच्या प्रारंभानं सुरुवातीलाच संगीतात ज्याला 'सप्तक' म्हणतात तो टिपेचा सूर लागत होता. पुढे तीन अंक उभे करायचे तर आजवर नाट्यरसिकांना शंभूचरित्रावरील अनोखा असा 'अष्टकच' लावला पाहिजे!

नाटकाच्या संहितेची सिद्धता करायची नांदी झाली.

ठरल्याप्रमाणे प्रथम काही महिने वाघांचे सहकारी श्री. राम मुंगी पुण्याला आले. पण काही कारणाने त्यांचे व वाघांचे बिनसले. दरम्यान असेच अधांतरी काही दिवस गेले. नाटक या काळात माझ्या चिंतनातून दूर जाऊ लागले. मी तसे वाघांना पत्राने कळविले. त्यांनी लागलीच श्री. दिलीप कोल्हटकर या नव्या उमेदीच्या पण नाट्यतंत्राच्या खोलीची जाण असलेल्या तरुण माणसाला नियोजित, ठाम दिग्दर्शक म्हणून पुण्यास पाठविले

प्रथमभेटीतच झालेले दिलीपचे व माझे सवाद फार गमतीचे आहेत. त्याचं नवथर, पोरसवदा वय बघून मी सहज, अभावितपणे बोलून गेलो, " चि. दिलीप कोल्हटकर, ' छावा ' हे शिवधनुष्य उचलायचे आहे—प्रत्यक्ष ' शिवा 'च्या चिरंजीवाचे ! झेपणार काय हे ? " नक्कीच दिलीप पहिल्या भेटीत माझ्यावर नाराज झाला असणार. पण पठ्ठयानं ते दाखविलं मात्र नाही.

दुसऱ्या भेटीत चर्चेपूर्वी चहा घेताना हसतच पण कौशल्यानं म्हणाला, " कृपया मला ' चिरंजीव ' संबोधून ' नॉन प्लस ' करू नका. सर्व अटीतटीचे प्रयत्न करून मी तुमच्या नव्हे माझ्या ' छाव्याचे ' शिवधनुष्य पेलून दाखवीन. पाहाल—त्याला प्रत्यंचाही लावून दाखवीन ! विजया मेहतांचा शिष्य आहे मी. आणि नाटकाचा अधिकार सांगणाऱ्या ' कोल्हटकर ' घराण्याचा बच्चा आहे ! "

मला त्याचे हे अभिमानी शब्द विलक्षण आवडले. मग आमची गट्टीच जमली. माझं घर त्याला आपलंच वाटू लागलं. नाटकाच्या संहितेनं आता अरोध गती धरली. आमच्या व्यक्तिरेखांवर तासन तास उलट-सुलट चर्चा घडू लागल्या.

संहिता सिद्ध झाली. आता तिचे पालन-पोषण, संगोपन मोहन वाघ व दिलीप कोल्हटकर यांच्या हाती होते. वाघांनी आपल्या ' चंद्रलेखा 'च्या परंपरेला साजेशा भव्य, विषयानुकूल व अभिजात नेपथ्य व वेशभूषेत बारकाव्याने लक्ष घातले. त्यांनी विषयाला उठाव देण्यात कसली म्हणून कमतरता पडणार नाही याची काटेकोर दक्षता घेतली.

—दिलीप कोल्हटकरांनी नाटकाच्या कसून तालमी घेतल्या. एकाच पात्राकडून तीन तीन भिन्न वयोमानाचे, स्वभावाचे, बोलीभाषेचे रोल्स त्यांनी नमुनेदारपणे रंगमंचावर सादर केले. विख्यात पार्श्वसंगीत दिग्दर्शक अनंत अमेम्बल यांनी अचूक प्रसंगाची नस पकडून संगीत दिले. औरंगजेब व संभाजीराजे यांची तिसऱ्या अंकातील शास्ता व राजकैदी ही भेट त्यांच्या अचूक व लयदार संगीताने कमालीची उठावदार झाली आहे.

शेवटी नाटककार, निर्माता, दिग्दर्शक, संगीतकार यांनी संहितेसाठी कितीही कष्ट उपसलेले असले तरी ' सादरीकरण ' हा अंतिम व अत्यंत महत्त्वाचा टप्पा अवलंबून असतो तो कलावंतांच्या कसदार अभिनयावर. ते घसरले तर सारेच

पाण्यात जाणारे असते.

'छावा'त संभाजीराजे, येसूबाई व धाराऊ, सोयराबाई, औरंगजेब, हंबीरराव, गणोजी व अकबर, कवी कुलेश, अण्णाजी व प्रल्हादपंत, राया, बहिर्जी यांची कामे करणारे अनुक्रमे कलाकार बाळ धुरी, स्मिता तळवलकर, लता अरुण, जनार्दन सोहोनी, सिताराम खैरे, कृष्णकांत दळवी, चंद्रकांत काळे, सुरेश ताम्हाणे, जयंत जोशी, पांडुरंग घांग्रेकर, विक्रम बोरकर असे सर्व लहानथोर कलाकार कमालीच्या आस्थेने या नाटकासाठी झटले आहेत. विशेषतः रंगमंचावर पायांच्या हालचालीची विजवत चकाचक गती ठेवून श्री. बाळ धुरी यांनी उभे केलेले संभाजीराजे प्रथम प्रयोगात पाहताना मला लेखक म्हणून घेतलेल्या कष्टांचे सार्थक झाले—असेच वाटले. मी या सर्वांचाच तसेच व्यवस्थापक बाळ पेडणेकर, जयंत कोल्हटकर, कदम, शिंदे यांचा मनःपूर्वक आभारी आहे.

—हे पुस्तक सिद्ध करणारे माझे प्रकाशक घरचेच भैय्यासाहेब तथा अनंतराव कुलकर्णी, चि. अनिरुद्ध व रत्नाकर— तसेच मुद्रक, सजावटीचे चित्रकार या सर्वांचा मी मनस्वी आभारी आहे.

—शेवटी नाटक काय किंवा त्याचे पुस्तक काय ते एक 'टीम वर्क' असते. लेखक? तो असतो केवळ निमित्त-मात्र. तसाच मी!

शिवाजी सावंत

विवेकानंद गृहरचना
प्लॉट नं. ३ – 'राधाकुंद'
पर्वती, पुणे ३०.
दि. १८/ नोव्हेंबर/ ८३

शंभूचरित्रावरील या तीन अंकी, संगीत, ऐतिहासिक नाट्यकृतीचा प्रथम प्रयोग ठाणे येथे—'गडकरी रंगायतन' या नाट्यगृहात, १/मि/१९८३ रोजी 'महाराष्ट्र दिनाच्या' शिवकर सुमुहूर्तावर संपन्न झाला.

—त्याची श्रेयनामावली—

**निर्माते :**—मोहन वाघ—चंद्रलेखा नाट्यसंस्था.

व

मामा पेडणेकर—संतोषी थिएटर्स.

**प्रकाशन :** चंद्रलेखा व संतोषी थिएटर्स, दादर मुंबईद्वारा प्रकाशित.
**दिग्दर्शक :** दिलीप कोल्हटकर.
**पार्श्वसंगीत :** अनंत अमेम्बल.
**नेपथ्य, वेशभूषा व प्रकाशयोजना :** मोहन वाघ.

## कलाकार

**संभाजीराजे :** बाळ धुरी.
**येसूबाई व धाराऊ :** स्मिता तळवलकर.
**गणोजी व शाहजादा अकबर :** कृष्णकांत दळवी.
**सोयराबाई :** लता अरुण.
**औरंगजेब व धाकल्ू धनगर :** जनार्दन सोहोनी.
**हंबीरराव व रूहुल्लाखान :** सीताराम खैरे.
**कवी कुलेश :** चंद्रकांत काळे.
**प्रल्हादपंत व दुर्गादास राठोड :** जयंत जोशी.
**अण्णाजी दत्तो :** सुरेश ताम्हाणे.
**मुकर्रबखान :** मा. गंगाराम.
**बहिर्जी नाईक :** विक्रम वोरकर.
**इखलासखान व रायाजी :** पांडुरंग घांग्रेकर.
**निळोपंत :** चंद्रमोहन आगरकर.
**सेवक :** ताता नाईक.

— व्यवस्था —

बाळ पेडणेकर, जयंत कोल्हटकर, कदम आणि शिंदे.

( पडद्यामागेच गुरे वळताना जनावरांना देतात त्या रांगड्या गुराखी हरळ्या ऐकू येतात. अद्याप पडदा फुटलेला नाही—
येऽऽभिल्लाऽर – माज्या गुनवंते – अगं, तिकडं कुटं वळतियास दरडीकडं ? फिर माघार ऽ – हॉऽऽहाऽ – च्चऽकऽऽच्चऽऽक – हॉऽहॉऽऽ अगं, येऽचंदऽऽर – माज्या आये – किती रेंगाळतियास ? पॉट न्हाई भरलं व्हय तुजं अजून ? च्चऽऽल–च्चऽल की गुमान – हॉऽऽहॉऽऽ – येऽ हैबत्याऽऽ आरं कसा म्हनावा मुर्दाड तूऽऽ च्चल–च्चला–सम्दी–नीट च्चला वगू ! !

( क्षणकाल ‘ गुराखी पाव्याची ’ मधुर मावळी धून निनादते— )

( पडदा फुटतो )

( निळ्याशार आभाळाची पार्श्वभूमी घेत–सह्याद्रीच्या डोंगररांगा व डोंगरी किल्ल्याच्या वळणदार रेषा यांचं जागतं भान पाठीशी घेत रंगमंचाच्या मध्य-भागी एक ‘ प्रशस्त ’ समाधी दिसते. स्पॉटलाइट फक्त समाधीवर क्षणैक स्थिरावतो. रातकिड्यांची थरारक करकर वाजते.
एका विंगेतून मघा हाकाऱ्या देणारा ‘ जिवा ’ गुराखी प्रवेशतो.
वेष :—मुंडासं–छाटी धोतर, कांबळी, गवळकाठी असा होनाजी बाळासारखा. त्याच्या हातांच्या ओंजळीत अनंतफुलं व बेलपत्रं आहेत. समाधीकडे भारावून बघतो आहे तोच शंभूचरित्रावरील आक्षेपक असा प्रातिनिधिक ‘ वाटसरू ’ प्रवेशतो. जिवाला हटकतो— )

**वाटसरू :** काय जिवा ? अरे, डोंगरदरडीला गुरं वळायची सोडून इकडं कुठं वाट चुकलास ? ऑंऽ आणि हे काय अनंताची पांढरी फुलं आणि बेलाची पानं ? काय शंकराच्या दर्शनाला निघालास की काय ?

**जिवा :** जीऽ ? आमी गावरान गुराखी मान्सं–आमास्नी कुठलं आलंया देव-दरशान ! चाल्लोय आपला तुमी म्हनताय तसंच वाट चुकवून–आमच्या ह्या

राजाच्या समाधीकडं. ही बेल-फुलं त्या समाधीवर सोडाय–ईळभर तिथं ह्यो माथा टेकाय. ( ओंजळ कपाळाला भिडवतो. भारावून समाधीकडे बघू लागतो. )

**वाटसरू :** ( समाधी व जिवाकडं साशंकतेनं बघत ) समाधी ? राजाची समाधी ? जिवा, कुठल्या राजाची म्हणायची रे ही समाधी ?

**जिवा :** ( त्याला खालवर पुरता न्याहाळत ) पावनं, म्हराटी मुलकातलंच हाय न्हवं तुमी ? न्हाई–म्हंजी ही समाधी कुनाची ह्ये ठावं न्हाई म्हनतायसा–म्हून इच्यारलं ( तरीही वाटसरू नकारी मान डोलावतो–तसं– ) अवो पावनं, ही समाधी राजाची हाय राजाची—आपल्या संबूराजाची !

**वाटसरू :** ( समाधीजवळ जात–अधिक साशंकतेनं ) राजाची ? शंभूराजाची ? ?

**जिवा :** ( अभिमानानं ) व्हय ! राजाची–संबूराजाची. तुकाराम म्हाराजास्नी आमी लोक मायेनं ‘ तुकोबा ’ म्हन्तो का—ज्ञानमाऊलीला ‘ ज्ञानुबा ’ म्हन्तो–का–तसंच ह्येस्नी ‘ संबूराजं ’ म्हन्तो अवघा मावळ–मुलुक. खरंतर ह्ये “ संबाजी म्हाराऽजच ! ”

**वाटसरू :** ( आठ्या घालत ) ‘ शंभूराजं ’ म्हणजे आमच्या शककर्त्या शिवाजी महाराजांचा मुलगा की काय ?

**जिवा :** व्हय. त्येच ‘ संबाजी म्हाराज ! ’ ( ओंजळ पुन्हा कपाळाला भिडवितो )

**वाटसरू :** ( शहारे आणणारं कुत्सित–कुत्सित हसून ) जिवा–जिवा, अरे वेड्या कुठं क्षत्रिय कुलावंतस, सकळ गुणमंडित, गोब्राह्मण प्रतिपालक, ज्ञानवंत, वरदवंत, पुण्यवंत, हिंदुपद पादशहा, शककर्ते, प्रातःस्मरणीय श्रीमहन्महाराज छत्रपती शिवाजीराजे–आणि कुठं त्यांचा हा ‘ करंटा ’ मुलगा संभाजी ! ! ( सूचक झपत्कारी वाद्य )

म्हणेऽ ‘ संबूराऽजे ! ’ अशी कशी रे ठार वेडी माणसं तुम्ही ! चालला बेल-फुलं वाहायला समाधीवर ! हॅऽऽ ! जिवा, नीट कान आणि मन उघडं ठेवून ऐक. अरे, काय केलं नाही तुमच्या या संबूराजानं ? ’ ( क्षणैक शांतता. एकापेक्षा एक वरचढ आक्षेप शंभूचरित्रावर करू लागतो. प्रत्येक आक्षेपाबरोबर वाद्याची झपत्कारी लय वाढत जाते. जिवा एक एक कदम पिछे हटताना–घोंगडी, गवळकाठी, हातांतली बेलफुलं ह्या वस्तू क्रमशः खाली पडतात. )

* जिवा, ऐक ‘ युवराज’ असून एका सुवासिनीवर ‘गोदावरीवर’ अंगअत्याचार

केला यानं-तीर्थक्षेत्रासारख्या पवित्र रायगडावर-तेही प्रत्यक्ष पुण्यशील बाप हयात असताना ! ( वाद्य )

* आपल्या पित्याशी भांडून-तंडून हा अविचारी माथेफिरू निघून गेला थेट शत्रूच्या गोटात-पठाण दिलेरखानाच्या गनिमी-गोटात ! ( वाद्य )

* सिंहासनाच्या राक्षसी हव्यासानं, मराठी दौलतीचे इमानदार चाकर यानं सैतानी निर्दयपणानं हत्तीच्या पायी देऊन ठार केले-हिरोजी फर्जंदासारखे, चिटणीस बाळाजी आवजीसारखे ! ( वाद्य )

* जिवा, अरे मुजरा करून जिची पायधूळ मस्तकी घ्यावी त्या आपल्या सावत्र आईला-साक्षात् महाराणी सोयराबायींना या दारुड्या कुलघातक्यानं भिंतीत चिणून चिणून ठाऽर केलं ! ! ( तीव्र वाद्य )

( जिवा कानांवर हात ठेवतो. वाद्येंच वाद्ये वाजतात. )

जिवा, ऐक हा सूर्यापोटी शनैःश्वर होता ! करंटा होता !

जिवा, हा माथेफिरू, अविचारी होता !

व्यसनी होता-चारित्र्यशून्य होता !

जिवा, हा-हा-नादान-नादान होता ! ! !

( वाटसरू त्याच तडफेत निघून जातो. घायाळ-व्याकुळ जिवा रखडत्या पायांनी फरफटत समाधीजवळ येतो. तिच्या कठड्यावर डोके ठेवून-अंगभर गदगदतो, मान वर करून- )

न्हाई राजं—राजं असं का बोलत्यात हो आपलीच मान्सं ? राजा-माज्या देवा, तू न्हवतास न्हवं असा ? राजा, तुज्या रांगड्या, वीराच्या मरणाला साजून, शोभून दिसंल अशी समाधी न्हाई बांदता आली रं या मुलकाला ! हतं उटला ' ताजमहाल ', कुतुबमिनार-कोन-कुटल्या परक्यांच्या-बायकांच्या यादगीरी-साटनं ! ! पर माज्या राजा, तुजी-तुझ्या-ढालीगत काळजाच्या बाची कुटं हाय एवढी आबाळात घुसल्याली यादगीर ? काय तुजी कामगिरीच व्हती आभाळापरीस मोट्टी की आमीच पडलाव थिटं ! कुटलं चिरं आननार ही खत्रुड, कद्रू मानसं तुजी यादगीर उठवायला ? बोल-राजा-माझ्या देवा-एकडाव बोल — काहीतरी बोल.

क्षणैक दिवे जातात. अंधारातच जिवा विंगेत जातो. पुन्हा दिवे उजळतात. आस्ते आस्ते क्रमशः चढत जाणारे एखादे अवकाशयान उतरते आहे असे—

" घुँई ऽऽ घुँई ऽऽऽ " असे तंतुवाद्याचे स्वरमेळ ऐकू येतात. पाठोपाठ कान-ठळ्या बसविणारा विजेचा थरकापी कडकडाट उठतो. त्याबरोबरच रंगमंचावरही " शंभू-समाधी " दुभंगते ! ! त्या दुभंग समाधीतून झळझळीत राजवेषातले संभाजीराजे रंगमंचावर खडे ठाकतात ! कणीदार राजबोलीत कडाडतात—

**संभाजीराजे** : खबरदाऽर ! कोण म्हणतंय आम्ही नादान आहोत ? ( पार्श्वभूमी-वर–रणशिंगाची कातरी लय, घोड्यांचं खिंकाळणं, संबळ–तुणतुण्याची मिश्र लय घुमते. पाठोपाठ तीन घोष—एकमेकांत मिसळत ऐकू येताहेत—

" हर हर महादेव !
उदे गं अंबे–उदं !
जय जय रघुवीर समर्थ ! " )

**संभाजीराजे** : ( पूर्ण भान घेत ) खबरदार ! कोण म्हणतो आम्ही नादान आहोत ? आम्ही नादान नव्हतो—नाही. कान साऽफ साऽफ उघडे आणि आत्म्यांचे आत्मे निसबतीनं नीट जागते ठेवून ऐका—" आम्ही—आम्ही आमच्या आबासाहेबांचे सर्वात प्यारे काळजाचे सोनतुकडे होतो सोनतुकडे ? ( पॉज )

आम्ही ' करंटे ' नव्हतो—

मरणाच्या दाढेत ' हात ' घालून त्याचे ' दात ' मोजणाऱ्या भोसल्यांच्या कुळीची ' जात ' सांगणारे मराठी दौलतीचे—अभिजात—अभिषिक्त छत्रपती होतो आम्ही ! ( पॉज )

आम्ही माथेफिरू, अविचारी तर नव्हतोच नव्हतो ' बुधभूषणम् ' काव्य-ग्रंथाची, संस्कृतच्या देवबोलीत सूत्रबद्ध बांधणी करणारे–मस्त कवीमनाचे मराठी सरलष्कर होतो आम्ही !

नव्हतो–आम्ही चारित्र्यशून्य–व्यसनी तर मुळीच नव्हतो. मांडेखालचा ' चंद्रावत ' नावाचा घोडा ठेवावा तसा कैफ कब्जात ठेवणारे घोडाईत होतो आम्ही. साठसाठ हजारांचे लढाऊ मावळे पाठीशी घेत–बऱ्हाणपूर–बागलाण ते फिरंगाण असे बेलाग घोडे फेकणारे—पहिले सरलष्कर आणि शेवटचे धार-करी होतो आम्ही !

अरे, ' चारित्र्याला ' चारित्र्याचाच सही मतलब एकाच काव्यबोलात पटवून देणारे ' शिवपुत्र ' ' शंभूराजे ' आहोत आम्ही !

( क्षणैक शांतता. काळ जातो असे दाखविणारी वाद्यलय घुमते. )

( कमालीच्या शांत–धीर गंभीर आवाजात. )

*गेली अडीचशे वर्षं आमच्या चरित्राचा प्रवाह गंगेला न्यायचा तो 'गावगंगेला' नेला आहे तुम्ही! आमच्याच 'मराठी' म्हणविणाऱ्या दौलतीच्या रयतेनं! कुणास लावावा आम्ही बोल? कैसा?

* गेली अडीचशे वर्षं, पाट वळवून देताच शिवाराकडं जायचं, ते पाणी बांधावरच्या एरंडांना पोसत राहिलं आहे! आमच्या उमद्या–निडर हयातीची रीतसर वासलात लावण्यात आली आहे.

खबरदाऽर कोणी आम्हास नादान म्हणेल तर!

आम्ही नादान नव्हतो—नाही!

होय! दर्पणात साफ-उजळ दिसावा तसा या क्षणी आम्हास दिसतो आहे—मावळी गडा–गडांचा तो राजा–रायगड!! ( शिंगलय )

चित्र बघावे तसे आम्ही टक बघतो आहोत आमचे आबासाहेब! आमच्या थोरल्या आऊसाहेब! आमच्या राणीसरकार–श्रीसखी! आमची दूध–आऊ–धाराऊ! आमचे सरलष्कर-हंबीरमामा–छंदोगामात्य कवी–कुलेश–दूधभाऊ–राया–खबरगीरांचा नायक–बहिर्जी–धनगर धाकलू–आणि–आणि होय!

आपली तीन लाखांची मातब्बर, हत्यारबंद फौज आणि फितवेखोरीसाठी चौदा कोटींचा गडगंज खजिना पाठबळात घेऊन–आपले शाहजादे-पोते, परिसावर लढाऊ खान यांच्यासह मराठी दौलतीवर चालून आलेला–आमचा पहिला गनिम औरंगजेऽब!! ( शांतता. )

( आवाज बदल ) आमच्या प्राणप्रिय आबासाहेबांचा रायगडावर काळ झाला. त्या वख्ती आम्ही होतो पन्हाळ्यावर—त्यांच्याच आज्ञेनं आम्ही होतो चिंतेत—आजारी पडल्या आबासाहेबांच्या—आणि आबासाहेब गेल्याची संधी हेरून प्रत्यक्ष आमच्या मासाहेबांनी—दौलतीच्या महाराणींनीच रचू घातला एक काळीज तोड कटाव—कटाव घरचाच. पायाखालच्या इंगळासारखा! ( दिवे जातात. )

# अंक पहिला

## प्रवेश पहिला

( रायगडावरील सर्वोच्या राबत्याचा एक खासेमहाल. आतून दूरवर गडाच्या प्रशस्त व्यापारपेठेचे जोते दिसताहेत. त्यालगत गंगासागर तलाव—त्याला धरून उंच आंघाडी मनोरे—त्या पलीकडे जगदीश्वराचे कळस-संपन्न मंदिर–त्याला धरून इथून-तिथवर सह्यगिरीच्या रांगा—वर निळेशार आकाश दिसते आहे. शिवाजींमहाराजांचा नुकताच काळ ( म्हणजे अंत ) होऊन गेला आहे. त्याचे सूचन देणारे करूणगंभीर सूर काही क्षण वाजतात. रंगमंचावर सोयराबाई आहेत. मध्यम वयस्क, उंच, देखण्या, अंगावर फारसे अलंकार नाहीत. जवळच असलेल्या त्यांच्या कुलदेवी "वाघजाईच्या" मूर्तीजवळ जातात. एकटक मूर्तीकडे बघतात. क्षणातच सुरनीस अण्णाजी दत्तो व न्यायाधीश प्रल्हाद निराजी प्रवेशतात. अण्णाजी मध्यम वयाचे. प्रल्हादपंत त्यांच्याहून थोडे लहान. दोघेही मुजरे करून उभे राहातात. सोयराबाईंचे प्रथम त्यांच्याकडे लक्षच नाही. ते जाताच मात्र ओठाशी पदर नेत त्या हमसतात—तशी )

**अण्णाजी :** शोक आवरता घ्यावा महाराणींनी. होष्यमाण टाळू म्हटल्यानं नाही टाळता येत कुणालाही. कुलदेवता वाघजाईच्या कृपेकरून सारं होईल टाके-ठीक लौकरच. त्यासाठी समयास धीर मात्र धरायला हवा.

**सोयरा :** ( सावरत ) कसा धरावा धीर अण्णाजी ? स्वारींचा हा असा अचानक काळ झाला. दिल्लीतख्ताचा मातब्बर गनिम तर डोळ्यांत तेल घालून दौलतीच्या पाठमागावर. तो बळजोर फौजबंदीनं केव्हा दख्खन जवळ करील

काऽही भरोसा नाही. ( दीर्घ उसासा सोडतो )

**अण्णाजी** : कैलासवासी स्वामी तर आम्हाला या न्यायाधीश प्रल्हादपंतांना हमेशा म्हणत आले, " औरंगच्या चालीचे लहानथोर साऱ्यांनीच जागते भान ठेवले पाहिजे.

**प्रल्हाद** : अक्कलहुशारीच्या एकमेळाने त्यास तोंड दिले पाहिजे.

**सोयरा** : या समयी आमचे रामराजे हे असे पोर उमरीचे ! थोरले ? हँ ऽ— त्यांचं काय विचारावं ? ते तर आम्हास ' तुम्हा सर्वांच्या ' रामराजास गनिमाला नसेल एवढे पाण्यात बघतात. ( चाचपण्यासाठी ) ना ऽ ही. सुरनिस अण्णाजीपंत, न्यायाधीश –प्रल्हादपंत– आमचा निवाडा आता ठरला–अगदी पक्का ठरला !

**अण्णाजी** :<br>**प्रल्हाद** : } ( एकदम ) कोण वजेचा ? कोण मतलबाचा ? कशा बाबतचा ?

**अण्णाजी** : म्हणजे–रामराजांसंबंधी की–की–युवराजांसंबंधी ?

**सोयरा** : ( बेमालूम हूल देत ) नाऽही ! खुद्द आमच्यासंबंधी !

**अण्णाजी** : आपल्या संबंधी ?

**प्रल्हाद** : नाही–म्हणजे बाबत नीट ध्यानी नाही आली आमच्या !

**सोयरा** : होय–आमच्या संबंधीच पक्का ठरला आमचा निवाडा–रामराजांचे आता मंचकारोहण झालेच आहे. त्यांना दौलतीचे " बाळवारस " म्हणून तुम्हा जाणत्या व कदीम अष्टप्रधानांच्या हवाली सुपूर्द करून आम्ही–आम्ही—

**अण्णाजी** : ( घाईनं ) भलताच काही निर्णय घेऊ नये महाराणींनी. आपण ' अग्निकाष्ठाचा ' निर्णय घेतला तर बाळरामराजांना—

**सोयरा** : ( त्यांना हातानं थोपवीत ) आम्ही–आम्ही आमच्या माहेरास–तळबीडास कूच होणार !

( अण्णाजी सुस्कार सोडतात. तरीही ते व प्रल्हाद निराजी गडबडले आहेत. )

**अण्णाजी** : (अदबीनं) क्षमा असावी. आपण दौलतीच्या " अभिषिक्त महाराणी" आहात.

**प्रल्हाद** : अष्टप्रधानांसह अवघ्या रयतेच्या प्रत्यक्ष " मातुश्री " आहात आपण.

**अण्णाजी :** दौलतीचा हा बगलाणपासून करवारपर्यंतचा बार्दाना–कै. स्वामींच्या जाण्यानं आज पोरका झाला आहे. या वक्ती तो परता ठेवून आपणच पारखं व्हायचं म्हटलं तर–तर तो सावरणार तरी कोण ? खरं तर—

**सोयरा :** साफ बोला अण्णाजी–आणि ' खरं ' तेच बोला.

**अण्णाजी :** जी. थोरल्या मॉसाहेबांनी दौलतीची उभारणी पोर उमरीच्या महाराजांना हाताशी धरूनच नाही का केली ? या प्रसंगी महाराणींनीही तशीच कर्तुक करण्याची बाळगावी उमेद !

**प्रल्हाद :** महाराणींच इथं नाहीत म्हटलं तर आम्ही प्रधानमंडळींनी आज्ञा घ्याव्या त्या कुणाच्या ? या समयी आपण फक्त आज्ञा करायच्या आहेत– ' महाराज्ञी ' म्हणून.

**अण्णाजी :** आम्ही कादिमांनी त्या प्राणबाजीनं झेलायच्या आहेत. या बाक्या प्रसंगी रायगड सोडण्याचा मनसुबा तर महाराणींनी चुकूनही मनी आणू नये !

**प्रल्हाद :** ( चाचरत ) रामराजांचं ' मंचकारोहण ' झालं हे एका परीनं ठीकच झालं–पण–पण कै. स्वामींचा असा थोडासा घाईनं झाल्यासारखा–भडाग्नीनं अंत्यसंस्कार नको होता व्हायला. रामराजे गडावर होते तरीही साबाजीराजे भोसल्यांच्या हस्ते तो होण्यात काही कसर राहिली असे नाही ·वाटत तुम्हास सुरनीस ?

**अण्णाजी :** ही बाबत कुणाच्याही ध्यानी नव्हती असं म्हणायचं आहे काय तुम्हाला न्यायाधीश ? पण करणार काय ? रामराजे पडले बाळ-उमरीचे !

**सोयरा :** शिवाय पुरते भेदरलेले. आम्हीच ठेवलं त्यांना दूर त्या सर्वांपासून !

**अण्णाजी :** आणि असेल त्या सामग्रीनिशी–सुचेल त्या वकुबाने समयास तोंड दिले पाहिजे अशी प्रत्यक्ष महाराजांचीच सांग–शिकवण नव्हती काय ?

**प्रल्हाद :** ( चक्रावून ) काय म्हणायचं आहे काय नेमकं तुम्हास सुरनीस ?

**अण्णाजी :** नाही–म्हणजे–किल्ले पन्हाळ्याच्या जौहरच्या घेरातून सुटका, शास्ताखानाच्या गोटावर हमला, आग्र्याच्या कैद-कोठीतून बेमालूम धावणी– प्रत्येक बाक्या प्रसंगी कशासाठीही न खोळंबता महाराज असेच नाही का वागले !! स्वामींचा काळ हा–हा–आम्हांसमोर गुदरलेला असाच बाका प्रसंग होता प्रल्हादपंत !

**सोयरा :** ( खोचक ) शिवाय राजघराण्याचा पूर्वापार चालत आलेला एक रिवाज 'न्यायाधीशांनाही' माहीत नाही – असं आम्ही म्हणावं तरी कसं ?
**प्रल्हाद :** ( वरमून ) क्षमा असावी ! कोणता रिवाज ? आम्ही नाही समजलो.
**अण्णाजी :** ( मध्येच ) 'वारस' म्हणून रक्ताच्या नात्याचं कुणीतरी तात्पुरत्या विधीनं राजसिंहासनावर बसावंच लागतं. राजदेह त्याखेरीज राजवास्तूबाहेर नाही काढता येत न्यायाधीश. त्यासाठीच तर रामराजांना तात्पुरतं सिंहासनावर बसवून – मगच मंचकारोहण – विधी करण्यात आला आहे त्यांचा.
**प्रल्हाद :** तो विधीच आपण अष्टप्रधानांनी पूर्ण एकमेळानं करायला हवा होता. 'न्यायाधीश' म्हणून ही बाब आम्हास राहून-राहून गैरवाका वाटते आहे. मनी खटकते आहे.
**सोयरा :** 'न्यायाधीश' म्हणून तुम्हास तसं वाटणं रास्त आहे प्रल्हादपंत. अष्टप्रधानांतील त्या वेळी गडावर होतेच कोण ? आणि आता जवळजवळ साऱ्यांनीच संमती दिली आहे. रामराजांच्या मंचकारोहणास. राहता राहिला सवाल एकल्या सरलष्करांचा—
**अण्णाजी :** आणि सरलष्कर हंबीरराव तर महाराणींचे सख्खे बंधू आहेत— तेही धाकले ! रामराजांचे ते 'मामासाहेब' आहेत. 'भाच्यांच्या' तर्फेनं 'मामांच्या' मनाचा कौल काय पडेल हे सांगायला ज्योतिषाची गरज आहे का प्रल्हादपंत ? झाल्या रास्त निर्णयाबाबत मनाचा शक साऽफ धुऊन काढावा तुम्ही न्यायाधीश.
**प्रल्हाद :** तरीही–तरीही युवराज अद्याप इथे रायगडी आले नाहीत ही शंकेची टिटवी उरतेच ! कै. स्वामींनी आपल्या मनी दौलतीचा अंतिम सिलसिला नेमका काय योजला होता हा सवाल उरतोच ! युवराज या संबंधानं उद्या—
**सोयरा :** ( झटकून टाकत ) युवराज–युवराज–युवराज ! काय नि कसली घेतली आहे त्यांची एवढी धास्त तुम्ही तेच नाही उमगत. न्यायाधीश म्हणून बारीक सारीक दाखले खोदून काढताना विसरता आहात तुम्ही की स्वारींच्या या सिंहासनावर 'छत्रपती' म्हणून आणि तेही युवराज ! कोण आणि कसे मानेल हे ? रयत ? धारकरी ? की जागोजागचे हवालदार–सुभेदार ? न्यायाधीश, हे होणार नाही—होणे नाही ! आम्ही रोकडेच विचारतो—बाकुब काय त्यांचा

' छत्रपती ' होण्याचा ?

**अण्णाजी :** ( सूर मिसळत ) जेव्हा ते दिलेर–पठाणाच्या गोटात गेले तेव्हाच कलुषित झालीत तमाम रयतेची मनं त्यांच्या बाबीनं. थोर मनानं कै. स्वामींनी त्यांना आपलं मानून फेर पदरी घेतलं हेच फार मोठं झालं. घडतीच अशी आगळिक मोगलाईत कुठल्याही शाहजाद्याकडून तर !

**सोयरा :** केली असती काय गय आपल्या फितवेखोर शाहजाद्याची औरंगशहानं ? म्हणूनच आम्ही तुम्हालाच म्हणतो मायेच्या नात्यापोटी आमच्या स्वारींना जे जमलं नाही ते—ते आता तुम्हीच करून दावलं पाहिजे—' न्यायाधीश ' म्हणून ! !

**प्रल्हाद :** ( पुरतं गडबडून ) म्ह...म्हणजे आम्ही...आम्ही नेमकं काय करावं – अशी—

**अण्णाजी :** ( खोचक हसून ) तुम्हास ते कधीच शक्य नाही प्रल्हादपंत ! तुम्ही फक्त एक करावं—

**सोयरा :** जे होईल ते पहावं ! प्रसंगी या अण्णाजींच्या मसलतीत धैर्यानं पडेल ती जोड – साथ द्यावी – ना कचरता – वा डायाडौल ना होता !

**अण्णाजी :** पंत, तुम्ही न्यायाधीश आहात. ' न्याय ' देताना तुम्ही कधीच भूल पडू देऊ नये की सांगताहेत त्या " महाराणी " आहेत !

**प्रल्हाद :** ( न्यायाधीशांचे भान घेत ) अण्णाजी, जशा महाराणी–' महाराणी ' आहेत–तसे युवराज––" युवराज " आहेत–औरस आणि अभिषिक्त ! धर्मशास्त्राप्रमाणं आणि कुलाचाराप्रमाणं थोरल्या स्वामींच्या पश्चात तेच ठरतात मराठी दौलतीचे वारस ! ' न्यायाधीश ' म्हणून आम्ही काय–कुणीही झालं तरी हे विसरणार कसं ?

**सोयरा :** ( पूर्ण शांतपणे – निर्धारी घेर टाकत ) तुमच्याकडून हीच होती आमची उमेद पंत ! तुम्हीच सांगावं न्यायाधीश– प्रल्हादपंत–' कोणता कुलाचार पाळला आजवर– ' तुमच्या ' या " अभिषिक्त युवराजांनी ? " या अण्णाजींच्या वाड्यावर माहेरपणासाठी आलेल्या सुवासिनीला–बिचाऱ्या गोदावरीला हस्तकांकरवी लिंगाण्याच्या कड्यावरून लोटून देण्याचा ? पुरावाच समूळ नष्ट करण्याचा ?

**अण्णाजी :** आमच्या जागी क्षणभरच तुम्ही आहात असे माना–आणि सांगा

न्यायाधीश.

**प्रल्हाद :** क्षमा असावी महाराणी– तुम्हीही नीट समजून घ्यावं अण्णाजी—गोदावरीच्या कथल्यात युवराज दोषी आहेत असे आजही आम्हास वाटत नाही ! ठामपणे वाटत नाही ! प्रत्यक्ष थोरले स्वामी हयात असताना एका स्त्रीला कड्यावरून लोटून देण्याची शामतच झाली नसती युवराजांचीच काय—कुणाचीही ! आपल्या अखत्यारीत युवराजांनी तिला–राजरोस–दिवसाढवळ्या 'कैदेत' टाकलं होतं–लिंगाण्यावर !

**अण्णाजी :** ( उसळून ) का ? कशासाठी ? कोण हेतूनं ? केवढी बदनामी झाली त्यानं आमची, जाणता ?

**प्रल्हाद :** शांत व्हा अण्णाजी. तुमच्या मनीचा सल आम्ही जाणतो. शांतपणे विचार करून कसकानोसा घ्यावा असाच आहे हा मामला. कोणताही अत्याचार करण्यासाठी वा करून कितीही अधिकारी झाला तरी कुणीही पुरुष–स्त्रीला–तेही सुवासिनीला कैदेत टाकणं शक्यच नाही–सुतराम नाही ! ( अण्णाजी—सोयराबाई अस्वस्थ होतात ) शिवाय कै. स्वामींनी गोदावरीला 'सती' मानलं. तिच्या यादगारीसाठी 'सतीचं वृंदावन' उठविलं. त्यांनी जातीनं जाऊन तिच्या वृंदावनावर फुलं वाहिली हे कुणी झालं तरी विसरणार कसं ? तुम्ही–आम्ही जबाबदारांनी तरी ते का विसरावं ? ( सोयराबाई चरफडते-क्षणैक शांतता )

**सोयरा :** ( क्षणभराने खोचकपणे) स्वारीचं काऽही सांगू नका तुम्ही न्यायाधीश-अफझलचीसुद्धा कबर स्वारीनंच उठवली आहे ! ! ( थरारता–वाद्य झपकार–अण्णाजी–प्रल्हाद पाऽर चक्रावून एकमेकांकडे बघतात.)

**प्रल्हाद :** ( निकरानं ) क्षमा असावी–मेहर करावी महाराणींनी. दोन्हींचा असा गैरमेळ घालू नये. तो आणि हा मामला साफ साफ अलग आहे. गोदावरीबाबत कसलाही वाईट—विद्रा विचार युवराजांच्या मनी नव्हता—असं आजही आम्हांस वाटतं–पक्कं वाटतं.

**सोयरा :** कशा–कशावरून म्हणता तुम्ही हे न्यायाधीश ?

**प्रल्हाद :** कधी नव्हे ते 'आरोपित' म्हणून प्रत्यक्ष कै. स्वामींनी भर दर्बारात पेश घेतलं खुद्द–खुद्द युवराजांना आणि विचारला करडा–जाब कुठल्याही मामुली आरोपिताला विचारावा तसा—[ सर्व दिवे जातात. तिघांवर फक्त तीन स्पॉट लाईटस्. वाक्याप्रमाणे तिघांचे फक्त वेगवेगळे मुद्राभिनय दिसतात.

विरोत–आरोपी दर्बाराचा फक्त टेप वाजतो आहे. टेपवर—]

**शिवाजी महाराज :** सांगा–आरोपित संभाजीराजे– बिन–शिवाजीराजे भोसले. हाली रहाणार किल्ले रायगड – उमर वर्षे अंदाजे – अठरा – सांगा – का केले तुम्ही बाईस कैद? कोण हेतानं! कोण अधिकारात? ( थरारक वाद्य झपकार )

**संभाजीराजे :** आम्ही – आम्ही आरोपित – संभाजीराजे बिन – बिन( थांबतो– अदब ठेवत पुन्हा ) आरोपित - संभाजीराजे भोसले हाली राहणार किले रायगड – उमर वर्षे अंदाजे अठरा – विचारलेवरून जाब देतो— " होय! आम्हीच बाईस कैदेत टाकले! युवराजांच्या अधिकारात—भोसले कुळीची पणास लागली आण राखण्यासाठी! बाईस आमच्या खिलाफ भरीस घालण्याचा कटाव होता—म्हणून!!

**शिवाजी महाराज :** कोण–कोण घालणार होते बाईस- भरीला तुमच्या खिलाफ? नाव सांगा त्या बहिमी असामीचे? सांगा बहिमी कोण?

**संभाजीराजे :** क्षमा असावी महाराज! ते नाव-ते नाव–नाही सांगू शकत. आम्ही या भरल्या दर्बारात! तेही युवराज म्हणूनच–भोसले कुळीची आण राखण्यासाठीच!!

**शिवाजी महाराज :** खामोऽब! मग तुमची सफाईही नाही खडी होऊ शकत. ही श्रींची मसनद आहे–सर्वांस सारखी! नाव सांगा – नाहीतर " गुन्हेगार " म्हणून मिळेल ती सजा आपलीशी करायला सिद्ध व्हा!

**संभाजीराजे :** ( निर्धारपूर्वक ) जी–आज्ञा. आम्ही सिद्धच आहोत! आमच्या आबासाहेबांनी आणि आई जगदंबेनंच द्यावं ते बळ आम्हास! ( क्षणैक– शांतता )

**हंबीरराव :** " माफी असावी धनी! सरलष्कर म्हणून आमी हंबीरराव म्होयतं बोलताव–आमास्नी वाटतं–या कथल्याचा निवाडा करण्या–अदुगर–एकवार खासा बाईसच बलावून घ्यावं दर्बारात! तिची साक्ष ऐकून घ्यावी. आम्हास खातर हाय–गुन्हा शाबितच झाला तर–तर गळ्याची आई भवानीची माळ ठिवावी तशी गर्दनच उतरून ठिवत्याल युवराज याच दर्बारात–खुद–आपल्या हातानं!

[ टेप संपतो–सर्व दिवे पुन्हा येतात. ]

प्रल्हाद : म्हणूनच आम्हास वाटतं गोदावरीच्या कथल्यात युवराज साफ निर्दोष आहेत–पण–दिलेरच्या गोटात जाऊन त्यांनी जो गुन्हा—

वर्दीदार : ( मुजरा ) मुंबईच्या टोपीकर दर्बारची कुणी असामी आलिया. न्यायाधीशांची भेट मागतीया.

प्रल्हाद : ( मुजरा देऊन जाताना ) येतो आम्ही-पण एक विनंती आहे महाराणींना—

सोयरा : बोला—

प्रल्हाद : महाराणींनी ते मनातून साफ काढून टाकावं–तुम्हीही अण्णाजी !

सोयराबाई : कशाबाबत म्हणता न्यायाधीश ?

अण्णाजी : काय काढून टाकावं आम्ही मनातून ?

प्रल्हाद : आम्हास म्हणायचं होतं—महाराणींनी असं तडकाफडकी तळबीडास जायचं मनातून काढून टाकावं–आणि अण्णाजी–तुम्ही घरच्या सुवासिनीचा सल मनातून काढून–दौलतीच्या हिताची मसलत आखावी.

सोयरा : त्यावर करू आम्ही अमळ विचार पण तुम्ही मात्र या अण्णाजींच्या मसलतीनं चालताना नका होऊ डायाडौल–काय ?

प्रल्हाद : जी–जिथं अण्णाजी तिथं आम्ही आहोतच खातर असावी. येतो आम्ही–आज्ञा व्हावी ( मुजरा ).

सोयरा : ( हात उठवून ) या. ( प्रल्हादपंत जातात. सोयराबाई वाघजाईच्या मूर्तीसमोरील निरांजनाची वात पितळी सरशीने नीट करते–सरशी तशीच हातात. )

सोयरा : ( पुन्हा सूचक खोच देत ) काहीही म्हणा सुरनीस. अशी चुकूनही ‘ आपल्या ’ गोदावरीची आठवण झाली तरी अंगभर कसा काटाच सरकतो आजही !

अण्णाजी : आता ते मनाला एवढं लावून घेऊ नये महाराणींनी—

सोयरा : ( मानभावीपणे ) तसं कसं अण्णाजीपंत ? कुणाच्याही घरची मुलगी म्हणजे कुंकवाचा करंडच ! तुमच्या जागी आम्हीच आहोत असं मानलं की– ( तिचा हेतू सफल होतो. अण्णाजी संतप्त बेचैन होतो. उपरणे चुरगाळतो. )

अण्णाजी : ( निर्धाराने ) पुढील मसलत बोलावी महाराणींनी आता.

सोयरा : ( धूर्तपणे ) आम्ही कोण बोलणार मसलत ! तुम्ही साऱ्यांनी संमती

दिली म्हणून तर झाला–आम्हावर महाराणींचा अभिषेक! पण एक राहून–राहून वाटतं.

**अण्णाजी :** काय? आज्ञा व्हावी.

**सोयरा :** स्वारी गेल्यापासून इथे रायगडावर जे जे तुम्ही साऱ्यांनी जाणतेपणानं केलं ते ते पन्हाळगडावर युवराजांना कळल्याशिवाय राहणार की काय सुरनिस?

**अण्णाजी :** ते कळताच आपल्या अंगच्या उतावळ्या स्वभावाप्रमाणं ते उचल खाणारच. त्यापूर्वीच आम्ही पेशवे मोरोपंतांच्या पाठबळानं फौजबंद होऊन पन्हाळ्याकडं कूच व्हावं म्हणतो.

**सोयरा :** मनचं बोललात सुरनीस – पण मोरोपंत पाठबळ द्यायला राजी आहेत याचा काही तपास – अंदाज?

**अण्णाजी :** जी. हा अण्णाजी प्रभुणीकर आहे सरकार! यानं जाता जाता पायानं मारलेली गाठ भल्या भल्यांना हातानं नाही सुटता–सुटायची!

**सोयरा :** मतलब?

**अण्णाजी :** मोरोपंतांना मी कसबानं केव्हाच केलं आहे वळतं आपल्या गोटाकडं–पण–पण––

**सोयरा :** पण काय अण्णाजी? या न्यायाधीशांचा काही शक संदेश?

**अण्णाजी :** ( ठरीव हसून ) मुळीच नाही. ते तर युवराजांच्याच उमरीचे व वकुवाचे आहेत. ( दोघेही मंद हसतात ) आता पेशवे मोरोपंतच आहेत म्हटल्यावर देवमाशामागुती चिंटा मासा येतो––तसे ते येतील आपसुकच. त्यांची नाही वाटत आम्हास एवढी फिकीर – पण – पण––

**सोयरा :** मग आता आणखी 'पण' कोणत्या वजेचा?

**अण्णाजी :** ( चाचरत ) आम्हास – शक – धास्त आहे ती ती ( आवंढा गिळत ) सरलष्करांची – हंबीररावांची! अद्याप काहीच ठाम कौल मिळालेला नाही त्यांचा या मसलतीत.

**सोयरा :** अण्णाजी – अण्णाजी मघापर्यंत आम्हास वाटले तुम्ही खरेच खासे मुरलेले मुत्सद्दी आहात. पण आता पटलं – कितीही हुन्नरी असला तरी पायानं गाठी नाही घालता येत कुणालाही! मुत्सद्दीपणाच्या एकटाकी मार्गानं जाताना साधा व्यवहार विसरलात तुम्ही अण्णाजी!

**अण्णाजी :** ( वरमून ) क्षमा असावी. आम्ही नाही उमगलो नेमका मतलब.

**सोयरा :** हंबीरराव आमचे सख्खे धाकले बंधू आहेत—रामराजांचे ते मामा आहेत हे मघाच नाही का पटवलंत तुम्ही न्यायाधीशांना!

**अण्णाजी :** आम्हालाही पटतंय ते. पण या सर्वांहून अधिक ते 'सरलष्कर' आहेत त्याचं काय?

**सोयरा :** तसाच पेच आला तर त्यांच्या 'सरलष्कर'पदाला पाट काढून देऊ आम्ही – आमच्या 'महाराणीपणाच्या' अखत्यारीत! त्यांची दरोबस्त गुंतवणूकच करू आम्ही. आता आणखी काही—'पण – बिण?'

**अण्णाजी :** (वाकून) नाही. आता पण—बिण काही नाही. उद्याच होतो आम्ही कूच पन्हाळ्याच्या रोखानं – 'दस्त' करून पन्हाळकर "कैदी" महाराणींच्या कदमांवर रुजू घालू. त्याशिवाय आता आम्हास चैन नाही— त्या वेळीच ठरवावं सरकारस्वारीनं आम्ही पायाच्या अंगठ्यानं गाठी मारतो की नाही ते!

**सोयरा :** जाण्यापूर्वी हेही गाठीला जमेस धरून जा अण्णाजी. या कामगिरीच्या फत्तेसाठी पन्हाळ्यावर फारशी यातायात नाही करावी लागणार तुम्हाला.

**अण्णाजी :** मतलब? युवराजांशी गाठ आहे ही!

**सोयरा :** त्यासाठीच आठा दिवसांपूर्वी जासूदांचा नाईक खंडोजी आणि गणोजी कावळा पन्हाळगडाकडे झालेत रवाना. पन्हाळ्याच्या किल्लेदार महाडकरांना व्हायचे ते खलिते झालेत पोच.

**अण्णाजी :** काय मजकुराचे? कोण कारवाईचे?

**सोयरा :** पन्हाळा पुरता कब्ज करून युवराजांवर तातडीचे हत्यारी चौकी-पहारे बसविण्याचा हुकूम आहे – किल्लेदाराच्या खलित्यात! गणोजी कावळा तो त्यांना एकांती पावता करील! (सूचक वाद्य)

**अण्णाजी :** (पसंतीची मान डोलवीत) आणि दुसरा कुणाला? पन्हाळ्याच्या तटसरनौबतांना?

**सोयरा :** नाऽही! दुसरा आहे खुद्द युवराजांना!

**अण्णाजी :** साक्षात युवराजांना!

**सोयरा :** होय – युवराजांना– "स्वारींच्या तब्येतीस आता बरा वारवा आहे– चिंता कराया कोण्याही वजेचं प्रयोजन नाही!" या मजकुराचा. खंडोजी नाईक करेल तो त्यांना पावता. (भेदक वाद्य—झपकार – अण्णाजी ते बोल ऐकून

उपरण्याने घाम पुसतात. )

**अण्णाजी :** पटलं आम्हास की आम्हासारख्यांना पायाच्या अंगठ्यानं मारता येतात तसल्या कैक चावरगाठी सरकारस्वारींना नुसत्या उठत्या – झुकत्या पापणीच्या इशारतीवर अगदी बेमालूम भरता येतात ! ! ( मुजरा देऊन जाऊ लागतो– तसे )

**सोयरा :** थांऽबा ! ( देवीसमोर जाऊन प्रसादाचे तबक उचलते. प्रसाद अण्णाजींच्या हाती ठेवत – ) घ्या देवीचा – आमच्या कुलदेवी वाघजाईचा प्रसाद घ्या अण्णाजीपंत ( अण्णाजी प्रसाद घेतात तो न खाता तशीच ओंजळ मस्तकी लावतात.).

( पक्क्या निर्धारी बोलात) सुरनिस अण्णाजीपंत, तुमच्या सवाष्ण गोदावरीवर लिंगाण्यावरून कुडी झोकून देण्याची नौबत आणणाऱ्या—

**अण्णाजी :** ( त्याच निर्धारानं सुरात सूर मिसळत ) कै. स्वामींच्या पाठीत खंजीर खुपसून उभ्या मराठी दौलतीला दगा देणाऱ्या – थेट गनिम दिलेरच्या पठाणी गोटात जाऊन मिळणाऱ्या—

**सोयरा :** तुम्हा – तुम्हा साऱ्या प्रधानमंडळींच्या अखत्यारी बाबीत नाक खुपसून त्यात मनमानी घालमेल करणाऱ्या—

**अण्णाजी :** मराठी दौलतीच्या शिवपिंडीवर विंचवासारखं बसून – ' युवराज ' म्हणून स्वतःला सुक्षेम व सुखरूप मानणाऱ्या—

**सोयरा :** त्या अविचारी, माथेफिरू, लहरी आणि बदफैली करंट्याला—

**अण्णाजी :** मराठी दौलतीवरच्या – मस्तकीच्या त्या अभद्र कलंकाला—

**सोयरा :** त्या ' नादान ' युवराजाला दंडात काढण्या चढवूनच आमच्या सामने " कैदी " म्हणून पेश करा – अण्णाजी – कैदी म्हणूनच ! !

**अण्णाजी :** प्राणबाजीनं पेश करू – " कैदी " म्हणूनच काढणीबंदीनं !

**सोयरा :** ( हात आशीर्वादासाठी उठवून ) या ऽ आई वाघजाई तुम्हास येश देणार थोर आहे ! ( अण्णाजी मुजरा – देऊन – मिटल्या ओंजळीत प्रसाद घेऊन जाऊ लागतात.) थांऽबा ! हेही निसबतीनं ध्यानी ठेवून चला – सुरनीस अण्णाजीपंत – की – की – हातानं काय आणि पायानं काय ' घातलेल्या ' गाठी – ' दिसतात '—

**अण्णाजी :** ( गोंधळून ) मतलब ? आम्ही नाही नीट उमगलो.

**सोयरा :** ( टेचात ) झुकत्या – उठत्या पापणीनं गाठी " भरल्या " जातात – त्या कधीच नाही दिसत कुणालाही ! म्हणूनच तर त्या उकलण्याचा सवालही नाही होत खडा ! राजकारण आहे हे – इथं तेढ्या उंगलीनंही तूप नाही निघत कधी – कधी अण्णाजी !

**अण्णाजी :** ( पार गोंधळून जात ) म्हणजे ? काय दिशा मानावी सरकार स्वारींची नेमकी आम्ही !

**सोयरा :** ( हसत ) तुम्ही नका असे कचरू ! आम्हास म्हणायचं होतं – तेढ्या उंगलीनं तूप काढण्याचा सायास करण्यापरीस – तुपाचं भांडंच लंपास करविलं तर कसं ? काय ?

**अण्णाजी :** ( दोन्ही हात वर उठवीत ) काय बोलणार कदिम !

**सोयरा :** हंऽ या आता – ( अण्णाजी जातात—क्षणात वर्दी येते )

**वर्दीदार :** सरलष्कर हंबीरराव सरकारस्वारींच्या भेटीस येताहेत ( सोयराबाई मूड पालटून पुन्हा बेचैन फेऱ्या घेऊ लागते – तो हंबीरराव – तरण्याबांड रायाजी गड्यासह प्रवेशतात. दोघेही मुजरे देतात. सोहराबाई क्षणैक लटके हसमते – तशी )

**हंबीर :** ( समजावीत ) धीर धरावा अक्कासाब ! व्हनारं टळलंय का कदी ? व्हइलं सम्दं ठाकेठीक आई–भवानीच्या किरपेनं. आम्ही हाव रूपाजी–मानाजी म्हलोजी हाईत–या रायाजी गाड्यावानी नेटाक–बांडी पोरं हाईत.

**रायाजी :** ( सूर मिसळत ) मासाबांनी दुकं पागळू नेत–पडंल ती जोखम पेलू की आमी–सरलष्करांच्या पावलावर पाऊल ठिवत !

**सोयरा :** कसा धीर धरावा–हंबीरराव–रायाजी ? स्वारींचा हा असा अचानक काळ झाला. " तुम्हा साऱ्यांचे " रामराजे पडले पोरउमरीचे !

**हंबीर :** ते पोर उमरीचे असले म्हून काय झालं ?

**रायाजी :** आपलं युवराज तर हाईत भर उमरीचं–वागाच्या छातवानाचं ! ( सोयराबाई चमकते. )

**हंबीर :** जागजागी चाळीसावर गडकोटाला हत्यारबंदीनं कडवी फौज हाय– ' पापणीला ' त्याल सोडून ! ( सोयराबाई ' पापणी ' शब्दावर चमकते ) एवढं चिंतागती नगं व्हायला महाराणींनी !

**सोयरा :** ( नात्याची याद देत ) आम्हास तुम्ही ' आक्कासाहेब ' म्हणता तेव्हा

वाटतो तसा नाही वाटत धीर दिलासा असं मध्येच "महाराणी" म्हणता तेव्हा !

**हंबीर :** 'महाराणी' काय आणि 'आक्कासाब' काय !

**रायाजी :** खरं तर आम्हा समद्यांच्या 'आऊसावच' तुम्ही.

**हंबीर :** ह्या रायाच्या आयेनं–युवराजास्नी बाळपणी दूध पाजलं–अद्याप युवराज न्हाई का हाकारत ह्येच्या आयेला "आऊ" म्हून ! नात्याचं काय हाय आक्कासाब, जोडावं तसं त्ये लाभतं–रुजवावं तसं रुजतं !

**सोयरा :** म्हणूनच या बाक्या वक्ती आम्हास सर्वाहून अधिक सय झाली ती तुमची !

**हंबीर :** सहज हाय त्ये. आम्हास्नी वाटतं आता वखत जाया करण्यापरीस–घ्यावं बलावून पन्हाळ्यावरनं युवराजास्नी ! ( सूचक वाद्य )

**रायाजी :** घोड्यांची टापाडी शेवाळल्यागत झाल्यात थोरलं धनी हातरूनाला खिळल्याधरनं !

**सोयरा :** आणि करावं काय म्हणता–सरलष्कर–अं हंबीरराव !

**हंबीर :** ज्ये करायचं असंल त्ये समद्यांनी एकमेळानं करूवा की ! तुम्ही हायसा–अष्टपरधान हाईत.

**रायाजी :** युवराज हाईत.

**हंबीर :** एकदिलाची मसलत काय ती ठरवू वा. कसं ? आमी थांबताव युवराज येईतो गडावर.

**रायाजी :** म्या उतरू का गड–युवराजास्नी सांगावा घिऊन ?

**सोयरा :** ( त्याला शांतवीत ) तुम्ही म्हणता तसंच होईल–हंबीर–अं म्हणजे सरलष्कर ! पण आता साऱ्यांनीच इथं रायगडी गुंतून पडता कामा नये ! आठा–दिवसांपूर्वी युवराजांनाही धाडलाय आम्ही खलिता पन्हाळगडी !

**हंबीर :** चोख क्येलासा ! कशा–कशा चालीची लिखावाट झाली म्हनावी युवराजास्नी ?

**सोयरा :** ह्याच मजकुराची–की–स्वारींचा काळ झाला म्हणून–डरू–कचरू नये ! समयास प्रांत पन्हाळा आणभाकेने रक्षून असणे ! योग्य वक्ती बलावू धाडू.

**हंबीर :** आसं म्हन्ता–पर एक इचारावं का ?

**सोयरा :** तुम्ही ? आणि इजाजत कसली मागता सरलष्कर—

**हंबीर :** आम्हास्नी आपलं 'हंबीररावच' म्हनावं–महाराणींनी–किती क्येलं तरी आम्ही धाकलंच. तर इचारायचं हुतं ते आसं की—का म्हून घाई क्येली सम्द्यांनी आमचा रामराजास्नी—मंचकारोहन करायची – ?

**सोयरा :** स्वारींचे अंत्यविधी त्यासाठी खोळंबले होते–म्हणून ! तुम्ही म्हणता तसा फेर एकमेकांच्या मसलतीचा निवाडा करणारच आहोत आम्ही हंबीर—

**हंबीर :** जी !

**सोयरा :** अं सरलष्कर. स्वारींच्या जाण्यानं जागजागी गनिमांनी उचल खाल्ल्याच्या खबरा येताहेत—

**हंबीर :** ( चमकून ) आम्हाला दखल नसताना !

**रायाजी :** ( गोंधळून ) जासुदाचं नाईक बहिरजी–भेटलं पन्हाळ्यावर पर असं काही बोललं नाहीत !

**सोयरा :** ( भान घेत ) आम्ही 'महाराणी' सांगतो आहोत सरलष्कर–रायाजी –खबरा येताहेत ! गनिम उचल खातो आहे !

**हंबीर :**
**रायाजी :** } ( एकदम लवून ) जीऽ

**सोयरा :** आम्हास वाटतं सरलष्कर—

**हंबीर :** जी हुकूम व्हावा.

**सोयरा :** ( आब घेत ) तुम्ही आजच गड उतरावा—

**हंबीर :** जीऽ

**सोयरा :** कऱ्हाडतर्फेला कूच व्हावं. तळबीडास फौजेसुद्धा ठाण व्हावं. प्रांत कऱ्हाड डोळ्यात तेल घालून राखून चालवावा.

**हंबीर :** जीऽ पर–युवराज—

**सोयरा :** युवराजांना 'इतमामानं' बोलावून घेताच देऊ आम्ही तुम्हास हारकारा.

**हंबीर :** जीऽआज्ञा–( मुजरा देऊन रायासह जायला निघतो. )

**सोयरा :** थांबाऽ ! ( पुन्हा प्रसादाचे तबक उचलते. प्रसाद दोघांना देत ) घ्या आपल्या तळबीडचा प्रसाद घ्या हंबीरराव–रायाजी, हंबीरराव, खुद्द आमच्या स्वारींना मोहितेमामांना काढणीबंद करण्याचा प्रसंग आला होता एकदा–आहे

याद तुम्हाला ?

**हंबीर :** ( चमकून–गोंधळत ) मतलब ? आम्ही रामराजांचे मामासाहेबच आहोत–काय म्हनायचंय महारानीस्नी ?

**सोयरा :** ( पूर्ण धूर्तपणे ) 'तुमच्या' युवराजांना मोगलाईत गेलेल्या त्यांच्या मामासाहेबांचं–व्रजाजींचंसुद्धा पाठबळ नव्हतं लाभलं !

**हंबीर :** आम्ही पाऽर येलबाडून गेलो हाव ! माफी असावी–पर काय म्हनायचं हाय त्ये शाप सांगावं महाराणींनी–असं आडवळणानं नगं !

**सोयरा :** ( अधिक बेजोड धूर्तपणे ) नात्याचं काय आहे हंबीर–अं म्हणजे सरलष्कर–ते लावावं तसं लाभतं. आणि रुजवावं तसं रुजतं ! हे–हेच म्हणायचं होतं आणि आहे आम्हास.

**हंबीर :** माफी असावी–अक्कासाब, नेमका मतलब नाही आला आमच्या ध्यानी-अन्नाप फोडून सांगाल तर—

**सोयरा :** ( आब घेत ) तो तेवढा प्रांत कऱ्हाड बरा रक्षून असणे ! वाघजाई तुम्हाला यश देणार थोर आहे ! ( 'वाघजाई' म्हणताच हंबीर–राया हातचा प्रसाद ओठाआड करतात. ) याऽ

**हंबीर :**<br>**राया :** } जीऽ आज्ञा—( मुजरा, दोघेही जातात. )

**सोयरा :** ( स्वगत ) आपले युवराज ! बलावून घ्या पन्हाळगडावयनं ! एक-मेळाची–मसलत करू या ! हूँ ऽ–स्वारीवर मोहितेमामांच्या बाबतीत काढण्या-चढवण्याचा प्रसंग आला–आमच्या रामराजावर तसाच गुदरू नये–सरलष्कर हंबीरमामा !

( वाघजाईजवळ जाते तबक ठेवते. देवीला हात जोडते–परतून–रंगमंचाच्या मधोमध येत— )

आता आम्ही वाट बघतो आहोत ती फक्त सुरनिस अण्णाजी–दत्तोंची ! त्या 'पन्हाळकर' नादान–काढणीबंद कैद्यासह !! आई–वाघजाई तू आम्हास येश देणार-थोर–थोरच आहेस !!

( दिवे जातात )

# प्रवेश दुसरा

**संभाजीराजे :** ( प्रत्यक्ष किंवा निवेदनात )

झालो आम्ही कैद ? गेला पन्हाळा महाराणींच्या कब्जात ? झाला त्यांचा कटाव फत्ते ? नाही. व्हावाच कैसा...जेवढे देहाचे श्वासावर नसेल तेवढे खरे ध्यान होते आमचे रायगडाच्या हरेक हालचालीवर. आमचे दूधभाऊ राया-अंताच दौडत होते त्यासाठी रातदिन.

महाराणींनी छुप्या कसबानं टाकलेला डावपेच— तेवढ्याच सावधगिरीनं उधळून लावला आम्ही. बंदिस्त केले त्यांचेच दोन्ही जासूद, खंडोजी नाईक आणि गणोजी कावळा—पन्हाळ्याच्या चौदरवाज्यातच. आम्ही नाही झालो दस्त— उलट आम्हीच बसवले चौकीपहारे पन्हाळ्याच्या किल्लेदार महाडकरांवर.

रसद, धारकऱ्यांनी पन्हाळा बांधून सिद्ध ठाकलो आम्ही— झेप घेण्यासाठी रायगडाकडं ! आणि-आणि कानामनावर विश्वास बसू नये अशी खबर आली तळबीडहून सरलष्कर-हंबीररावांची. आम्हास—प्रत्यक्ष आम्हास कैद करायला फौजबंदीनं चालून येत होते ! कोण ? तर सुरनीस अण्णाजी. न्यायाधीश प्रल्हाद- पंत आणि पेशवे मोरोपंत. गाठीशी सरलष्करच लागतात काय याचीही कोशीस केली होती त्यांनी. पण-पण नाही घडलं ते. उलट हंबीररावांनीच केले दस्त तिन्ही खाशा असामींना. पेश रुजू घातले त्यांनाच आमच्यासमोर पन्हाळ्यावर 'कैदी' म्हणून कैद केल्या खाशांना रायगडावर पाठवण्याचा हुकूम ठेवून घेतली झेप आम्ही रायगडाकडं-हंबीररावांच्यासह. समोर आल्या कडव्या विरोधाला हत्यारी चालीनं जाब देत आम्ही ताब्यातच घेतला रायगड. ( रणशिंगांच्या ललकाऱ्या खणखणाट, रणघोष )

काय घडलं होतं हे सारं ! सावलीनंच आकृतीशी बंडावा करावा तसं ! किती सोलवटून निघाला आमचा कलेजा या घरच्याच घालमेलीत ! कोण यातना झाल्या या साऱ्यात आम्हास !

आम्ही रायगडी आलो-पन्हाळ्याच्या अखेरच्या भेटीत आबासाहेबांनी ऐकवलेले बोल न बोल उरात जतून ठेवत. ते तडीस लावण्यासाठी प्राणबाजीनं पणास लावण्याची आण घेत !

( निवेदन समाप्त )

# प्रवेश दुसरा

## दृश्य पहिले

[ संभाजीराजांच्या खासेवाड्यांची सदर. बड्या मनसुब्याची मसलती सदर भरली आहे. सदरेत हंबीरराव, कवी कुलेश, म्हलोजी घोरपडे, रूपाजी भोसले, निळोपंत, बहिर्जी नाईक अशी मंडळी आमने–सामने खडी आहेत. मध्ये एका सरपोसबंद नकसदार प्रशस्त लाकडी चौरंगीवर–झेंडूच्या फुलमाळांनी मंडित "भंडारा परडी" आहे. पार्श्वभूमीवर दूर मागे अष्टभुजेची मूर्ती आहे. तिच्या समोरच एका बगलेला छत्रपती शिवाजी महाराजांचे नित्यपूजेचे धवलशुभ्र "स्फटिक शिवलिंग" आहे. शेजारी बेलपानांचे तबक आहे. संभाजीराजे रायाजीशी बोलल्यासारखे–पण खरे तर प्रेक्षकांशीच बोलत रायाजीसह तडफदार प्रवेश घेतात— ]

**संभाजीराजे :** ( शिवाजीराजांचेच हुबेहूब तोलदार भान देत ) ये राज्य व्हावे हे तो श्रींचे मनी फाऽर फाऽर आहे! ध्यानी ठेवा—तुम्हा–आम्हा एकल्या भोसल्यांचेच नाही हे राज्य! ते आहे देवाधर्माचे–तमाम गोरगरीब रयतेचे राज्य! त्याच्यासाठी–लहानथोर हरेक असामीस या समयी कार्यास लावले पाहिजे—( सर्वजण मुजरे देतात. )

**हंबीरराव :** म्हणूनच म्हनताव आमी. दौलतीचा ह्यो बारदाना लई मोट्टा हाय. अजून व्हनार. थोरलं धनी गेलं तवापून समद्या आठरा कारखान्यावर बंदीच्या म्हवरा हाईत. त्या तुटाय पायजेत. थोरल्यांच्या–वानी रीतीचा अभिषेकच घ्याय पायजे राजांनी आता. काय कवीराज?

**कवी कुलेश :** सर्वांच्या मनचंच बोललात सरलष्कर. आम्ही दूरदेशच्या कनोज-हून इथंवर आलो ते स्वामींची धडाडी पारखून. जमेल ती सेवा नेकीनं पायी ठेवावी म्हणून. आम्ही–आम्ही कितीही झालं तरी दूरचे! कसं—कसं बोलणार एवढ्या जवळकीनं–अधिकारानं? पण स्वामींनी मंत्रघोषात राज्याभिषेक घ्यावाच आता. त्याशिवाय एवढा मोठ्ठा कारभार नाही होत रावता.

**संभाजीराजे :** ( कवीजवळ जात) आमच्या 'बाळवयात' मथुरेपासून रायगडा-पावेतो आम्हास सुखरूप पावते करण्यासाठी जिवाचा कोण आटापिटा केला

तुम्ही. अद्याप वरी याद आहे त्याची आम्हास. म्हणूनतर आम्हीहून बोलावून घेतलंय तुम्हास कवीराज. आम्ही—या हंबीररावांनी मानलंय का कधी तुम्हास दूरचं–परकं ?

**कवी कुलेश :** ( नम्रपणे ) जी नाही ऽ कधीच नाही.

**संभाजीराजे :** आता एक आहे–मुलुखभरच्या आमच्या भाबडया अडाणी लोकांस तुम्हास " कवी कुलेश " म्हणणे नाही साधत. म्हणून जातात बापडे सहजी–" कलुषा–कबजी " राग रोष तर नाही त्याबद्दल तुमच्या मनी ?

**कवी कुलेश :** ( नम्रपणे ) जी मुळीच नाही स्वामी. या मामुली बाबीचा मुळीच सल नाही आमच्या मनी–कृष्णाच्या मथुरेचे कवीराज आहोत आम्ही-कोण काय " म्हणतो " यापेक्षा काय " असतो " याचंच मोल मानतो आम्ही.

( संभाजीराजे समाधानाने कुलेशांचा खांदा थोपटतात. सर्वांमध्ये येऊन क्षणैक बसतात. सर्वांना काळजीपूक निरखतात मग उठून—)

( सदरकरी एकदमच लपकन कमरेत झुकतात. त्यांचे मुजरे आपलेसे करीत राजे प्रथम अष्टभुजेसमोर जातात – प्रथम बेलाची ओंजळ शिवलिंगावर सोडतात. दोन्ही दैवतांना हात जोडून नमस्कार करतात. सर्वांना निरखून मग— )

तुम्ही अवघे मैदानी कामाचे तितुके जमावानिशी रायगडी आलात. संतोष झाला श्रींच्या इच्छेने हे राज्य आबासाहेबांनी उठवले. (' आबासाहेब ' शब्दा-बरोबर सर्वांचे हात आदराने छातीला भिडतात ) आबासाहेब गेले असे कुणीच मनी आणू नका. ते तुम्हा–आम्हातच आहेत. आम्ही—आम्ही आहोत ती केवळ त्यांची पायधूळ !

अवघे वरी हिमत बांधून समयास हत्यार धरता तर–तर चौतोंडावरचा दाटला माजोर गनिम जेर होतोच आहे. तुम्हा साऱ्यांच्या जोरा–बळावर तीन आघाड्यांची भक्कम मोहीम खोलण्याचा मनसुबा धरला आहे मनी ( सारे मान डोलावत–एकमेकांकडं बघतात ). हंबीरराव, पन्हाळयाच्या आखरी भेटीत काय काय बोलले असतील आबासाहेब आमच्याशी–काही अंदाज ?

**हंबीरराव :** ( नम्रपणे ) एवडं हायातभर हुतो दिमतीत आमी थोरल्या धन्यांच्या–पर आम्हास्नीबी घावला न्हाई कधी माग त्येंचा ! मान्सं काय पावसाळ्या आळंब्यावानी उपाजत्यात अन् जिरत्यात ! ( आदरानं दोन्ही हात

आकाशी रोखत ) पर थोरलं धनी त्ये धनीच.

**संभाजीराजे :** ( निळोपंतांजवळ जात) निळोपंत, तुम्ही दौलतीच्या पेशवे मोरोपंतांचे चिरंजीव ( आठवून–व्याकुळत ) महाराणी–सुरनीस यांच्या कटावी नादानं–" आमच्या" लाख मोलाच्या मोरोपंतांची कोण फरफट झाली जाणता. ज्वरानं भ्रम होऊन काळ झाला त्यांचा. त्यांनी दौलतीची निष्ठेनं केली चाकरी याद ठेवून त्यांचेच दफ्तर आम्ही तुम्हास सुपूर्द केले आहे–पेशवाईचे. निसबतीनं काटेकोर सांभाळा ते.

**निळोपंत :** ( लवून ) जी – आमच्या वडिलांचा सल-शक तो रेसभरही नाही आमच्या मनी. पेशवाईची जोखीम काटेकोर पेलण्याची हरभातेनं करू आम्ही कोशिस ( झटकन् राजांच्या पायांना हात लावून ). या पायांशी स्वप्नीसुद्धा बेमानी ते होणार नाही.

**संभाजीराजे :** ( झटकन त्यांना उठवून) आम्हास आहे त्याची खातर निळोपंत. कुठल्याही दफ्तरी कामाचा निवाडा घेताना–आमच्या कारणानं कधी कचरू नका–डायाडौल होऊ नका ! याद ठेवा हरेक कामात–ते फक्त आबासाहेबांचे बोल. भोवतीचे दर्बार, जागोजागची धर्मस्थळे, फौजी रावता–हरेक कामाचा उठाव आम्ही बघणार आहोत तो तुमच्या डोळ्यांनी ! जसा आबासाहेबांनी तो बघितला होता–मोरोपंतांच्या डोळ्यांनी.

**निळोपंत :** ( भान घेत ) त्या डोळ्यांत कधीच आपमतलबाचं–आपपर भावाचं खुसपटही जाणार नाही याची—याची कुलदेवतेच्या आणभाकेनं ग्वाही देतो आम्ही स्वामींना.

( राजे समाधानानं त्यांचा खांदा थोपटतात. )

**संभाजीराजे :** ( रुपाजी भोसल्यांच्यासमोर येत) रुपाजी, जेवढी हंबीररावांच्यावर आहे तेवढीच मदार आहे आमची तुमच्यावर.

**रुपाजी :** ( लवून ) जी. कायबी कामदारी सोपवाबी धन्यांनी आम्हावर बिनधोकीनं. प्राणबाजीनं तडीला लावू ती. चूक–कसर ती न्हाई व्हयाची या हातानं.

**संभाजीराजे :** ( म्हलोजींच्या समोर येत ) म्हलोजीबाबा तुम्ही आमच्या थोरल्या महाराजांसारखे. म्हणून तर पन्हाळ्याच्या तटसरनौबतीची जोखीम टाकल्येय आम्ही तुम्हावर. जेवढा रायगड तेवढाच किल्ले पन्हाळा मोक्याचा आहे

दौलतीत हे ध्यानी ठेवा.

**म्हलोजी :** ( लवून ) जीऽ आम्ही जरी उताराला लागलाव–तरी पन्हाळगडची चिंता नगं धन्यास्नी. शिवाय घरची संताजी–बहिर्जी ही नेटाक–बांडी पोरं हाईत संगतीत. दवलतीच्या पायांवरच घातल्यात ती.

**संभाजीराजे :** ( बहिर्जी नायकासमोर येत) बहिर्जी, आमच्या खबरगीर खात्याचे तुम्ही नाईक ! साऱ्या नाड्या तुम्हा हाती ! हजारो प्याद्यांचं हत्यार करत नाही तो कार्याचा उठाव–हुन्नरी खबरगीराची एक खबर करते. तुमचे विश्वास मुसेखोरेकर, महादेव, धर्माजी साऽरे निवडीचे खबरगीर टाकोटाकीनं पेरा आता चौतर्फा—

**बहिर्जी :** ( वाकून ) जुहार धनी–आताबी हाय याक खबर घोंगडीच्या दशीला हुकूम व्हताच एकांती ठिवन ती कानावर.

( संभाजीराजे सर्वांचा अंदाज घेऊन पुन्हा येऊन 'क्षणैक' बैठकीवर बसतात. भंडाऱ्याची चिमट सदर देवतेला म्हणून समोर उधळतात–मग रायाला )

**संभाजीराजे :** रायाजी—

**राया :** जीऽ

**संभाजीराजे :** मळवट दे साऱ्या सदरकाऱ्यांस ( रायाजी सर्वांसमोर परडी फिरवतो–सारे मळवट घेतात. पार्श्वभूमीला क्षणैक रणशिंगाची कातरी ललकार घुमते. )

**संभाजीराजे :** ( उठून ) हंबीरराव, पन्हाळ्याच्या आखरी भेटीत आबासाहेब बोलले तो बोलन् बोल आजही रूंजी घालतो आमच्या काना–मनात ! शब्द शब्द कसा शिवघंटेसारखा ! कणीदार ! हमेश आमच्यावर जागता–राबता ठेवणारा—

( पार्श्वभूमीवर घंटा–टोल निनादतात. शिवाजी राजांच्या तोलदार बोलीत )

" अवघे बरे ध्यानी ठेवा–अगोदर मरतात ती मनं—आणि मग मरतात ती माणसं !

भुलू नका सारे कधीच की–एवढीशी तर असते डोळ्यांची पापणी–पण तीसुद्धा नाही घेत कधी सादिल कस्पटही डोळ्यात !

दौलतीच्या चौतर्फांना जरा हुशारीची गरूडी–नजर द्या. काय दिसतो नजारा ?

जंजिऱ्याच्या जलकोटावर पिढ्यान पिढ्या हबशी पाय रोवून.

( काही क्षण घंटांचा नादच नाद घुमतो—एक वातावरण सिद्ध होते. )

**हंबीरराव :** ( भारावून राजांना जोड देत ) त्यो हबशी हो तवा व्हडक्यांनी खाडी उतारतोय. मावळ किनारपट्टीची आपटा, थळ, नागोठाण अशी गावं जाळून—लुटून तसनस करत्योय. शिवारातली हुबी—जितरापं वरवाडून न्हेतोय—दिसा—ढवळ्या !

**कवी कुलेश :** आमचा ' दर्या ' आपला ' चाकरच ' झालासे वाटते त्याला.

**निळोपंत :** ( त्याच भानात—त्याच सुरात ) नारळा—सुपारीचे बोद लादावेत तशी आमची रयत माणसं जहाजावर लादतो. बेगुमानपणे—

**रुपाजी :** ( त्याच भानात—त्याच सुरात ) बाया म्हनत न्हाई, नेणती पोरं म्हनत न्हाई, म्हातारी म्हनत न्हाई सरसकट ढोरागत—दबावतोय—गलबतांवर.

**संभाजीराजे :** ( पूर्ण राजभान घेत—संतापात ) दूरदेशी नेऊन चाऱ्याच्या पेंढीगत " गुलाम " म्हणून विक्रा मांडतो हबशी—आमच्या—आमच्या रयतेचा ! पश्चिम दर्या जसा त्या जात्या अश्रापांनी ढाळलेला आसवांनीच खारावला वाटतो आम्हास ! तसा—तसाच फिरंगाणातला—माजोर फिरंगी—

**कवी कुलेश :** पणजीच्या कोटबंद किल्ल्यात सागरी कासवासारखा दबून आहे तो. गाठीशी शिकाऊ फौजा राखून आहे तो.

**हंबीरराव :** ( त्याच भान सुरात ) पहाटफुटीवर त्येच्या फिरंगी फौजा अंत्रुज, सालशेत—बार्देश ह्या प्रांतात घुसत्यात. कांठळ्या बसवीत—बंदुकांचं बारंच बार उटवत्यात—कोंबडं रेकायच्या अगुदर.

**बहिर्जी :** ( त्याच सुरात ) पडघम काय—नगारं काय—शाजणं काय—बडव बडव बडवून काल-कल्लोळ करत्यात निस्ता !

**रायाजी :** गावचं सारं तरणं बांड जवान एकजाग चौकात हत्यारी धाकावर गोळा करत्यात. त्येस्नी " किरीस्ताव व्हा " म्हनत भाल्यांच्या पात्याची टोच देत दपटशा घालत्यात.

**म्हलोजी :** न्हाईच मानलं त्येनी तर—तर व्हळीच्या हुडव्यागत हुबं जाळत्यात त्येस्नी—वालांनी बांदून !

**निळोपंत :** ( संतापात ) गाव विहिरीत पावाचे तुकडे टाकून उभा गावच भ्रष्ट झाल्याची आवई उठवितात. तरण्याताठ्या मुली कालवडीसारख्या हाकून

भाविणी म्हणून चर्चमध्ये नेतात.

**संभाजीराजे :** मुंबईचा टोपीकरही त्याच वाणाचा.

**निळोपंत :** तागडी तोलून व्यापार करायला आलेला नाही तो सात दर्ये पार करून ! प्रसंगी झब्या आडची तेग उपसून बेट मुंबई मारायच्या इराद्यात आहे तो.

**कवी कुलेश :** नुसतं बेट मुंबईच नाही–जमलं तर खंदेरी उंदेरीपासून पुरा पश्चिम दर्या !

**संभाजीराजे :** या सर्वांहून–या सर्वांहून–दूरदेशी दिल्ली तख्तावर बगळेवाणानं टपलेला औरंग आहे आम्हासमोर.—आपल्याच दारा, शुजा, मुराद या भावांची, दिल्ली तख्ताच्या हवसेनं कत्ल करणारा–जन्मदात्या शहाजहान पादशहास कैकेत कोंडणारा—आज ना उद्या–तो दख्खनेत उतरणार. त्यासाठी साहेबी ठेवली तशी विजापूरच्या आदिलशाहीशी–भागानगरच्या कुत्बशाहीशी जोड–साथ ठेवत त्याला जागोजाग जेरच करणे आहे.

**हंबीरराव :** मसलत खोलावी धन्यांनी आता म्होरली.

**संभाजीराजे :** ( तडफदार सेनापतीचे भान घेत ) रुपाजी, तुम्ही मानाजी–संताजींच्या मेळानं तपे नाशकात उतरा. साल्हेरचे हंसाजी आणि रामसेज, सोनगड, त्रिंबकची ठाणी तुमच्या दिमतीला राहतील. ध्यानी ठेवा, तुमची फौज गाठीची आहे. तिला केव्हाही उगवतीला वऱ्हाड–खानदेशात आणि मावळतीला जव्हार किनारपट्टीत उतरावं लागेल. ( बहिर्जीला ) रुपाजींना खबरदारीची काही दखल–सूचना नाईक ?

**बहिर्जी :** ( रुपाजीकडे बघत ) कुटं बी असा रुपाजी, पर समदीकडं गाजती हूल ठिवा की फौज सुरतंवरच उतारनार हाय म्हून. म्हंजी सुरतंचं मोंगली ठानं त्या धकीनं जागीच ऱ्हाईल दबून. आली चाल ध्येनात भोसलं ?

**रुपाजी :** व्हय नाईक. उमागलो आम्ही. ( राजांना ) घेतली जोखम धनी आम्ही तपे नाशकाची.

**संभाजीराजे :** निळोपंत, तुम्ही जव्हार–मनोर–गणेशगाव धरून रुपाजींना बगल-बळ देणे आहे. दादाजी–प्रभू, तुकोजी यांची जोड घेत सुधागडपासून कल्याण पावेतो दौडते राहणे आहे तुम्हास. सिद्दी उचल खाऊ म्हणेल त्यास बरे जरबेत राखून ठेवणे.

**निळोपंत :** जशी कलमाची करू तशीच हत्याराचीही चोख सेवा करून दावू आम्ही स्वामींना. आजच निघू आम्ही जव्हारच्या रोखानं.

**संभाजीराजे :** कवी-कुलेश—तुम्ही कंक—बांदलांचा जमाव घेऊन आजच कूच व्हा फिरंगाणाकडं. फोंडा—भीमगड प्रांतात ठाण होऊन—फिरंगी—फिरक घेऊ म्हणेल—त्यास दबीत ठेवणे आहे.

**कवी कुलेश :** जी. आम्ही आजच उतरू रायगड. कंक—बांदलांच्या जमावा-निशी प्रसंग पडला तर देहाचं कदंबफुलच ठेवू स्वामी कार्यावर !

**संभाजीराजे :** म्हलोजीबाबा, तुम्ही कऱ्हाडचे बेंकाजी रुद्र, सातारचे अंबाजी मोरदेव यांची जोड घेत मिरजेच्या आदिलशाही ठाण्यावर बरे लक्ष ठेवून असणे.

**म्हलोजी :** पन्नाळा, सातार, कराड या मागानं रातध्याड आमचं घोडाईत दौडत राहतील धनी. मिरजेची धास्त ती येवडीशी बी नगा करूसा. बरं दाबून ठेवू त्ये आदिलशाही ठाणं आमी.

**संभाजीराजे :** ( हंबीररावांना ) सरलष्कर, तुम्ही—तुम्ही आनंदराव, केसोत्रिमल, नागोजी वल्लाळ, धनाजी अशा मातब्बर शेलक्यांसह थेट वऱ्हाड—खानदेशातच उतरा आता ! तीस हजारांची बांडी फौज दौडेल तुमच्या टापांच्या मागानं. वऱ्हाड—खानदेश चटक्या छाप्यांनी टापांखाली घ्या. ( बहिर्जीला ) नाईक, हंबीररावांना काही खबरदारीची दखल—सूचना ?

**बहिर्जी :** ( हंबीररावांना ) सरलष्कर, चारी बाजवांनी अवरंगाबादेलाच घाला भ्या ! वाटावं की अवरंगाबादेवरच येताय जनू ! आमची जासुदं फकीर पेहरा-वानं तशीच भूल देतील मोगलाईत की " मरहट्टे शाही औरंगाबाद लुटनेवाले है " कसं ? पटलं का ?

**हंबीरराव :** बेमालूम ! बघा तर नाईक. आता रायगडावर थाळा घेतला—तर हात धुवाय खानदेशातल्या गिरणा नदीकाठीच दिसू आम्ही !

**संभाजीराजे :** वऱ्हाड राखण्यासाठी आणि औरंगाबाद जपण्यासाठी मोगली फौजा आपलं मातब्बर ठाणं ( थांबतात ) मातब्बर ठाणं बऱ्हाणपूर सोडतील. ते—तेच मारून चालवणे आहे खुद्द आम्हास ! ! ( सूचक वाद्य झपकार—सारे सदरकरी ' बऱ्हाणपूर ' म्हणत मान डोलावतात. ) आमच्या महाराजसाहेबांनी ' सुरतेची ' ' बेसुरत ' केलीच आहे. एकदा नव्हे दोनवार. आम्ही—आम्ही

करू ‘ ब्‍ऱ्हाणपूरचे ’ ‘ विराणपूर ’ ! खासा आम्ही जातीनं उतरू बागलाणात या आमच्या दूधभाऊ राया अंतासह. तुमच्या जोडीनं ब्‍ऱ्हाणपूर टापेत घेऊ हंबीरराव. ( टाळा वासून बघतच राहिलेल्या बहिर्जीस ) आम्हास काही खबरदारीची दखल सूचना नाईक ?

**बहिर्जी :** ( टाळा मिटत ) जी व्हाई !—निगतो म्याच आता ब्‍ऱ्हानपुराकडं ! ( वाकून ) जुहार. ( झपाझप जातो. )

**संभाजीराजे :** ( परडीतील भंडार मूठ भरून घेतात. ती मूठ उंच उठवितात ) हे राज्य व्हावे हे तो श्रींचे मनी फाऽर फाऽर आहे. हंबीररार, कवी कुलेश, निळोपंत होऊ द्या तुमच्या मनाजोगे बागलाणपासून—कारवारपर्यंतची ही मराठी दौलत आम्ही नाही तटू-तुंबू देणार ! तुम्हा सर्वांच्या पाठबळावर ती राबतीच करू ! करा—राज्याभिषेकाची सिद्धता करा ! ! जय भवानी ! जय भवानी ! ! ( सादरकरी मूट उंचावून जोड देतात. )

**सर्वजण :** जय भवानी !!! ( हातची भरली मूठ रंगमंचावर उधळतात )

( टापांची दौड, रणशिंगांच्या ललकाऱ्या. “ हरहर महादेव ”चे घोष असा टेप वाजतो. )

( दिवे जातात. )

[थोड्या वेळाने अंधारातच टेप वाजतो तो—सनया चौघडे—नगारे असे राज्याभिषेकाचे मंगल वातावरणी भान देणारा—त्यानंतर दोघा—तिघांच्या स्पष्ट उच्चारात आलटून—पालटून स्पष्ट अशा अथर्वशीर्षातल्या गणेशस्तवनाच्या मंगल पंक्ती ऐकू येता—

ॐ—गं—गणपतये नमः, त्वमेव केवलं कर्तासि,

( दुसरा आवाज ) त्वमेव केवलं धर्तासि—त्वमेव केवलं हर्तासि —

( पहिला ) त्वं ब्रह्मासि—त्वं गुणत्रयातितः, त्वं कालत्रयातितः !

( सर्व एकदम ) गं—गणपतये नमः ! गणपतये नमः नमः ॥

( रणशिंगे—संबळ—घंटानाद )

क्षणैक शांतता

मग संभाजीराजे अभिषिक्त छत्रपती झाल्याचे वातावरण निर्मिणारे अलकाबी आवाज दोन वेळा होतात—प्रत्येक ललकारीनंतर खणखणीत गुर्झब ( सोनेरी राजदंड पायरीवर आदळल्याचा स्पष्ट ‘ खण्णण् ’ असा आवाज उठतो ! )

अलकाब—

राजश्रिया विराजित, सकळ राजलक्ष्मीअलंकृत, गोब्राह्मणप्रतिपालक–हिंदुपद पादशहा–भोसले कुलावतंस–श्रीमन्महाराज–संभाजीराजे!

( गुर्झब )

पुन्हा तोच अलकाब— ( गुर्झब )

## प्रवेश तिसरा

( तोच खासेवाड्याचा महाल. महालात निळोपंत, कवी कुलेश, हंबीरराव आहेत. निळोपंतांच्या हाती राजमुद्रेचा करंड आहे. एका लाकडी चौरंगीवर दुसरा तसलाच करंड येसूबाईच्या मुद्रेचा आहे. भरजरी राजवेषात संभाजीराजे प्रवेशतात. त्यांना तिघेही मुजरे करतात. ते स्वीकारून राजे मध्ये येतात. तशी—)

**निळोपंत :** थोरल्या स्वामींच्या अभिषेकाची याद देणारा–स्वामींचा राज्याभिषेक यथासांग—निर्वेध पार पडला.

**हंबीरराव :** सुख पावून पावणं–रावळं मरातबात परातलं गावोगाव. केवडं भाग्याचं आमी की–दोन्ही आभिषेक डोळयादेकतच झालं साजरं आमच्या.

**कुलेश :** ( लवून ) धन्य–पावन झालो आम्ही! पारणे फिटले नेत्रांचे आमच्या. झळझळत्या सुवर्णी सिंहासनावर मंत्रघोषात आरूढ झालेल्या स्वामींना बघताना —आम्हास वाटलं—वाटलं—

**संभाजीराजे :** ( दिलखुलास मंद हसत ) जे तुम्हास वाटलं ते अवघ्यांस वाटून टाका–छंदोगामात्य. कविराजांचा वसाच असतो तो—बोला.

**कुलेश :** ( कवीचं भान घेत ) वाटलं—वाटलं झळझळीत मैनाक पर्वताच्या उंचच उंच कड्यावर नखाग्रांची भक्कम पकड घेत–साक्षात पक्षीराज गरूडच बसला आहे—सुवर्णी बाणाचा–वरच्या फक्त सूर्याशी नातं सांगणारा!!

**निळोपंत :**<br>**हंबीरराव :** } वाहवाऽवाहवा कवीराज! एऽहे रे ऽ फाकडे!

**संभाजीराजे :** ( त्या दोघांनाही हातानं शांतवत ) छे ऽ! छंदोगामात्य, हे रोजच्या

सादिल बोलभाषेत सांगितलंत तुम्ही! पडताळा येऊ द्या जरा आमच्या सर-लष्कर-पेशव्यांना की तुम्हास रास्त रीतीनंच केलं आहे आम्ही "छंदोगामात्य" शायरी-मिसाल सुनवा बघू याच मतलबाचा-याच घडीला-ताजातवाना—

**कुलेश :** ( क्षणैक विचारात-मग उपरणे सावरत ) सुनिये-सुनिये महाराज—शायरी मिसाल सुनिये—इसी मतलबका!

"आपने—आपने जाकर निकट छुआ है
धरतीके उच्छ्‌वासको!
और—और—
आपने-आपने जाकर निकट छुआ है—
( थांबतो ) निकट छुआ है—
सूरजके प्रकाशको!!

**संभाजीराजे :** ( खूष होत ) वाहवा ऽ वाहवाऽ-बहोत खूष-कवीराज ( गळ्यातील कंठा काढून कवींच्या हाती ठेवतात ) तुमच्या-तुमच्याच जोडसाथीनं बांधणार आहोत आम्ही एक काव्यग्रंथ "बुधभूषणम्" नावाचा-आमचे थोरले महाराज-आमचे आबासाहेब—यांचे गुणवर्णन करणारा-संस्कृतच्या कर्णमधूर देवबोलीत—

**कुलेश :** त्या बुधभूषणमूच्या रचनेचं काही चिंतन-मनन झालंच असेल महाराजांच्या कवीमनी. आम्ही नाचीज ते ऐकायला पात्र वाटत असू तर-तर ऐकवावं स्वामींनी या शुभसमयी काही. कान पावन होतील आमचे.

**संभाजीराजे :** ( विचारगत होऊन-हंबीररावांना ) हंबीरराव—तुम्ही-तुम्ही जुने जाणिते. तुम्ही फार जवळून पाहिलंय-निरखलंय आमच्या थोरल्या महाराज-साहेबांना-सांगाल त्यांचा गुण स्वभाव थोडक्या करिन्यात!

**हंबीरराव :** ( आठवत ) धन्यांचं थोरलं म्हाऽराज—म्हंजी—शहाजीराजं-त्ये म्हनताना—हुतं की—दर्यावानी ताकदवर—मशहूर—उदार—आन् हत्यारबाज—

**संभाजीराजे :** ( कवीचे भान घेत ) ऐका, कवीराज-हेच-आमचे थोरले महाराज -देवबोलीत केवढे साजून दिसतात ते—

"भृशत्-बलान्वय—सिंधु सुधाकर:" म्हणजे सिंधुसागरासारखे उमाप ताकदवर.

" प्रथितकीर्त—उदार—पराक्रमः "—म्हणजे कीर्तिवान, उदार आणि पराक्रमी—( पुन्हा जोडून ) " भृशत् वलान्वय सिंधुसुधाकरः प्रथितकीर्त उदार पराक्रमः ! ! "

( सर्वच ' सुंदर, भले—वा ' अशी दाद देतात )

**संभाजीराजे :** ( निळोपंतांना ) निळोपंत—मोरोपंतासंगती तुम्ही तर आमच्या आबासाहेबांना कैकवार निरखलं आहे अगदी नजदीकीनं. करा बघू—अटकर खलिता सिद्ध करावा तसं—एकाच वाक्यात त्यांचं वर्णन !

**निळोपंत :** ( आठवत ) एकाच वाक्यात ? कै. स्वामी–म्हणजे–साक्षात शिवाजी महाराज—ते म्हणजे हेच की—काळालाही न डरणारे— धर्माची पिछाट बघून तळमळणारे—सर्वांची तापदरा निपटण्यासाठीच अवतरलेले—ज्यांचं नुसतं नाव घेतलं तरी तोंडी हेच येतं की—शिवछत्रपतींचा— विजय असो ! फत्ते असो !

**संभाजीराजे :** ( पूर्ण अभिमानी भान घेत ) छंदोगामात्य कवी कुलेश, सरलष्कर हंबीरराव—पेशवे निळोपंत, हेच आमचे आबासाहेब संस्कृतच्या सोनचोलीत कसे देखणे दिसतील—ऐका जरा निसबतीनं—

" कलिकाल भुजंगम् अवलिंढ "—म्हणजे कलिकालाच्या भुजंगाला पचविलेले—

" निखिल धर्मम्—अवेक्ष्य विक्लवं यः " म्हणजे अखिल धर्माची हीनावस्था बघून विव्हळ झालेले—

**कुलेश :** ( पूर्तता करीत ) " जगतः पतिरंशतोवतापः अवतिर्णः " म्हणजे जगाचे ताप हरण्यासाठीच अवतरलेल्या—

**संभाजीराजे :** वहोत खूब—थोडे थांबा कवीराज. आता आम्हा हाती द्या पुढची काव्यचाल !—त्या शिवछत्रपतींचा विजय असो ! फते असो—हीच बांधणी ना ? ऐका—

" स शिवछत्रपति जयत्यजेयः !

जयत्यजेयः ! !

( कवी कुलेश भान न राहून ' वाऽखूब ' म्हणत टाळ्या पिटतात तसे हंबीरराव त्यांना त्या गैररिवाजाचे भान देताच–ते चमकून झटकन् हात बांधतात. )

**सभाजीराजे :** ( हंबीररावांना ) मामासाहेब, यासाठीच तुम्ही हमेशा संगतीत असावेत असं वाटतं आम्हास. ( दोघेही हसतात. )

**हंबीरराव :** आमी काय–मैदानावयली रांगडी मान्सं धनी–तुमचं ह्ये काव्य का काय म्हन्ताय त्ये उमगतंय-जचतंय आमास्नी–पर बांदायचं म्हटलीसा तर न्हाई जमायचं त्ये. असंना का या निमित्तानं तरी सहजी–सबागती आमास्नी " मामासाब " म्हनलासा ! जिक्तं तुमचं ह्ये गानं भावलं त्यापरास आमास्नी " मामासाब " म्हटलसा ह्ये भावलं.

**निळोपंत :** ( करंड पुढे धरत ) आणि महाराजांना हे भावावं—

**संभाजीराजे :** ( करंड घेत ) काय आहे हे पेशवे ?

**निळोपंत :** महाराजांची सिद्ध झालेली राजमुद्रा. ( संभाजीराजे करंड खोलून मुद्रा निरखतात. पुन्हा पेशव्यांकडे देत )

**संभाजीराजे :** वाचा–निळोपंत, तुम्हीच वाचा ती एकदा.

**निळोपंत :** जी. ( मुद्रा निरखत )

" श्री शंभो शिवजातस्य मुद्रा द्यौरिव राजते !
यदंक सेविनो लेखा वर्तते कस्य नोपरी ? "

**कुलेश :** ( पसंतीनं ) सुरेख–केवढा मतलब !

" शिवपुत्र शंभूराजांची ही राजमुद्रा शोभून दिसत आहे—
राजअंकित अशा या मुद्रेची अधिकारसत्ता कोणावर बरे चालत नाही ? "

**निळोपंत :** ( चौरंगीकडे हातरोख देत ) महाराणींची ही राजिमुद्राही सिद्ध झाली आहे. स्वामींनी स्वहस्तेच द्यावी ती महाराणींना—( रायाजी पाठीमागे मध्यम-उतार वयस्क धाराऊसह प्रवेशतो—धाराऊला बघताच संभाजीराजे झटकन् पुढे जताना— ) " कोण ? धाराऊ ? तुम्ही ? तू ? " असं जिव्हाळ्यानं ऐकू येईलसं पुटपुटतात. पुढे होऊन आदरानं तिची पायधूळ टोपावर घेतात. धाराऊ वाकून गावरान निकोप मायेनं ' आलाबला ' घेते. धाराऊ संभाजी राजांची दूधआऊ आहे. ती राजांना खांद्याला धरून उठविताना— )

**धाराऊ :** माझ्या ल्येकरा रं तू. क्येवढ्याचा क्येवडा जालास म्हन्ता म्हन्ता. जुंधळ्याच्या घाटागत उच्चनिच. राजा जालास म्हनं. ( पुन्हा कानशिलावर बोटं मोडून आलाबला घेत ) आऊक्षवंत हू. सारथीक जालं बग माझं–तुला दूद पाजल्याचं.

**संभाजीराजे :** आऊ–धाराऊ, आम्ही 'राजे' झालो ते तमाम मावळ-मराठी रयतेसाठी. तुझ्यासाठी आम्ही तेच आहोत. तुझ्यासाठी आम्ही तेच आहोत– "बाळसंबु !" आमच्यासाठी तू–तीच आहेस. आम्हास बचपनी दूध पाजणारी आमची दूधआऊ–आमची धाराऊ. तुला बघितलं की आम्हास सय येते ती प्राजक्ताच्या फुलवंत, सत्त्वशील अशा देवझाडासारख्या आमच्या थोरल्या मासाहेबांची !

**धाराऊ :** ( जिजाबाईंच्या आठवणीनं ) तुजी थोरली जाऊ ! ल्येकरा, जगदंबला नवरात्रात पडल्यालं गोमटं सपान हुतं त्ये. आम्हासारी मान्सं काय पावसाळी आळंब्यागत ! कुटं थोरल्या आऊ–अन् कुठं म्या ?

**संभाजीराजे :** ( रायाला ) राया धाराऊ, ठकल्येय आता–नीट निसबतीनं देखभाल घ्या तिची.

**राया :** ( लवून ) जी धनी, पर ती ऐकतीया कुटं ? आताच धोसरा धरलाय तिनं–गावाकडं–कापूरहोळाकडं–चल म्हनून.

**संभाजीराजे :** ( धाराऊजवळ येत ) का कंटाळलात आम्हास आऊ ? ( रायाकडे हातरोख देत ) हाच मुलगा तुमचा ? आम्ही कुणीच नव्हे ?

**धाराऊ :** तसं न्हाई रे ल्येकरा. अजून ल्हान हाईस ! न्हाई कळायचं तुला. जितं कुस उजावते त्या जागंला ध्याई ठेवण्यासारकं सारथीक न्हाई बाईच्या जन्माचं दुसरं ! जाऊ दे मला होळाकडं राजीखुषीनं.

**संभाजीराजे :** जशी मर्जी तुमची आऊ ... सरलष्कर, आऊसाठी मेण्याचा इंतजाम करून घ्या. आम्हास आशीर्वादी बळ दे तुझ्या गावरान निकोप मायेचं आऊ !

( संभाजीराजे पायधूळ पुन्हा घेतात. "आऊक्षवंत हू. सायवळ हूं." म्हणत धाराऊ आशीर्वाद देते–रायासह जाते. )

**संभाजीराजे :** ( चौरंगीजवळ जाऊन करंड उचलतात–तो खोलणार तोच वर्दी येते— )

**वर्दीदार :** गणोजीराजं शिर्के येताहेत ! ( सूचक वाद्य )

**संभाजीराजे :** निळोपंत–राजे शिर्क्यांना द्या पेश पाठवून—

**निळोपंत :** जीऽ ( जातात. जाताना आपल्या हातची राजमुद्रा चौरंगीवरच्या राजमुद्रेजवळ ठेवून जातात. )

**कुलेश :** आम्हीही निघतो स्वामी.

**संभाजी :** या–पण ऐकून जा कविराज—आमच्या राजमुद्रेची सत्ता चालत नाही ती या धाराऊवर आणि आमच्या राणीसरकारवर—श्रीसखीवर! या आता—

( निघालेल्या हंबीररावांना हातानेच थांबवतो. गणोजी प्रवेशतो. हंबीररावांकडे बघून नाखुषीनेच )

**गणोजी :** मोहितं रामराजांच्या महाली दिसायचं ते लई करून छत्रपतींच्याच महाली दिसत्यात आजकाल!

**संभाजीराजे :** या गणोजीराजे, एकसारखा शिर्काणात जायचा काय घोसरा धरला आहे तुम्ही?

हंबीरराव : आल्यासारं चार दिस ऱ्हावा गडावर राजं.

**संभाजीराजे :** ( जवळ जात ) आमच्या अक्कासाहेबांची तब्येत कशी? त्यांचे वाळशिर्के काय म्हणतात?

**गणोजी :** सुक्षेम आहेत सारी अभिषेक झाला आता निघावं म्हणतो आम्ही.

**संभाजी :** घाई का अशी? थांबा थोडे. आमच्या हरजीराजे महाडिकांना दिली तशी तुम्हालाही द्यावी म्हणतो एक कामगिरी जोडून आम्ही.

**गणोजी :** ( अंदाज घेत ) अशी कुठली मोलाची कामगिरी दिली जोडून छत्रपतींनी हरजीराजांना?

**हंबीरराव :** हरजीराजं म्हाडीक सरसुबा म्हनून कलंच झालं कूच फौजांनिशी–प्रांत कर्नाटक राखाय. जगदीसुराच्या देवळात शिवपिंडीवयलं ब्येलपान उचलून जोखमच पत्करली त्येनी राजांम्होरं कर्नाटकाची. आता बगू या तुम्हावर काय पडतिया जोखम ती!

**गणोजी :** ( हंबीररावांकडं तिरस्कारानं बघत ) छत्रपतींशी एकांती बोलायचा मनशा आहे आमचा. हे मोहितं जरा—

**संभाजी :** ( समज देत ) राजे गणोजी हंबीरराव दौलतीचे 'सरलष्कर' आहेत! 'मोहितं,' मोहितं काय म्हणता मघापासून त्यांना? रीतसर रिवाजी 'सरलष्कर' म्हणा. जे सांगणे असेल ते त्यांच्या हुजुरातीनं सांगा.

**गणोजी :** ( चरफडत ) ह्ये सरलष्कर हाईत आणि आम्ही कुणीच का नव्हतं छत्रपतींचे? खरं तर छत्रपतींचे मेव्हणे म्हणून, आम्ही येताच रिवाजी मुजरा

द्यायला पाहिजे होता त्यांनी आम्हाला!

**हंबीरराव :** आमी निगताव म्हाराज. 'घरचा' मामला हाय ह्यो—एकांतीच करावी निर्गत म्हाराजांनी त्येची (जायला निघतो. जाताना गणोजीकडे बघत) राजे गणोजी, या हंबीररावाची गर्दन झुकली ती कुलदेवी वाघजाई नि भवानी-म्होरं, दुसरी झुकली ती मराठी दौलतीच्या राजमंडळाम्होरं. मूर्तीला घालतात तसा न्हाई घालत कुनी दंडवत तिच्या भवतीच्या दगडी घुमटीला!! (राजांना मुजरा देत जायला निघतो.)

**संभाजी :** (कड घेत) थांबा, तुम्ही नका जाऊ असे तडकाफडकी मामासाहेब!

**गणोजी :** (आश्चर्याने) मामासाहेऽब! बरीच मजल मारलीय की मोहित्यांनी अं – म्हणजे सरलष्करांनी!

**संभाजी :** (समज देत) मतलबाचं बोला गणोजीराजे – आणि तेही तेढीनं नको – साफ साफ बोला.

**गणोजी :** तेच बोलाय आलोय आम्ही. आमचा निवाडा तेवढा द्यावा छत्र-पतींनी – की आजच उतरू आम्ही रायगड.

**संभाजी :** निवाडा? कसला निवाडा म्हणता राजे? खोलून बोला.

**गणोजी :** (पाठमोरा होत) शिरकाणाचं आमचं पिढीजात वतन तेवढं 'छत्रपती' म्हणून मोईन करावं. शिर्के मोर्तबाचं वतनपत्र द्यावं आम्हास.

**संभाजी :** (चमकून) क्काय? म्हणता काय तुम्ही राजे? वतन?

**गणोजी :** व्हय. वतनपत्रच! शिरकाणाचं! 'थोरल्या' छत्रपतींनी दिला शब्द, त्यांनी नाही – निदान आता तरी पाळावा तो 'धाकल्या' छत्रपतींनी!

**हंबीरराव :** (संतापून) शिर्के, जबान तोलून वापरा!

**संभाजी :** (समजुतीनं) शब्द? कसला दिला होता शब्द. आमच्या आबा-साहेबांनी राजे? केव्हा? तपशीलानं बोला.

**गणोजी :** छत्रपतींचा नि आमचा साट्यालोट्याचा लग्नसंबंध झाला. याद असेलच याची छत्रपतींना! त्या वख्ती थोरले महाराज बोलले होते की, आमच्या राजकुंवरबाईच्यापोटी 'बाळशिर्के' उपजले की देऊ आम्ही—शिरकाणाचे वतन त्यांच्या नावे नामजाद करून. दिला शब्द पाळण्यापूर्वीच थोरले छत्रपती गेले. धाकल्यांनी तरी पाळावा तो आता! वतनपत्र द्यावं आम्हास—की निघालो आम्ही याच पावली शिरकाणात!

**संभाजी :** ( समजावीत ) गणोजीराजे, असे हट्ट हमरीवर नकात येऊ. जरा सबुरीनं घ्या. जसे तुम्ही आहात, तसे हरजीराजे आहेत – कैक नातलग आहेत आमचे – साऱ्यांनीच अशी वतनं मागायचं म्हटलं तर – तर दौलतीचा या हिंदवी स्वराज्याचा चावरभर हिस्सा तरी येईल का कुणाच्या वाट्यास ? जरा चौफेरानं जाणती नजर टाकून बघा दौलतीवर – गनिमच गनिम नाही का दिसत चौअंगांनी दाटून आलेला ?

**गणोजी :** याचं भान जसं छत्रपतींना आहे तसं आम्हा वतनदारांसही बरं आहे. आम्ही वतनदारांनीच तर धरला आहे रोखून चौवाटांवरचा गनिम हत्यारी बळावर !

**हंबीरराव :** शिर्के, लई ऐकलं तुमचं. रातध्याड जीव पाखडत दौडताहेत म्हाराजांचे रूपाजी, मानाजी, खंडोजी, कोंडाजी अशा असामी मुलुखभर— म्हून तर तुमी वतनेदार सुक्षेम तगून तरी हाईसा. राजं ह्यो वखुत न्हाई धन्या कडं काही मागणं घालायचा. ह्राय त्यो जमंल ती हत्यारी चाकरी पायी ठिवायचा. तुम्हावानी आमीच घातली गळ की द्या तोडून आमास्नीबी तळ-बीडाचं वतन म्हणून तर ?

**गणोजी :** ( त्यांचे बोल फेकून देत ) आम्ही छत्रपतींशी बोलतोय. त्यांनाच देऊ द्या काय द्यायचा असेल तो निवाडा.

**संभाजी :** गणोजीराजे, मामासाहेब म्हणतात त्यात गैर काय आहे ? सवते वतन ते कोणासही देऊ नये हे आबासाहेबांचे धोरणच होते. म्हणून तर शृंगारपूरच्या सुर्व्यांचे वतन त्यांनी मोडून काढले. त्याच मुलखाची ‘ देखरेख ’ तुम्हा शिर्क्यांना दिली. आम्ही ती तशीच चालवू. त्याहून अधिक-तुम्ही घरचे म्हणून योग्य मगदूराची वाढती जागा तुम्हास देऊ. समजून घ्या हे सारे. घरचे आहात तुम्ही ! समय नाही हा वतनाची मागणी घालणेचा.

**गणोजी :** म्हणजे या बोटावरची थुंकी त्या बोटावर—आणि तीही छत्रपतींनी केली तरी चालते असं म्हणावं काय आम्ही ?

**संभाजी :** नीट पचनी पाडून घ्या राजे. आज—आज आबासाहेब असते तर त्यांनी जे राजधोरण म्हणून केले असते तेच समजुतीने सांगतो आहोत आम्ही. सवते म्हणून वतन—मग ते कोणासही असो—देणे दौलतीस परवडणारे नाही आज ते होणे नाही—कदापि होणे नाही !

**गणोजी :** मतलब काय याचा ? 'भोसल्यांनी' दिला शब्द परतला असंच समजायचं काय आम्ही ?

**संभाजी :** ( कडाडत ) खामोऽष शिर्के, भोसले जबानीनं बांधलेले आहेत ते फक्त जगदंबेला. या गोरगरिबांच्या 'श्री'च्या राज्याला !

**गणोजी :** आम्ही समजलो काय समजायचं ते ! निघताव आम्ही. आता पाणीसुद्धा घ्यायची इच्छा नाही या गडावर—जिथे 'बापजाद्यांनी' दिला शब्द 'बेटे' पाळत नसतात ( वळून तरातर जायला निघतो. चौरंगीला त्याचा धक्का लागतो. राजमुद्रेचे करंड कोसळतात. ).

**हंबीरराव :** ( समज देत ) शिर्के, रिवाज -हातोय. लई हुतंय हये.

**गणोजी :** हॅऽ—रिवाज ? तो तुम्ही द्यायचा सरलष्कर म्हणून ! हो तर 'मामासाहेब' म्हणून साष्टांगीनं दंडवतसुद्धा ! 'घुमट' कुठली आणि 'मुरत' कुठली याचा वखतच देईल निवाडा. द्यायचा तिथंच देऊ आता रिवाजी मुजरा आम्ही !

( निघून जातो. "ही मजाल ?" म्हणून हंबीरराव तलवार उपसून त्याच्या रोखानं धावू लागतात. )

**संभाजी :** ( त्यांना थोपवत ) सबूर. पीछे हटा. शांत व्हा मामासाहेब. दगडा खाली हात गवसावा तसा आहे हा गुंता. आमच्या श्रीसखींचे बंधू आहेत ते सख्खे. युवराज्ञींना काय वाटेल ह्या झाल्या प्रकारानं तेच समजत नाही आम्हास.

**हंबीरराव :** ( पडले करंड पुन्हा चौरंगीवर ठेवत ) बरं -हाई घडलं हे धाकलं. कशी म्हनावी ही मानसं तरी—कु-हाडीच्या दांड्यागत !

**संभाजी :** ( पूर्ण विश्वासाने ) आम्ही ठेवू यांच्यावर बरी नजर—जशी आबासाहेबांनी ठेवली होती व्यंकोकाकांच्यावर.

**हंबीरराव :** काही -हाई उमगत. निघताव आम्ही धाकलं धनी. आमच्या परीनं महाराणींची समजूत पाडावी म्हनताव याबाबत. ( मुजरा जातो. राजे विचारगत पायफेर घेत असताना )

**निळोपंत :** ( प्रवेशून ) समर्थशिष्य दिवाकर गोसावी आलेत गड चढून. बुवांचा काही खास मतलबाचा खलिता आहे स्वामींना ( वाकून अदबीनं खलिता संभाजीराजांच्या हाती देतात. ).

संभाजी : ( तो मस्तकी लावताना ) समर्थ ! फारा दिवस दर्शन झाले नाही बुवांच्या चरणांचे ( पुन्हा परत देत ). वाचा निळोपंत, वाचा समर्थांचे रामबोल वाचा.

निळोपंत : जी आज्ञा ( खलिता मस्तकी लावतो. खोलतो, वाचतो. )

" अखंड सावधान असावे । दुश्चित कदापि नसावे ।
तजविजा करीत बैसावे । एकांतस्थळी ।
काही उग्रस्थिती सांडावी । काही सौम्यता धरावी ।
चिंता लागावी पराची । अंतर्यामी ।
मागील अपराध क्षमावे । कारभारी हाती धरावे ।
( थांबतात )

संभाजी : ( त्यांना धीर देत ) वाचा पंत—" कारभारी हाती धरावे "—पुढे

निळोपंत : " सुखी करोनी सोडावे कामावरी ! "

संभाजी : ( हात उठवून ) थांबा पंत. सांगा. तुम्हास—तुम्हास वाटतो आम्ही उग्र ? ( निळोपंत नकारी मान डोलवतात ) मग का लिहिले असावे समर्थांनी हे असे आम्हाला ? काही अंदाज ? का वाटलो असावे आम्ही त्यांना तरी 'उग्र' ? बोला—

निळोपंत : जी—नाही मती चालत.

संभाजी : त्यांचा तरी काय दोष असणार हे असे लिहिण्यात पंत ! सज्जनगडावर जे त्यांच्या कानी आले त्यास धरूनच केला आहे हा बोध त्यांनी ! सांगा. कटकरी सर्वांहाती आम्हीच कैद होतो तर ! कोण मतलबाचा लिहिते समर्थ आम्हास खलिता ? काही अंदाज ?

निळोपंत : ( हातचा खलिता थरथरतो—चाचरत ) जीऽजी याबाबातही काही चालत नाही मती.

संभाजी : ( हसत ) साफच नाही का पंत ? काही प्रसंगच आला नसता समर्थांना खलिता लिहिण्याचा. असो. वाचा.

निळोपंत : ( पूर्ण सावधपणे वाचू लागतो )

" पाटातील तुंब निघेना । तरी मग पाणीच चालेना ।
तैसे जनांच्या मना । कळले पाहिजे ॥
जनांचा प्रवाहो चालिला । म्हणजे कार्यभाग आटोपला ।

जन ठायी ठायी तुंबला । म्हणिजे खोटे । ”

**संभाजी :** ( हाताने थोपवत–उठून ) समर्थ, पाटातील तुंब उखडून काढण्यासाठी हात घातलेच आहेत आम्ही. आमचे हे दोन हात त्यासाठी नाही पुरे पडणार. हे हात हयातभर पाण्यातील तुंब काढण्यासाठी, पाणी खेळते राखण्यासाठी राबवावे लागले तरी राबवू आम्ही. संत—महंत, लढवय्ये कलमबाज, खबरे साऱ्यांना राजी राखण्यासाठी हर कोशीस करतो आहोत आम्ही. भवती टपल्या गनिमांबाबत सावधच आहोत, एक खरे आहे—उणे—उणे बाऊगे काही नाही सोसवत आमच्या वृत्तीस. साफ बोलून दावतो ते आम्ही उखडून काढतो. ( मान डोलवून ) नाही पंत—कसा पोचावा आमच्या मनाचा हा ठाव सज्जनगडावर समर्थ—चरणापर्यंत !! असो वाचा—पुढे वाचा.

**निळोपंत :** आहे तितुके जतन करावे । पुढे आणिक मेळवावे ।

म्हाराष्ट्र राज्यचि करावे । जिकडे तिकडे ।

( बहिर्जी प्रवेशतो. त्याच्या हाती तोंडल्याची टोकरी आहे. )

**बहिर्जी :** मोकळ्या हाती जोहार देत ) धनी, खबर हाय !

**संभाजी :** या नाईक बहिर्जी बोला.

**बहिर्जी :** वऱ्हाडातनं ही तोंडल्याची टोकरी धाडून नागोजी बल्लाळांनी सांगावा दिलाय धनी—

**संभाजी :** काय मजकुराचा ?

**बहिर्जी :** जेवढी तोंडल्याची फळं हाईत तेवडा गाव कब्ज झाला वऱ्हाडात म्हून ! ( टोकरी चौरंगीवर ठेवतो. निघून जातो. )

**संभाजी :** ( टोकरीजवळ जाऊन एक तोंडले उचलतात–स्वतःशीच ) जितुकी फळे–तितुके गाव कब्ज ! जगदंब–कृपा ! ( पुन्हा निळोपंतांजवळ येतात )

**संभाजी :** ( निळोपंतास ) वाचा पुढे पंत—समर्थबोलांनी कसा मनास अभिषेक झालासा वाटतो.

**निळोपंत :** शिवराजाचे आठवावे रूप—आठवावा साक्षेप

आठवावा प्रताप–भूमंडळी ।

शिवराजाचे कैसे बोलणे–कैसे चालणे—

सलगी देणे–कैसी असे ।

त्याहून करावे विशेष । तरीच म्हणावे पुरुष ।

याउपरी आता विशेष । काय लिहावे ॥

**संभाजी :** ( आपल्याच भानात ) आबासाहेबांचे रूप, चालणे, बोलणे, राज्यकारभाराची लगबग ती विसरूच कशी आम्ही समर्थ ? ती तर आहे अहोरात्र आमच्या धमन्यांतून रक्तमार्गी फिरती. जे जे शक्य ते ते करू आम्ही, पण केवढेही केले तरी " आबासाहेबांकडून विशेष ? " ते होणे नाही—होणार नाही. आम्हालाच काय कुणालाच ते शक्य नाही. नाही समर्थ, आम्ही आबासाहेब नाही, आहोत ती त्यांच्या रक्ताची केवळ एक सावली ! सावली आकृती व्हावीच कैसी ? ( थांबतो. फेर घेत )

समर्थ, आपल्यासारखे दुसरे समर्थ होतील ? आपण सिद्ध केल्या अकरा मारुतींना तरी आपल्या शिष्यगणांतून कधी ते बघायला मिळतील ? तेही होणे. नाही —होणार नाही. सृष्टीला तुमच्यासारखी, आबासाहेबांसारखी गोमटी स्वप्ने रोजाना नाही पडत. तुमच्या पिढीने घालून दिल्या पायवाटेने आखरी श्वासापावेतो चाललो तरी खूप. ते भाग्यही काही कमी मोलाचे नाही. आपले–आपले हे आशीर्वाद आम्हास शिरसावंद्य आहेत समर्थ. ( हात जोडून मस्तकी नेतात ) निळोपंत, समर्थशिष्य दिवाकर गोसाव्यांची जातीनं व्यवस्था बघा तुम्ही.

**निळोपंत :** एक खास खबर आहे—आज्ञा होईल तर—

**संभाजीराजे :** बोला निळोपंत, कोण खास वजेची खबर ?

**निळोपंत :** अजमेरच्या मैदानावर औरंगजेब आणि त्याचा बंडखोर शाहजादा अकबर यांची घनचक्कर लढाई झाली. शाहजादा शिकस्त खाऊन—नर्मदा ओलांडून आपल्या मुलुखात आसऱ्याला आला आहे. खलित्यावर खलिते येताहेत शाहजादा अकबराचे. भेट मागतो आहे स्वामींची. काय कळवावे ?

**संभाजीराजे :** बंडखोर शाहजादा अकबर ! पंत, तुम्ही त्यास पहिला नजराणा पाठवा–कळवा–" सांप्रत—कार्यव्यापात गुंतून आहोत. समय–सोय पाहून भेट घडवीतच आहोत. "

**निळोपंत :** जी आज्ञा. निघतो आम्ही ( मुजरा. जातो. )

( रंगमंचावर हाती महाराणींचा 'मुद्राकरंड' घेऊन तो निरखण्यात राजे गढले आहेत. तो येसूबाई प्रवेशतात. )

**येसूबाई :** कोण राजकारणी खयालात डुबली आहे स्वारी एवढी ?

**संभाजीराजे :** ( चमकून ) अं—होय खयालातच. म्हणताय तसंच एका राज-

कारणी गुंतव्याच्या उकलीत.

**येसूबाई :** भरोसा असेल की आम्ही सुचवू काही "उकल" आणि विश्वास असेल की तो राजकारणी गुंतवा ऐकण्यास आम्ही पात्र आहोत—तर सांगावा स्वारीनं तो आम्हास ?

**संभाजीराजे :** ( विचारगत ) काय करावा कैद केल्या सुरनीस—अण्णाजी आणि न्यायाधीश प्रल्हाद—निराजींचा निवाडा तेच नाही उमगत आम्हास. आबासाहेब असते तर काय करते ? मागणं घालत होतो आम्ही जगदंबेकडं. त्यासाठीच की—"आबासाहेबांसारखी न्यायाची बुद्धी दे या वख्ती."

**येसूबाई :** त्यापूर्वी आम्हीच घालतो आहोत एक 'मागणं' स्वारींच्या पायांशी !

**संभाजीराजे :** ( चमकून ) मागणं ? असं काय बोलता कोड्याचं ? मामला साफ खोला मनाचा !

**येसूबाई :** स्वारी—अभिषिक्त—आणि सुरनिस—न्यायाधीशांच्या वाड्यावर हत्यारी चौकी—पहारे हे विहित नाही—बिल्कुल नाही !

**संभाजीराजे :** ( आश्चर्याने ) काय—करावे काय म्हणता त्यांचे ? सोडून द्यावं त्यांना बाइज्जत ? केल्या गफलतीला काहीच सजा ना ठोठावता ?

**येसूबाई :** ( पदर सावरून—पक्के भान घेत ) सजा ना ठोठावता बाइज्जत सोडून द्यावे नव्हे—बाइज्जत मरातबाने पुन्हा पदरी घ्यावे ! ! ( सूचक वाद्य )

**संभाजीराजे :** मतलब ?

**येसूबाई :** थोरल्या मासाहेब असत्या तर त्यांनी जे अधिकारानं "करा" म्हणून सांगितलं असतं, तेच 'मागणं' म्हणून पायी ठेवलं आहे आम्ही स्वारीच्या ! ( थेट जिजाऊंच्या तोलदारीत ) सुरनीस—न्यायाधीशांसारख्या वकुब—हुन्नराच्या असामी काही घडवितो म्हटल्यानं नाही घडविता येत ! पुरात उफाळली आणि खरपूस नुकसान करून गेली म्हणून गाववेशीवरून काही नदी नाही उठवून लावता येत ! आपलीच माणसं चुकली तर सांगायचं कुणास ? दाद मागायची ती कुणाकडं ?

**संभाजीराजे :** पण राणीसाहेब.

**येसूबाई :** ( त्याच भानात ) ही माणसं आबासाहेबांची आहेत—वडिलधारी आहेत, मोठी आहेत. मोठ्यांच्या गफलतीही मोठ्याच असतात. म्हणूनच त्या

माफ करायलाही लागतं काळीज मोठं—ढालीएवढं! स्वारीनं ठरवून ते दाखवा-वंच आता—शिवाय—

**संभाजीराजे :** शिवाय काय—ना कचरता बोला— साफ बोला.

**येसूबाई :** शिवाय खुद्द स्वारींच्या बाबतीनं आबासाहेबांनी नाही का दाखविलेलं असंच थोर काळीज? घेतलं नाही का त्यांनी स्वारींना पदरी दिलेरच्या गोटाचा गोता खाऊन परतल्यावर! (संभाजीराजे बेचैन—सैरभैर होतात.)

**येसूबाई :** (तशाच चिकाटीनं) आबासाहेब असते तर त्यांचे पाय धरून हेच बोलली असतो आम्ही—"मागणं" म्हणून नव्हे—मुलींचा "हट्ट" म्हणून!

**संभाजीराजे :** (विचारच विचार दाटल्याने झपाझप चौफेर रंगमंच फिरतात. मग स्थिरावत) "काळजाच्या ढालीचा" दाखला देत आम्हा हाती झाल्या गैरवर्तनाची याद देणारा केवढा वर्माचा तलवारी वार दिलात हा आम्हास!

**येसूबाई :** (झटकन ओठावर तर्जनी ठेवत) आई जगदंबे—असं भलतंच काही आणू नये मनी स्वारीनं.

**संभाजीराजे :** (भारावून) केवढ्या गोमट्या बोलता तुम्ही—ठीक आहे घेतलं आम्ही—पुन्हा बाइज्जत मरातबानं सुरनीस-न्यायाधीशांना राज्यकारभारी! 'मागण' म्हणून नाही – रास्त सल्ला म्हणून. महाराणींची आज्ञा म्हणून. (मुद्रा—येसूबाईंच्यासमोर धरत) तुमच्या नावाची ही राजमुद्रा सिद्ध झाली आहे बघा केवढ्या गोमट्या जबानीस साजेशी (वाचतो) 'श्री सखी राज्ञि जयति!' (करंड येसूबाईंना देतात. येसूबाई तो खोलून बघताहेत. संभाजी-राजे सहज चालत बहिर्जीने ठेवलेल्या टोकरीतील एक पिकलं तोंडलं उचलतात, निरखतात. तसंच मुठीत पकडून येसूबाईजवळ येतात.)

**येसूबाई :** आमच्या दादासाहेबांना मात्र रास्त जाब दिला स्वारीनं वतनपत्राबाबत.

**संभाजीराजे :** पटला तुम्हास? चिंता निपटली आमची!! नाहीतर म्हटलं फेर काही 'मागणं' घालताय की काय?

**येसूबाई :** माणूस बोलतं ते 'मागणं' घालण्यासाठीच असं का वाटतं स्वारींना?

**संभाजीराजे :** (शब्द पकडत) समजा तसं झालं—आणि आम्हीच घातलं एक 'मागणं' तुम्हाकडं तर?

**येसूबाई :** जरूर करू त्याची आम्ही शब्दबर पूर्तता. मात्र ते सादिल असावं.

पार पाडता येणारं असावं. नाहीतर ' छत्रपतींचं ' मागणं म्हणजे—

**संभाजीराजे :** बिल्कुल सादिल आहे आमचं ' मागणं ' ( मुठीतील तोंडलं चिमटीत उचलून धरतो ) हे ' तोंडलं ' पाहिलंत ?

**येसूबाई :** ( निरखून बघत ) जी. याचा काय संबंध ?

**संभाजीराजे :** मुलुख कब्ज केल्याची खबर आणली आहे यानं ! आम्हास हे ' तोंडलं ' काटून दावाल खुद्द तुम्ही ?

**येसूबाई :** ( तोंडावर हात घेऊन हसत ) काय ' मागणं ' तरी स्वारीचं ! बऱ्हाणपूरपावेतो दौडणाऱ्यांना कसला पेच म्हणावा हा सादिल ' तोंडल्याचा ' तरी ! हे दाखवू आम्ही ते आत्ता काटून ! ( तोंडले घ्यायला पुढे जातात. )

**संभाजी :** ( गपकन मूठ मिटत ) अंहं—अट आहे एक ते काटण्यापूर्वी !

**येसूबाई :** अट ? ती कसली म्हणावी ? असं कोड्याचं काय बोलतेय स्वारी ? ( राजांच्याच ठेक्यात ) ' साफऽसाफ बोला '—म्हणजे ' बोलावं—स्वारीनं !'

**संभाजी :** होय साफ अटच. हे ' तोंडले ' काटताना हात वा हत्यार नाही वापरायचं तुम्ही ? आहे कबूल ही अट श्रीसखींना ?

**येसूबाई :** बस्स ! एवढेच ! कबूल ! बिल्कूल कबूल ! मामुली बाबत तर—आणि आव कोण ?

**संभाजी :** ( मिष्किलीनं ) हं—काटा बघू अटीबरहुकूम हे ' तोंडले '—हात वा हत्यार न वापरता ! ( चिमट येसूबाईसमोर क्षणैक नाचवून तोंडले आपल्या दातात धरतात ! )

( येसूबाई गोंधळतात—मग पुढे जाऊन तोंडल्याला हात लावून बघतात —तसे )

**संभाजीराजे :** ऊँ हूँ ( येसूबाई कमरेची कट्यार काढू बघतात. तसे संभाजी राजे ऊँ हूँ म्हणतात. येसूबाई पार गोंधळतात. इकडे तिकडे तळमळतात. मग संभाजीराजांचा ' कावा ' त्यांच्या ध्यानी येतो. पार पार शरमतात. दाताने त्यांच्या तोंडातले तोंडले तोडण्यासाठी त्यांची मुद्रा हळूहळू राजांच्या जवळ-जवळ जाऊ लागते. सर्व दिवे जातात. धूसर प्रकाशात फक्त दोन मुद्रांचे जसे ओठच एकमेकास भिडल्याचे प्रेक्षकांस सिल्होटीचे दृश्य दिसते. पार्श्वभूमीला मंद सतार वाजते. पडदा )

अंक पहिला समाप्त

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शास्त्र.
दा. क्र. 20283 नों. दि. 01.3.84
वि. नाटक ... क्र. ...

# अंक दुसरा

## प्रवेश पहिला

( संभाजीराजांच्या खासेवाड्याचा तोच सदरी महाल. संभाजीराजे व हंबीरराव राजकारणी—विशेषतः शाहजादा अकबराच्या चर्चेत रंगमंचावर आहेत. )

**संभाजी :** मामासाहेब, आपल्या मुलुखात आसऱ्याला आलेल्या बंडखोर शाहजादा अकबराचं आम्ही काय करावं ? सरलष्कर म्हणून तुमचा काही सल्ला ?

**हंबीर :** आम्हास्नी वाटतं—करडी समज देऊन हाकलावा त्याला मुलकाभाईर—न्हाईतर ठिवावा कोठीबंद करून लिंगाण्यावर. आपलं काय हाय धनी—घरचंच झालंय का थोडकं—की त्यात ही इकतची बिलामत घ्यायची !

**संभाजी :** रास्त आहे तुम्ही म्हणता ते सरलष्कर. " बंडखोर " म्हणून त्यास जवळ करावा तर ती गफलतच होईल. ' शाहजादा ' आहे तो. जवळ ठेवावा तर सोन्याच्या कट्यारीसारखा ! आम्ही त्यास जेवढ्यास तेवढीच धारण द्यावी म्हणतो. तुम्ही म्हणता तसं त्यास हाकलून वा कोठीबंद करून मात्र नाही कार्यी लागत. बघू या तरी पहिले त्याच्या मनी काय शिजते आहे ते !

( प्रल्हादपंत प्रवेशतात. मुजरा देऊन विंगेजवळच थांबतात. )

**संभाजी :** ( मुजरा स्वीकारून ) याऽ न्यायाधीश प्रल्हादपंत या. काही काम योजूनच याद केलंय तुम्हास.

**प्रल्हाद :** जी – आज्ञा स्वामी.

**संभाजी :** प्रल्हादपंत, पूर्वीच्याच मरातबानं फेर नामजाद केलं आहे आम्ही तुम्हास 'न्यायाधीश' म्हणून. आमच्या मनचे 'न्यायाधिशांचे' स्पष्ट रूपही कानी घातले आहे तुमच्या – अभिषेकाच्या वेळी.

**हंबीर :** मुलकात जसं डोंगरकडं असत्यात तसं न्यायाधिशास्नी मानतात दौलतीत राजं ! काय परलादपंत ?

**संभाजी :** ( भान घेत ) आल्यागेल्या लाटेवर झाडे-पेडे डुलली तर समजू शकतो आम्ही.

**प्रल्हाद :** ( पुढील आशय समजून ) पण 'डोंगराकडे'च – 'न्यायाधिश' म्हणजेच आम्ही – ढळू – डळमळू लागलो तर नाही मानवणार ते स्वामींना हे आम्ही बरे ध्यानी ठेवले आहे. न्यायाच्या बाबतीनं फिरून कसलीच गफलत ती आम्हा हाती होणार नाही.

**संभाजी :** ( जवळ जात, समजावीत ) राज्यकारभार म्हणजे चौहाती चालणारी पालखी प्रल्हादपंत. तुम्ही आम्ही हातजोड देऊन ती चालती ठेवली पाहिजे. आता तुम्ही 'राजहेजीब' म्हणून टोपीकरांच्या दरबारी बेट मुंबईत उतरा. त्या तर्फेच्या खंदेरी उंदेरी जलकोटांबाबत अक्कलहुशारीने टोपीकरांशी बोलणी लावा. वेळोवेळी आम्हास पुढील चालीचे खलिते द्या.

**प्रल्हाद :** ( लवून ) जी – आज्ञा स्वामी. आजच उतरू आम्ही गड. दाभोळ मार्गे गलबताने मुंबई जवळ करू.

**हंबीर :** नाविलाजानं तुमास्नी-अण्णाजीस्नी काढणीबंद करून धन्याम्होरं पेश करायची नौबत आली आम्हावर. त्येचा काही सल तुमच्या मनात परलादपंत ?

**प्रल्हाद :** ( चटकन ) मुळीच नाही सरलष्कर. झाल्या प्रकारात आमची गफलत होती. स्वामींनी थोर मनी आम्हास पायाशी ठाव दिला हे नाही भुलणार कधी आम्ही.

**संभाजी :** ( त्यांचा खांदा थोपटत ) शिक्कामोर्तबाची वकीलपत्रे घ्या निळोपंतांच्याकडून – आणि उतरा गड तुम्ही आजच.

**प्रल्हाद :** जी – आज्ञा ( जातो. )

**संभाजीराजे :** ( पुन्हा पूर्वीच्या चर्चेवर येत ) मामासाहेब – आमचा ठाम अंदाज आहे – बंडखोर शाहजाद्याच्या पाठलागाचं निमित्त ठेवून औरंगजेब दख्खनेत उतरणार. आम्ही सांगतो आदिलशाही नाही, कुतुबशाही नाही –

पहिलं हत्यार तो धरणार ते आपल्या मुलखावरच.

**हंबीर :** थोरल्या धन्यापून हुबा दावाच हाय त्येचा आपल्या संगं! त्येच्या वख्ती एकापरीस एक मातब्बर खान न्हाई का घातलं त्येनं थोरल्यावर! थोरल्यांनी काय नी काय करामत करून दावली अक्कल हुशारीची – पर समदे खान नेस्तनाबूतच क्येले. आता धाकल्यास्नी मातर खुद बादशासंगंच झट-झुज द्याय लागनार. ( अण्णाजी प्रवेशून विंगेजवळच थांबतात. )

**संभाजीराजे :** त्यासाठीच एक हातचा म्हणून त्याच्या बंडखोर शाहजाद्याला आसरा दिला आहे आम्ही. धोंडसे मुक्कामी तळ देऊन आहे तो.

**हंबीर :** त्येला आसऱ्याला ठेवून घ्यायचं पक्कंच झालं असलं तर व्हईल तेवडा फायदा उटवावा त्येचा – बादशाइरूध! मानसाचं काय हाय धनी, कोन कवा आन् कसा उपेगी पडंल न्हाई सांगता येत!

**संभाजीराजे :** ( अण्णाजींना पाहून ) या. मुजुमदार अण्णाजीपंत या. तुम्ही सुद्धा उपयोगी पडणार आहात!! वेगळ्या मतलबानं!

**अण्णाजी :** ( पुढे होत – चाचरत ) क्षमा असावी. ध्यानी नाही आलं आमच्या स्वामी!

**संभाजीराजे :** ( समजावीत ) हे बघा अण्णाजीपंत, झालं गेलं कृष्णेला मिळालंसं मानून आम्ही तुम्हास फेर कारभारात घेतलं आहे – बाइज्जत – मरातबानं.

**हंबीरराव :** असं बघा अन्नाजी, पुरात उसाळली आन् भरपेट नुकशान करून ग्येली म्हून शिंवरनं नदी उटवून लावता येती का? न्हाई – न्हवं? तसंच मानलंय तुमास्नी राजांनी.

**संभाजीराजे :** ते मानताना सुरनिसी ऐवजी मुजुमदारी दिली आहे आम्ही तुम्हास. त्या वेगळ्या मतलबानं 'तुमची सेवासुद्धा उपयोगी पडणार' असं म्हणतो आम्ही.

**अण्णाजी :** अवश्य उचलू आम्ही ही मुजुमदारीची जोखीम – नेकीनं.

**संभाजीराजे :** ( समजावीत ) कां दिली असावी सुरनिशीऐवजी मुजुमदारी आम्ही तुम्हास – काही अंदाज?

**अण्णाजी :** ( गोंधळून ) जी – म्हणजे.

**संभाजीराजे :** अण्णाजी, तुमचा स्वभाव बरा हिशेबी! तुम्हास मुजमूच योग्य! कशी? तर तिथं गोरगरीब रयतेला धारामाफीचा संबंध नाही. आम्ही काही

**संभाजी :** प्रल्हादपंत, पूर्वीच्याच मरातबानं फेर नामजाद केलं आहे आम्ही तुम्हास ' न्यायाधीश ' म्हणून. आमच्या मनचे ' न्यायाधिशांचे ' स्पष्ट रूपही कानी घातले आहे तुमच्या – अभिषेकाच्या वेळी.

**हंबीर :** मुलकात जसं डोंगरकडं असत्यात तसं न्यायाधिशास्नी मानतात दौलतीत राजं ! काय परलादपंत ?

**संभाजी :** ( भान घेत ) आल्यागेल्या लाटेवर झाडे-पेडे डुलली तर समजू शकतो आम्ही.

**प्रल्हाद :** ( पुढील आशय समजून ) पण ' डोंगराकडे 'च – ' न्यायाधिश ' म्हणजेच आम्ही – ढळू – डळमळू लागलो तर नाही मानवणार ते स्वामींना हे आम्ही बरे ध्यानी ठेवले आहे. न्यायाच्या बाबतीनं फिरून कसलीच गफलत ती आम्हा हाती होणार नाही.

**संभाजी :** ( जवळ जात, समजावीत ) राज्यकारभार म्हणजे चौहाती चालणारी पालखी प्रल्हादपंत. तुम्ही आम्ही हातजोड देऊन ती चालती ठेवली पाहिजे. आता तुम्ही ' राजहेजीब ' म्हणून टोपीकरांच्या दरबारी बेट मुंबईत उतरा. त्या तर्फेच्या खंदेरी उंदेरी जलकोटांबाबत अक्कलहुशारीने टोपीकरांशी बोलणी लावा. वेळोवेळी आम्हास पुढील चालीचे खलिते द्या.

**प्रल्हाद :** ( लवून ) जी – आज्ञा स्वामी. आजच उतरू आम्ही गड. दाभोळ मार्गे गलबताने मुंबई जवळ करू.

**हंबीर :** नाविलाजानं तुमास्नी-अण्णाजीस्नी काढणीबंद करून धन्याम्होरं पेश करायची नौबत आली आम्हावर. त्येचा काही सल तुमच्या मनात परलादपंत ?

**प्रल्हाद :** ( चटकन ) मुळीच नाही सरलष्कर. झाल्या प्रकारात आमची गफलत होती. स्वामींनी थोर मनी आम्हास पायाशी ठाव दिला हे नाही भुलणार कधी आम्ही.

**संभाजी :** ( त्यांचा खांदा थोपटत ) शिक्कामोर्तबाची वकीलपत्रे घ्या निळोपंतांच्याकडून – आणि उतरा गड तुम्ही आजच.

**प्रल्हाद :** जी – आज्ञा ( जातो. )

**संभाजीराजे :** ( पुन्हा पूर्वीच्या चर्चेवर येत ) मामासाहेब – आमचा ठाम अंदाज आहे – बंडखोर शाहजाद्याच्या पाठलागाचं निमित्त ठेवून औरंगजेब दख्खनेत उतरणार. आम्ही सांगतो आदिलशाही नाही, कुतुबशाही नाही –

पहिलं हत्यार तो धरणार ते आपल्या मुलखावरच.

**हंबीर :** थोरल्या धन्यापून हुबा दावाच हाय त्येचा आपल्या संगं ! त्येच्या वख्ती एकापरीस एक मातब्बर खान न्हाई का घातलं त्येनं थोरल्यावर ! थोरल्यांनी काय नी काय करामत करून दावली अक्कल हुशारीची – पर समदे खान नेस्तनाबूतच क्येले. आता धाकल्यास्नी मातर खुद बादशासंगंच झट-झुज द्याय लागनार. ( अण्णाजी प्रवेशून विंगेजवळच थांबतात. )

**संभाजीराजे :** त्यासाठीच एक हातचा म्हणून त्याच्या बंडखोर शाहजाद्याला आसरा दिला आहे आम्ही. धोंडसे मुक्कामी तळ देऊन आहे तो.

**हंबीर :** त्येला आसऱ्याला ठेवून घ्यायचं पक्कंच झालं असलं तर व्हईल तेवडा फायदा उटवावा त्येचा – बादशाइरूध ! मानसाचं काय हाव धनी, कोन कवा आन् कसा उपेगी पडंल न्हाई सांगता येत !

**संभाजीराजे :** ( अण्णाजींना पाहून ) या. मुजुमदार अण्णाजीपंत या. तुम्ही सुद्धा उपयोगी पडणार आहात ! ! वेगळ्या मतलबानं !

**अण्णाजी :** ( पुढे होत – चाचरत ) क्षमा असावी. ध्यानी नाही आलं आमच्या स्वामी !

**संभाजीराजे :** ( समजावीत ) हे बघा अण्णाजीपंत, झालं गेलं कृष्णेला मिळालंसं मानून आम्ही तुम्हास फेर कारभारात घेतलं आहे – बाइज्जत – मरातबानं.

**हंबीरराव :** असं बघा अन्नाजी, पुरात उसाळली आन् भरपेट नुकसान करून ग्येली म्हून शिवंवरनं नदी उटवून लावता येती का ? न्हाई – न्हवं ? तसंच मानलंय तुमास्नी राजांनी.

**संभाजीराजे :** ते मानताना सुरनिसी ऐवजी मुजुमदारी दिली आहे आम्ही तुम्हास. त्या वेगळ्या मतलबानं तुमची सेवासुद्धा उपयोगी पडणार असं म्हणतो आम्ही.

**अण्णाजी :** अवश्य उचलू आम्ही ही मुजुमदारीची जोखीम – नेकीनं.

**संभाजीराजे :** ( समजावीत ) कां दिली असावी सुरनिशीऐवजी मुजुमदारी आम्ही तुम्हास – काही अंदाज ?

**अण्णाजी :** ( गोंधळून ) जी – म्हणजे.

**संभाजीराजे :** अण्णाजी, तुमचा स्वभाव बरा हिशेबी ! तुम्हास मुजमूच योग्य ! कशी ? तर तिथं गोरगरीब रयतेला धारामाफीचा संबंध नाही. आम्ही काही

'घालमेल' करण्याचा सवाल नाही. ( अण्णाजी अस्वस्थ )

**हंबीरराव :** पर ध्येनात ठिवा अन्नाजी, मुजुमदारीचाबी संबंध येतोय त्यो खजिन्याच्या हिशेब – ठिशेबात – राजांच्या अन् रामराजांच्या नातेसंबंधाचा हिशेब—

**संभाजीराजे :** ( एकदम ) हां – तो मात्र कधीच नाही होऊ शकत अण्णाजी! तेवढे बरे सांभाळून असा. "आम्ही की रामराजे" असा स्वप्नीसुद्धा कधी खयाल नाही येत आमच्या. तुम्हीसुद्धा तो आणू नये कधी.

**अण्णाजी :** जी. कधीच नाही व्हायचं इतःपर असं काही आमच्या हातून. स्वामी आणि रामराजे म्हणजे—

**हंबीरराव :** ( एकदम ) जगदंबेच्या दोन डोळ्यांवानी हाईत ! असं आमी नव्हं थोरलं स्वामीच बुजावून गेलंत समद्यांस्नीच.

**अण्णाजी :** जी. आम्ही समजलो सरलष्कर. राजे आणि रामराजे म्हणजे जगदंबेचेच दोन डोळे. ( दोन अर्थांनी ) एक लपवावा नि दुसरा उघडावा !!

**हंबीरराव :** ( खोच न समजून ) हां ऽ आता कसं बोलतात ! तेवडा आमच्या अक्कासाबांच्या वाड्याकडं वाढलेला तुमचा राबता कमी करावा तुमी आता अन्नाजी ! कसं ?

**अण्णाजी :** ( चमकून ) त्याचं काय आहे सरलष्कर. जसं राजांचं घेतो तसंच रोजानाचं दर्शन घेतो आम्ही रामराजांचं ! त्यांत काही ऽ गैर वाटतं तुम्हास ? मग ते आम्ही—

**संभाजीराजे :** बिल्कुल नाही ! आबासाहेबांची छोटी सावलीच मानतो आम्ही रामराजांना. ( हंबीररावांजवळ जात ) आमच्या या मामासाहेबांच्यावरही सोपवणार आहोत त्यांचीच एक नाजूक जोखीम आम्ही !!

**हंबीरराव :** ( चमकून ) जी ऽ !

( अण्णाजी वेगळ्या अर्थाने चमकून बघतात. )

**संभाजीराजे :** बोलू ऽ, बोलू मामासाहेब, रास्त वख्ती बोलू ती जोखीम !

[ विंगेत कालवा होतो. टेपवर संवाद वाजतो तो असा—

एक आवाज : ए धनगरा, वावा जा की आता असं न्हाई भ्येटत राजे हो तवा कुनालाबी—!

धाकलू : काय बी करा, पर न्हाजा तेवढा दावाच मला एकडाव. बाबानू

भ्याट आनलिया रं मी – म्हाजा दावा एकडाव.

दोन तीन आवाज : ए ऽ चल—जा बघू धनगरा, गुमान.

( स्टेजवरचे सर्व विंगेकडे जातात. ) ]

**हंबीरराव :** कसला काल·– कालवा म्हनायचा ह्यो ! बगताव आमीच.

( मुजरा देत विंगेकडे जातात. )

**संभाजीराजे :** ( अण्णाजींना ) अण्णाजीपंत, तुम्ही चिपळून – राजापूरचा मुजमूचा नवा राबता बसवून घ्या आता.

**अण्णाजी :** जी. त्याची चिंता नको स्वामींना.

**हंबीरराव :** ( प्रवेशून ) म्हाराज, कुनी धन्गर आलाय. धाकलू म्हन्त्याला. राजास्नीच भ्येटायचं हाय म्हन्तो. लई बजावलं, पर ऐकत न्हाई. कसलीशी म्हनं भ्याट आनलिया त्येनं. आक्षी राजांच्याच हातात द्यायची म्हस्तो.

**संभाजीराजे** : ( आठ्या घालत ) धनगर ? भेट द्यायची ! त्याची भेट तुम्हीच आपलीशी करा मामासाहेब. “ हत्यार – पागोटं ” द्या आमची फेरभेट म्हणून त्यास. सांगा समजुतीनं त्याला – आम्ही खास मसलतीत आहोत. तुम्हीच करा रीतीनं त्याची बोळवण.

**हंबीरराव :** हर भातीनं सांगितलं त्याला समजुतीनं धनी. पर न्हाई ऐकत त्यो. म्हातारा हाय धाराऊ गत – हटमोर हाय – ( लवून ) आमास्नी वाटतं – पेश येऊ द्यावं त्येला. मानसाचं काय हाय धनी ! कोन कवा आन् कसा उपेगी पडंल न्हाई सांगता येत ( अण्णाजी उगाच चळबळतात. ).

**संभाजीराजे :** ( क्षणैक थांबून ) म्हातारा ? धाराऊसारखा ? घ्या. पेश घ्या त्यास मामासाहेब. ( हंबीरराव जातो ) ( वळून अण्णाजींना ) अण्णाजीपंत – तर तुम्ही प्रांत चिपळुणात उतरा. गड उतरण्यापूर्वी अवश्य घ्या रामराजांचे दर्शन. एक सांगावा सांगा त्यांना आमचा. सांगा – तुमचे दादामहाराज तुम्हाला लौकरच चांगले जखडबंद करून ठेवणार आहेत ! !

**अण्णाजी :** ( चमकून ) जी—?

**संभाजीराजे :** तलम काढण्यांनी ! ( हसतात. अण्णाजी गोंधळतात. )

**अण्णाजी :** जी. आज्ञा स्वामी. ( मुजरा करून जायला निघतात. त्यांना विंगपाशी – पाटीमागे हंबीरराव असलेला—धनगरी वेषातला—उतार वयस्क पण ताठ धाकलूच सामोरा येतो. )

**धाकलू :** ( कपाळावर हातझड घेत अण्णाजींनाच ) ऱ्हाजा कोहोन ?

**अण्णाजी :** ( वैतागाने ) मतलब ?

**धाकलू :** ( पुन्हा त्यांनाच ) ऱ्हवं – तुमांपैकी ऱ्हाज्या कोहोन म्हटलं बाबानू, म्यां ! जरा दावतिसा काय ?

**हंबीरराव :** ( पुढे होत ) चल बाबा. राजं त्ये तिकडं हायेत. ( अण्णाजी धाकलूकडे तुच्छतेने पाहून जातात, हंबीरराव धाकलूला राजांसमोर आणतात. )

**संभाजीराजे :** बोला बाबा. आम्ही 'ऱ्हाज्या' !

( धाकलू राजांजवळ येऊन, बारकाव्यानं निरखून साष्टांग दंडवत घालत )

**धाकलू :** बिरुबा रं माज्या तू ! आज भ्येटलास म्हन की ! ( संभाजीराजे त्याला ममतेनं उठविताहेत तोच – हाती 'बुधभूषणम्'ची पोथी असलेले कवी कुलेश महाराणी येसूबाईंच्यासह " जवळ जवळ पुरा होत आला आहे काव्यग्रंथ आता " असे बोलत प्रवेशतात. राजांना मुजरा करतात व येसूबाईंना उद्देशून)

**कवी कुलेश :** 'बुधभूषणम्'च्या 'राजनीती' प्रकरणात राजांनी केवढं रास्त वर्णन केलं आहे राणीसाहेब !

**येसूबाई :** कोणतं रास्त वर्णन म्हणता कविराज ?

**कवी कुलेश :** लहान का असेना पण अवघड कार्य करणाऱ्या पुरुषांच्या सहाय्याने कोणते राज्य मोठे होणार नाही ?

" यद्यपि अल्पतरं तदपि एकेन दुष्करम् ।
पुरूषेणा सहाय्येनं किमु राज्यं महोदयम् ?"

**संभाजीराजे :** ( कुलेशांना हातानं थोपवून, धाकलूच्या खांद्यावर हात टेवत ) कोण नाव तुमचं बाबा ? गाव कोण ? बोला–साफ बोला–डरू–कचरू नका.

( धाकलू भांबावतो, राजांसह सगळ्यांकडे नुसतेच बघतो )

**हंबीरराव :** ( त्याच्याजवळ जाऊन त्याच्या खांद्यावर हात ठेवून धीर देत ) बोल बाबा – कचरू नगंस – समदी घरचीच हाइत हतं.

**संभाजीराजे :** बोला – नावगाव बोला—

**धाकलू :** ( धीर येऊन ) जी. धाकलू. म्या 'धाकलू' म्हन्त्याला धन्गर जी ! पन्नाळ्याच्या मावळतीचा. म्हसाईच्या धनगरवाड्यावयला ! ऱ्हाज्या, समदा पन्नाळगड पालथा घालून याक भ्याट आनलिया रं म्या. तुज्यासाटनं–फकस्त तुज्यासाटनं.

( लंगोटीच्या दशीला बांधलेली शुभ्र सफेद अंगठी सोडवून हाती घेतो. )

**संभाजीराजे :** ( हसत ) भेट ? आम्हास ? काय उणे आहे आम्हास बाबा ? कशाला उठविलीत एवढ्या दूरच्या पल्ल्याची तापदरा ?

**हंबीरराव :** चाळीसावर गडकोट हाईत धाकलोबा राजांच्या कब्जात !

**कवी कुलेश :** भेट स्वामी देतात—तमाम गुणवंतांना ! तू काय देणार त्यांना ?

**धाकलू :** असत्याल बाबांनू—ह्ये मॉप गडकिल्लं असत्याल म्हाजाच्या लुंगटीच्या दशीला—

( सर्वजण त्याच्या भाषेच्या रांगडेपणानं चमकतात. )

**हंबीरराव :** ( त्याला दुरुस्त करायला म्हणून ) बाबा ऽ जरा जबानीची मेंढरं लई उधाळली गडउतरंडीला ! — आवरती घेतली तर...

**येसूबाई :** ( त्यांना रोखत ) बोलू द्या त्यास—मोकळ्या मनी बोलू द्या सरलष्कर ( धाकलुला ) बोला बाबा—गडकिल्ल्यांचं काय--?

**धाकलू :** म्हाज्याच्या ह्या ऽ मॉप गडावयलं बावटं रोजी रंग पालटल्यात. कदी हिरवा तर कधी भगवा ! काय रया न्हाई गवसायची ! म्हाजा, ही भ्याट धाकलूची—तुज्या पायगतीला ( अंगठी पायाशी ठेवतो. संभाजीराजे ती उचलून निरखत )

**संभाजीराजे :** अंगठी ? ही मामुली अंगठी ? दुनियेत नाही गवसायची ! ( क्षणभर हसतात. लगेच गंभीर होऊन ) बाबा, दुनियेत आम्हाला गवसायच्या नाहीत अशा बाबी आता फक्त दोनच—एक—आमच्या थोरल्या मासाहेब—

**येसूबाई :** ( झटकन् ) आणि दुसरे आमचे आबासाहेब !

**धाकलू :** तशीच हाय ही ल्येकरांनू ! मामुली न्हवं ती म्हाजा. लय गुनकारी. आता दिसती का सफेद—शिपुर ? तुझ्या दातागत. ( संभाजीराजे अंगठी जवळून निरखतात. मान डोलावतात. अंगठी हंबीररावांच्या हाती देतात ) हं.

**हंबीरराव :** ( अंगठीकडे बघत ) व्हय बाबा. हाय खरी धोट—शिपुर. थोरल्या धन्यांच्या रोजपुजंच्या स्पटिक शिवलिंगागत ( हंबीरराव अंगठी राजांच्याकडे देतात. )

**धाकलू :** म्हाज्या, ती बोटात घाल आन बस की थाळ्याला ! थाळ्याच्या अन्नाला जर इखबाधा असंल तर लगी रंग पालटती का न्हाई बग ! इखबाधंला लई गुनकर ती ! हिरवी काय, निळी काय, जांबळी काय पडती बग की जरा !

बाधिक थाळ्याभाइर हात घ्ये की लगी पुन्ना सफेद–शिपुर होती का नाही बग –तुज्या दाताखानी.

( संभाजीराजे गंभीर होत 'जगदंब, जगदंब' म्हणत हातातल्या अंगठीकडे बघू लागतात. सगळयांच्या नजरा त्यांच्या हातच्या अंगठीकडे जातात. )

**संभाजीराजे :** कसली म्हणायची ही एवढी गुणकर अंगठी बाबा ?

**धाकलू :** 'रंग–पालटी' म्हन्त्यात तिला.

**येसूबाई :** आमच्या कुलदेवी वाघेश्वरीनंच पाठवलंय जसं आज तुम्हास बाबा.

**कवी कुलेश :** लहान का असेना पण अवघड कार्य करणाऱ्या पुरुषांच्या सहाय्याने कोणते राज्य मोठे होणार नाही ? (हातची काव्यपोथी वर धरत) 'बुधभूषणम्' सार्थ आहे स्वामी !

**हंबीरराव :** पर क्येली कशी घडण या रंगपालटीची धाकलोबा ? पन्हाळ्याच्या रानाचा काय संबंध ?

**धाकलू :** हाय तर ! रानात मांजर असतो का ? खऊल मांजर—खऊल मांजर—

**हंबीरराव :** हां–असतो. 'खवल्या मांजर' म्हन्तो आमी त्येला–ह्ये शिंपल्यागत चकते असत्यात त्येच्या पाठवानावर. लई चिवट चकते ! बंदुखीचा बार बी न्हाई लागू होत त्येच्या खवलावर.

**धाकलू :** तर त्यो खऊल मांजर जित्ता पकडायचा. त्येच्या पाठवानावर चुना थापायचा. रातभर त्येला तसा बुट्टीखाली डालून ठिवायचा. सक्काळला त्येच्या पाठीवयला कुनचा तरी योकच खऊल हुतो पांडरा–पांडराघोट.

**हंबीरराव :** थोरल्या धन्याच्या रोजपूजंच्या स्पटिक शिवलिंगागत.

**कवी कुलेश :** पौर्णिमेच्या चंद्रथाळ्यासारखा–साफ सफेद.

**येसूबाई :** नथीतल्या मोत्यासारखा उजळ–नितळ.

**धाकलू :** (सर्व फेकून दिल्यासारखे) छयाऽ छयाऽ, छया! ह्या आमच्या न्हाज्याच्या दातागत–सफेद शिफूर ! तर त्यो—समद्या खवलापरीस आगळा दिसतो. लगी वळखू येतो. त्योच रंगपालटी खऊल म्हनायचा. त्येचीच कोरून काहडल्याली हाय ही रंगपालटी अंगटी. (सगळे आश्चर्याने एकमेकांकडं बघू लागतात. संभाजीराजे अंगठी येसूबाईच्या, येसूबाई हंबीररावांच्या, हंबीरराव कुलेशांच्या हाती निरखून देतात. कुलेश ती परत राजांच्या हाती देतात. राजे क्षणैक ती

प्रेक्षकांना दिसेल अशी समोर धरतात. 'रंगपालटी अंगठी' असे स्वतःशीच पुटपुटतात, मग गपकन् मूठ मिटतात. दोन्ही हातांनी गळ्यातला कंठा काढून धाकलूजवळ येतात. कमालीच्या आपुलकीने त्यास )

**संभाजीराजे :** ( धाकलूच्या खांद्यावर हात ठेवत ) धाकलोबा, लाख लाख मोलाची 'रंगपालटी' तुम्ही आम्हास दिलीत. आम्ही काऽही दिलं तरी कशानंही तिचं मोल होणे नाही. तरीही आमची यादगार म्हणून हा कंठा जवळ ठेवा. उभे म्हसाईचे पठारच तुमच्या नावे करून देऊ आम्ही नामजाद ! ( मोतीकंठा देतो. धाकलू तो ओंजळीत घेऊन ताणल्या डोळ्यांनी अवकाशात बघतच राहातो. )

**येसूबाई :** ( धाकलूजवळ जाऊन ) बाबा, तुमच्या 'रंगपालटी' अंगठीचं जिथं स्वारींना नाही – तिथं आम्हाला काय करता येणार मोल ! तरीही आमचीसुद्धा यादगार म्हणून ही ठेवा. ( धाकलूच्या ओंजळीत कंठ्यावर हातची पुष्कराज अंगठी उतरून ठेवतात. )

**धाकलू :** ( निर्धारपणे राजांकडे बघत ) ह्ये नगं मला न्हाज्या. तुझं म्हसाईचं "वतान" नगं कायबी नगं. ह्यासाटनं न्हाई आलो एवडा मुलुक तुडवत हितवर न्हाज्या, ( हातची ओंजळ संभाजीराजांच्या पायी सोडतो. सूचक वाद्य. संभाजीराजांसह सर्वजण चक्रावून एकमेकांकडे बघतात. राजे अवकाश पकडून निर्धारी होत धाकलूजवळ येतात मग— )

**संभाजीराजे :** एक ऐकाल आमचं बाबा ? एकवार–एकवार पायधूळ तरी घेऊ द्या तुमची आम्हास ! !

( शिरशिरी उठावी अशी रणशिंगाची ललकारी उठते. राजे वाकायला जातात. हात डोलवत धाकलू पीछे पीछे हटतो. )

**धाकलू :** ( हात डोलवत )– नगं – नगं रं न्हाज्या – बिरूबारं तू आमचा. धाकलूचं – ह्या धनगराचं चुकलं-माकलं पोटात घ्ये देवा ! ( झटकन तोच दंडवत घालतो. सर्व बघत असताना 'नग नगं' म्हणत उठून हात डोलावतच धावत विंगेकडे जातो. सर्वजण अवाक् होऊन त्याच्याकडे बघत असतानाच दिवे जातात. )

# प्रवेश दुसरा

(संभाजीराजांचा तोच खासे वाड्याचा सदरी-महाल. या वेळी मात्र महालात मधोमध लाकडी दिवाणासारखी "खाशी बैठक" आहे. ती उंची लोड गिर्द्यांनी आच्छादली आहे. तीवर मधोमध एका तबकात–गुलाबी गेंद ठेवले आहेत. बैठकीवर संभाजीराजे बसले आहेत. त्यांच्या हाती धाकलूनं दिलेली अंगठी आहे. ती चाळवीत ते एकटक निरखतात. पुन्हा बोटावर चढवतात.)

**संभाजीराजे :** आज तीथ कोणती कवीराज ?

**कवी कुलेश :** जी – कार्तिक शुद्ध त्रयोदशी.

**संभाजीराजे :** ( स्वतःशीच ) कार्तिक शुद्ध त्रयोदशी ! ( विचारगत होत उठतात. पायफेर घेऊ लागतात. त्यांना ते दिलेरच्या गोटात गेले होते— त्या दिवसांची याद झाली आहे.)

**कवी कुलेश :** स्वामींनी आज तीथ विचारली ! तसा शाहजादा अकबरच्या भेटीचा आजचा दिवस मुहूर्त पाहूनच मुक्रर केला आहे.

**संभाजीराजे :** ( हसत ) मुहूर्त ! आमच्या आबासाहेबांनी फत्ते घेतलेल्या बऱ्याच मोहिमा ' अमावास्येच्या ' होत्या कवीराज ! त्यासाठी नाही विचारली आम्ही तीथ.

**कवी कुलेश :** मग ? ध्यानी नाही आलं आमच्या.

**संभाजीराजे :** तीन सालांपूर्वीचे असेच कार्तिकी थंडीवरचे दिवस आले आम्हाला याद !– त्यावख्ती – त्यावख्ती आम्हीच आमच्या आबासाहेबांना पारखे होत – त्यांना केवढ्यातरी यातना देत–देत गेलो होतो – पठाण दिलेरच्या गोटात ! ! हर कोशिस केली मनाचा हा ' सल ' निपटता नाही निपटत.

**हंबीरराव :** ( झटकन पुढं होत ) झालं ग्येलं त्ये किस्नेला मिळालं न्हवं धाकलं. कशापायी उगाळ करायचा त्येचा ? का धरतीसा इक्ती खंत त्येची ?

**संभाजीराजे :** ( जवळ जात ) मामासाहेब, तुमचा आणि धाराऊचा कसला ऋणबंध आहे आमच्याशी एवढा नाही उमगत. किती जपता–जपलं आजवर तुम्ही आम्हास ! झालं ते तर होऊनच गेलं आहे. त्याची खंत–खेद नाही. पण एक बारीकाचा खयाल आला आमच्या मनी—

**हंबीरराव :** आम्हा म्होरं बोलावा वाटला तर बोलावा त्यो धाकल्या धन्यांनी.

या कविराजावानी काय टक्कुरं न्हाई चालत आमचं–की काव्य का-काय म्हन्ता त्ये बांदून दावू आमी–पर बोलू त्ये घोड्याच्या टापंवानी खडखडीत–त्येच्या अंगलटीगत झळझळीत !

**संभाजीराजे :** म्हणून तर तुमच्यासामने बोलावा असाच खयाल आहे तो— ( थांबून–कोपरा घेत ) आपल्या बापास—औरंगला पारखा होऊन आलेला शाहजादा अकबर व दिलेरच्या गोटात गेलेले आम्ही–यात काही तफावत ? की दोन्ही मामले सारखेच–एका तोडीचे !!

(हंबीरराव व कुलेश या अचानक सवालानं चमकून एकमेकांकडं बघू लागतात. हंबीरराव तर पार गोंधळून गेलेत. )

**हंबीरराव :** ( चाचरत ) तुमचं म्हंजी काय हाय धनी–थोरल्यात नि तुमच्यात लई फेर ! त्ये कसं बोलायचं तर–म्होरल्याच्या गळ्यात त्येचंच घोंगडं हां हां म्हन्ता गुटाळून मोकळं ! पर राजांचं बोलनं म्हंजी कसं हाय तर— ( चाचरतो )

**संभाजीराजे :** हां बोला—कसं आहे ?

**हंबीरराव :** तर राम म्हणताना हनुमंतच हुबा ठाकतो डोळ्याम्होरं ! ( सर्व हसतात ) ककाय-ककाय बी सुदरतच न्हाई–कसा जाब द्यायचा त्यो. काय कवीराज ? सुचतं का तुमास्नी काई ?

**कवी कुलेश :** ( विचार करत ) तफावत आहे तर सरलष्कर. स्वामींच्या आणि आत्ता भेटीस येणाऱ्या शाहजादा–अकबराच्या चालीत खूप तफावत आहे. या शाहजाद्यासारखे कैक शाहजादे आहेत औरंगबादशहाला आज घडीला, पण दिलेरकडे गेले तेव्हा स्वामी ' युवराज ' होते–एकले आणि अभिषिक्त. रामराजे लहान होते ' युवराज ' नव्हते !

**संभाजीराजे :** नाही–नाही–चुकताहात तुम्ही कवीराज. तफावत आहे पण ती ही नव्हे ! शाहजाद्याने आपल्या जन्मदात्याविरुद्ध बंड पुकारले आहे–जाहीर दवंडी पिटून. अजमेरच्या मैदानावर त्याच्याशी प्रत्यक्ष लढून–शिकस्त खाऊन आलाय तो आमच्या मुलुखात. आमचे–आमचे होते आमच्या आबासाहेबांशी बंड ?

**हंबीर :** कोन म्हनलं तसं ? आम्हीच घ्येतलंय न्हवं पठानाच्या गोटाभाईर धन्यास्नी ! शाजाद्याला दिल्ली–तख्ताची हाय तशी धन्यास्नी न्हवती कदी

रायगडाच्या गादीची हाव !

**संभाजीराजे :** ( स्वतःशीच ) मग का गेलो आम्ही पठाण दिलेरच्या गोटात ? कुणाच्या खिलफ होते आमचे बंड ?

**कवी कुलेश :** आम्ही ऐकून आहोत–स्वामींनाही उठवायचे होते थोरल्या-स्वामींच्यासारखे स्वतंत्र–स्वराज्य !

**हंबीरराव :** ( ठामपणे ) आमास्नी वाटत ते बंड नव्हतंच धाकल्यांचं. ह्ये कविराज म्हन्त्यात तसं सवत्या राज्याची बी काही गोष्ट न्हवती ती—तर–तर– ( अडखळतो )

**संभाजीराजे :** बोला–बोला–बेलाशक बोला मामासाहेब—आम्हाला ऐकायचंच आहे एकदा याबाबत कुंणा-कुणाला काय काय वाटले ते.

**हंबीरराव :** ( धीर घेऊन–ठोसपणे ) आम्हास्नी वाटतं त्यो–त्यो धन्यांचा सवताचाच सवताइरूद क्येल्याला उठाव हुता ! कोंडीत पडल्यागत झाल्यानं–जिकडं फुडा तिकडं मुलुक थोडा–या जवानीच्या बेलाग भरीला पडून क्येल्याला—

**संभाजीराजे :** ( भारावून त्यांच्याजवळ जात खांद्यावर हात ठेवून ) रास्त – बिल्कुल रास्त बोललात मामासाहेब. मनचं बोललात. जेवढं थोरल्या मासाहेबांनी पारखलं होतं आम्हास–तेवढंच अचूक पारखलंय तुम्ही आम्हास. ( दूर जात ) त्या गाफिल – अविचारी उठावानं एक कधीही न पुसता येणारा काळीमा मात्र घेतला आम्ही आमच्या हयातीवर ! तो समजून घेण्याची कुवत होती आबासाहेबांच्या ठायी – म्हणून तर आम्ही परतलो ( बैठकीवर बसतात )

**कवी कुलेश :** हा शाहजादा नाही धजायचा कधीच परतायला त्याच्या अब्बाजानकडे !

**वर्दीदार :** शाजादा अकबर आन् रजपूत दुरगादास येत्यात. ( मुजरा देतो. जातो. )

( कवी कुलेश व हंबीरराव शाहजाद्याच्या आगवानीसाठी विंगेपर्यंत पुढे जातात. तरणाबांड शाहजादा अकबर – मध्यमवयस्क – धिप्पाड दुर्गादास राठोडसह प्रवेशतो. दुर्गादासच्या हातात हिरवी खलितावळी आहे. कवी कुलेश " आईये – आईये " म्हणत आगवानी करतात. हंबीरराव – दुर्गादासाला निरखताहेत – शाहजादा विंगेतच उभा असताना – संभाजीराजे व त्याची

खडाखडीच नुसती क्षणैक ‘ नजरभेट ’ होते – [ सूचक वाद्य ] शाहजादा तरातर पुढे होतो. संभाजीराजांच्या हातात तडक हात द्यायला म्हणून हात पुढे करू लागतो – तशी संभाजीराजे दुर्गादासाकडे फक्त अर्थपूर्ण नजर टाकतात तिचा अर्थ समजून—दुर्गादास शाहजाद्याला समज देतो—राजांकडे हात करत—“ आप है शहेनशहा मुल्के मरहट्ट—संभाजीराजे ! ” प्रथम दुर्गादासच लवून तसलीम करतो. अकबर समजून घेऊन – तसाच – कुर्निस करू लागतो – झटकन् – पुढे होत राजे त्याला उठवीत—)

**संभाजीराजे :** रहने दिजिये – शाहजादा – रहने दिजिये ! आईये तशरीफ फर्माईये. ( त्याला हाताला धरून रिवाजानं बैठकीवर बसवून घेतात. शाहजादा लागलीच लोडाला रेलतो – हंबीर, कुलेश सूचक बघतात. संभाजीराजे तबकातील एक टपोरा गेंद उचलून शाहजाद्याच्या हाती देत – ) घ्या··· लिजिये हा तुमच्या देशीचा आमचा पहिला मेहमान आज आमच्या हाती तुम्हास देतो आहोत फेरभेट !

**शा. अकबर :** ( हसून ) वाहवा ! बेहतरीन. राजासाब बहोत अच्छा शायरी मिसाल है आपका ! वक्त आयेगा – हम भी अच्छे लगेंगे आपको ! दुसरे – मेहमान के नाते ! ( गेंद पटकन नाकाशी नेतो. हंबीर—कुलेश ते नजरेने टिपल्याची एकमेकांना खूण करतात. )

**संभाजीराजे :** ( हसतच ) पहिला तो पहिलाच - बोलिये – शाहजादा ( अकबर दुर्गादासला राजांनी आपणास “ शहेनशहा ” म्हणावे असे खुणावतो. हे हेरून ) मामला काय आहे कविराज ? हे कोण ?

**शा. अकबर :** ( मध्येच. दुर्गादासकडे हातरोख देत ) आप है—दुर्गादासजी दुर्गादासजी राठोड – रजपुतोंके सालार – हमारे साथीदार !

**दुर्गादास :** ( कुर्निस देत ) अदब – कुर्निस शहेनशाह – मुल्के म्हराष्ट्र ! ( अकबर पुन्हा खुणावतो )

**संभाजीराजे :** ( करडेपणाने ) दुर्गाजी ? मामला काय ? साफ बोला हे हातवारे नि या खाणाखुणा कसल्या ? कोण मतलबाच्या ?

**दुर्गादास :** ( चाचरत ) मुआफ किजिये राजासाब. शाहजादा चाहते है कि राजासाब उनको “ शहेनशहा ” कहे !!

**संभाजीराजे :** ( मान वरखाली डोलवत ) याच खयालानं खुणावत होता काय

या तुमच्या दुर्गाजींना ( खोचकपणे ) " शाहजादे !! " हंबीर–कुलेश पसंतीची मान डोलावतात.)

शाहजादा : ( गडबडून जात ) नही – नही राजासाब – हम सोच रहे थे कि —आप

संभाजीराजे : क्या सोच रहे थे ? बोलिये – बोलिये – खुले – दिल, खुले जबान बोलिये – ( थांबून ) " शाहजादा ! "

शा. अकबर : हम सोच रहे थे कि–आप इतने सुरुर–सुरमा है तो आपके–आपके आब्बाजान कैसे होंगे ! !

( सर्वजण खळाळ हसतात )

संभाजीराजे : आमच्या देशीचे हे दख्खनी हवामान मानवेल तुम्हास शाहजादे ?

शा. अकबर : ' शाही हवासे ' ये जरेदर्रेकी हवा कम खतरनाक है राजासाब !

संभाजीराजे : बोला—पुढचा मनसुबा काय तुमचा शाहजादे ?

शा. अकबर : ( औरंगच्या आठवणीने बेचैन होत उठतो. राजेही उठतात. स्टेजवर अकबरमागे दुर्गादास व राजांच्या मागे-हंबीर-कुलेश असा स्पष्ट संच दिसू लागतो. )

आलमगीर हिंदोस्ताँको दफा कर देगा राजासाब ! ये कोई तरिका है सल्तनतका कि रियाया हैरान हो ?

दुर्गादास : ( त्याला जोड देत ) जिजिया—बुतशिकनी और कत्ल कैसे रहेगा किसीका भरोस ऐसे तख्तपर ?

शाहजादा : ( निकरानं ) आलमगीर अपने आपको और शाही खानदानको खतरेमें डाल रहा है, उसे रोकनाही है—जान की किंमतपर !

दुर्गादास : होड लेनी है उससे–हर दामपर.

संभाजीराजे : ( शांतपणे ) सही आहे तुमचे शाहजादे व दुर्गाजी. पण हे व्हावे कैसे ? आलमगीराच्या फौजीबळाचा काही खयाल ?

हंबीरराव : ज्येच्या म्होरं शाजाद्यांचं दादाजी–शाजान बादशा–चाचा दारा–मुराद शिकस्त झालं त्येच्याशी जंग हाय ह्यो.

कवी कुलेश : शाहजाद्यांची चाल तरी ऐकू द्यावी सरलष्कर.

संभाजीराजे : आलमगीरसे लोहा लेने की आपकी मसलत क्य है शाहजादा ?

शा अकबर : ( खूष होत ) आलमगीर तीन लाखकी हशमी फौज लेकर

बुरहानपूर उतरा राजासाब–साथ में खजाना है चौदा करोड रुपियोंका–अब वह–बेरहम हथियार धरेगा—पहले आपके मुल्कपर !

**संभाजीराजे :** ( शांतपणे ) आम्ही ताडून, हेरून आहोत ते. पुढे बोला. आगे बढिये !

**शा. अकबर :** इस वक्त हम राजस्ताँ लौटना सोचते है। हिंदोस्ताँमें आलमगीरसे होड लेनेकी ताकद दोही मुल्कोमें है।

**दुर्गादास :** एक आपके मरहट मुल्कमें और एक हमारे राजस्थानके रजपूतोमें !

**शा. अकबर :** दुर्गादासजीके साथ हम राजस्ताँ लौटेंगे।

**दुर्गादास :** जयपूरके राणा रामसिंगकी मदद लेकर हमारे रजपूतोंको हम इकट्ठा बाँधेंगे. राणाके पिताजी मिर्झाराजा जयसिंगको आलमगीरने जहर पिलाकर धोकेसे कत्ल किया है. राणा जरूर बदला लेंगे, हमारी मदत करेंगे.

**शा. अकबर :** पर्शियाके शाहको भी हाथ देनेके लिये लिखा है हमने.

**दुर्गादास :** आप आलमगीरको दख्खनमें लडाते रहेंगे ( राजे–हंबीर–कुलेश एकमेकांकडे बघतात. )

**शा.अकबर :** जयपूरके राणा रामसिंग राजस्तामे आलमगीरका मुकाबला करेंगे. और हम दुर्गाजीके साथ दिल्ली तख्त कब्ज करेंगे !

**दुर्गादास :** आपकी और हमारी मददसे तख्तनशीन होनेपर——

**शा. अकबर :** किताबे कुरान उठाकर हम कसम लेते है कि हम ये दोस्ताना नहीं भुलेंगे—जरूर निभाएँगे. हमारे सल्तनतमें जिजिया, बुतशिकनी नही होगी. राजासाब, इस बक्त आप जोड देते होंगे तो—तो आलमगीरका नामोनिशाँनातक मिटा देंगे हम.

**संभाजीराजे :** आम्ही जोड करावी म्हणता ती कसली ? तपशील बोला मसलतीचा, शाहजादे.

**शा. अकबर :** चुना पचास हजार लडाऊ मरगठ्ठा हशम हमारे साथ देनेकी ! !

**दुर्गादास :** यही—यही है वक्त जंग आजमनेका.

**संभाजीराजे :** ( थांबून, विचारगत होत ) सरलष्कर, तुमचा काय सल्ला या मसलतीत ?

**हंबीरराब :** जी – मोटा जंगी बारदाना घेऊन आलमगीर उतरला बऱ्हानपुरावर. आदी राकाय पायजे तो आपला मुलुक. जर दख्खनेत न्हाईच उतरला

आलमगीर तर म्होरली म्हून ही मसलत लागीची हाय. आता न्हवं.

**संभाजीराजे :** बिल्कुल दुरुस्त! आम्हास शाहजादे, आमच्या सालारांची मसलत पटते. औरंगजेब दक्षिणेत गुंतला नाही तरच माणूसबळ पुरवू शकू आम्ही तुम्हास—आत्ता नाही.

( अकबर हातचा गेंद खट्टा होऊन कुस्करतो. )

**शा. अकबर :** बडी उम्मीदसे आये है हम राजासाब !

**संभाजीराजे :** ( त्याचा खांदा थोपटून ) शाहजादे, तुमचा सल आम्ही जाणतो. पण राजकारणे – ती मनाच्या जहालीने नाही चालत. तुम्ही आमचे मेहमान आहात. आमच्या राज्यात सुखरूप आहात. मौका येताच तुमचे मनसुबे कार्यी लागतील. धीर ठेवा.

**श. अकबर :** ठीक है राजासाब हम रुकते है ! लेकिन खयाल रखना, जबतक हम आपके मुल्कमें है, चैन की नींद नही देगा आलमगीर आपको !

**संभाजीराजे :** प्रत्यक्ष आपल्या फर्जंदाची नींद हराम करणाऱ्याचा तेवढा अधिकार मानतो आम्ही शाहजादे.

**श. अकबर :** ठीक है. इजाजत लेते है. हम आपने हमे नजर किया हसीन गुलदस्ता. हम भी आपको एक किमती नजराना पेश करते है. ( दुर्गादासाकडे वळून ) दुर्गाजी, सुपूर्द किजीये वह खलीता राजासाबको.

**दुर्गादास :** ( खलीता समोर धरून ) रजपूतोंकी हिफाजतके लिए हम आपकी मदद माँग रहे है—और ये है कि—हमसेही मदद चाहते है—आपका—आपका नमोशियाँ तक मिटानेके लिये—लीजिये–ठंडे दिलसे पढिये–गद्दारोंकी कारीगरी.

( आठ्या घालत संभाजीराजे खलिता स्वीकारतात. अकबर व दुर्गादास निरोपाचे विडे घेऊन जातात. )

**संभाजीराजे :** ( अकबर गेलेल्या विंगेकडे बघत ) मामासाहेब, कधी परतलाच हा शाहजादा तर घेईल त्याला औरंगजेब आपल्या छातीशी पित्याच्या मायेनं ?

**हंबीरराव :** छः, कधी न्हाई घडायचं त्ये. आन हा तरी काय करील आपल्या बापाचं, आलेच दिल्लीचं तख्त याच्या हातात तर ?

**कवी कुलेश :** हाही आपल्या पित्याच्याच पावलावर पाऊल टाकून करेल कोठीबंद आलमगीराला.

संभाजीराजे : रास्त बोललात कवीराज. हे मोगली राजकुळ रक्तापेक्षा मोलाचं मानतं ते तख्त आणि आम्ही–रक्ताचं तख्तच मोलाचं मानतो. ( हातचा खलिता कुलेशांच्याकडे द्यावा म्हणून पुढे करतात. पुन्हा काही विचारानं स्वतःच खलीता खोलून स्वतःशीच वाचू लागतात. शब्दागणीक त्यांची चर्या पालटते संतप्त होऊ लागते )

हंबीरराव : ( न राहवून ) कसला पेच धाकलं? रया पालटली मुखड्याची म्हून म्हन्ताव.

संभाजीराजे : ( झपाझप फेर घेत ) भयानक–खतरनाक–केवढी मजाल! शाहजाद्यानं हा खलिता आम्हास दिला ही त्याची मेहरच म्हणायची आमच्या-वर. नाहीतर हे आम्हासच काय कोणासही ना कळतं–कधीही. ( खलीता हंबीररावांच्या समोर धरतो. )

हंबीरराव : ( खलित्याकडं बघत ) मानसाचं काय हाय धाकलं, कोन, कवा नि कसा उपेगी पडल न्हाई सांगता येत. आज शाजादा पडला उपेगी.

( दिवे जातात )

## प्रवेश तिसरा

( पहिल्या अंकातील पहिल्याच सेटचा रायगडावरील खासेमहाल. महालात सोयराबाई आहेत. मधोमध एक प्रेक्षकांना उभा दिसेल असा झिरझिरीत फक्त तलम पडदा आहे. महालाच्या प्रवेशद्वाराशी सोयराबाईंचे खासेकारभारी ‘ येसाजी ’ दाभाडे आहेत. संभाजीराजे प्रवेशून दाभाड्यांच्या समोर क्षणैक उभे ठाकतात. राजांच्या हातात हिरव्या तलम कापडाची खलितावळी आहे. प्रत्यक्ष राजांच्या आगमनानं येसाजी–दाभाडे गडबडले आहेत—त्यांची तारां-बळ राजे शांतपणे–निरखतात. येसाजी व राजे यांच्या भागात पार्श्वभूमीला अष्ट-भुजेची मूर्ती आहे. सोयराबाईंच्या भागात पार्श्वभूमीला त्यांची कुलदेवी वाघ-जाईची मूर्ती आहे. दाभाड्यांची तारांबळ किंकर्तव्य होऊन थांबते–तशी—)

संभाजीराजे : तुम्ही घाबरू—चळू नकात दाभाडे! एके काळच्या महाराणींचे तुम्ही खासे–कारभारी. तुम्ही असे गडबडलेले नाही बघवत आम्हास. वर्दी द्या

'तुमच्या महाराणींना '— आज खासा आम्हीच आलोत—भेटीसाठी—जातिनिशी ! !

**येसाजी :** ( लवून ) जीऽ ( मधल्या पडद्यापर्यंत जातो–कसं सांगावं म्हणू कचरतो–परततो–पुन्हा जातो–तशी—)

**संभाजीराजे :** ( करड्या बोलात ) दाभाडेऽ ! वर्दी द्या !

**येसाजी :** ( लपकन् लवून ) जी ऽऽ ( पडद्याजवळ जाऊन आवंढा गिळत चाचरती वर्दी देतो—) म—म—महाराणी स—स—सरकार—म—म—महाराज आल्यात ! भे—भे—भेटीसाठी—जातिनं ! ! खुद ! !

**सोयराबाई :** ( डुयीचा पदर तीव्र नापसंतीनं झटकून कोपरा–घेत ) हूँ ऽऽ येऊ द्या !

( संभाजीराजे आडपडद्याजवळ येतात. सोयराबाईंना शिवाजी मुजरा करावा की नको असे गोंधळात पडतात. खेचल्यासारखे अष्टभुजेसमोर येतात. तिला निरखतात. पुन्हा पडद्याजवळ येत रीतसर आदराचा मुजरा घालतात–मग )

**संभाजीराजे :** खूऽप खूऽप सोसलं आम्ही–तुमच्या वजेनं–बचपनापासून आजवर आता आता आपण स्वस्थ बसाल तर–तर बडी मेहर होईल आमच्यावर !
( सोयराबाई प्रथम चरफडते–तरीही )

**सोयराबाई :** कशाबाबत म्हणतात छत्रपती ? काय–काय सोसलं त्यांनी—बचपनापासून—आमच्या वजेनं ? स्वारी गेली आणि आम्ही स्वस्थच आहोत !

**संभाजीराजे :** तसं घडतं तर भाग्य बलवंतच होतं उभ्या दौलतीचं—आमचं आणि रामराजांचंही. आम्ही काय सोसलं ते सांगायलाच आलोत आज–सारे रिवाज गाठीला गुंडाळून ठेवत–जातिनिशी. कशा–कशासाठी करता व मानता एवढा दुजाभाव आमच्यात नि रामराजात ? ( थांबून–सैरभैर होत ) काय विचारलं त्यांनी आत्ताच दरवाजात आम्हास–आहे माहीत ?

**सोयराबाई :** काय ? असं तेढीनं नसतात बोलत कधी छत्रपती !

**संभाजीराजे :** मग कान आणि मन शाबूत टेवून ऐकावं तर एकेकाळच्या " महाराणींनी "! त्यांनी विचारलं–आम्हास, कडकडून मिठी भरत विचारलं–" आम्हास, आमच्या मासाहेबास खरंच का हो देणार हत्तीच्या पायी- दादा-महाराऽज ? " ( वाद्य, क्षणैक शांतता.) कशा–कशाला भरविता हे असलं विपरीत त्यांच्या मनी या उमरीत ?

**सोयराबाई :** ( फेकत ) घ्या ! म्हणजे आम्ही भरविलं हे त्यांच्या मनी !

**संभाजीराजे :** ( खोचक ) नाही ! असेल त्यांचं त्यांनाच ते सुचलं ! आमच्या कबिल्यालाही ' दसरी ' बोलभाषा येत नाही म्हणून " मागास " म्हणता—

**सोयराबाई :** ( उडवून लावत ) हेच सांगायचं होतं छत्रपतींना एवढं जातिनिशी इथं खासेमहाली येऊन ?

**संभाजीराजे :** ( एकदम ) नाऽही–पण हेही सांगूनच टाकायला पाहिजे एकदा समक्ष–हे पुरतं पटलं आम्हाला.

**सोयराबाई :** बस्स. एवढाच मामला ! आम्ही ठेऊ ते ध्यानी. आमचा वाघजाईच्या अभिषेकाचा समय झाला आहे–छत्रपतींनी निघावं आता !

**संभाजीराजे :** त्यापूर्वी आमचा पुरता अभिषेक ऐकून जावा–राजमंडळाच्या मासाहेबांनी–आणि दौलतीच्या एका वख्तीच्या महाराणींनी ! ( कडकपणे ) जाण्यासाठी नाही–साफ रोकडे बजावायला आलोत आम्ही !

**सोयराबाई :** ( चमकून ) मतलब ?

**संभाजीराजे :** ( ठामपणे ) कुण्या बाईची बाब भरीला घालून आम्ही बदनाम होत नाही ! प्रधानमंडळातल्या खाशांना हाताशी धरून–खास अक्कलहुशारीनं रचल्या कटावानं आम्ही दस्त होत नाही !! साक्षात् विषबाधा आम्हास लागू होत नाही !!! सारं–सारं सिद्ध–शाबित झालंय आता–आता आपण स्वस्थ बसाल तर बडी मेहर होईल आमच्यावर.

( क्षणैक शांतात. एकदम निर्धाराने )

आमच्या–आमच्या मरणातच तुमचं खरोखर समाधान असेल–आबा-साहेबांच्या या देवाधर्माच्या–गोरगरीब रयतेच्या दौलतीचं कल्याण तुम्हास वाटत असेल तर–तर पाठीकडून वार करू नका. द्या आम्हास जहराचा प्याला–खुद्द आपल्या हातानं–आमच्या रामराजांच्या साक्षीनं !! ( वाद्य ) मुकाट ओठांआड करू आम्ही तो–आबासाहेबांचं आणि जगदंबेचं नाव ओठांवर ठेवून !

( सोयराबाई अस्वस्थ–अस्वस्थ होते–जागीच तळमळते–मग तीही निर्धाराने )

**सोयराबाई :** येसाऽजी, मराठ्यांचे छत्रपती कधी प्याद्यांनाही नाही घेत अदावतीत–' पुराव्याशिवाय ' ! जनाना असामीला तर नाहीच नाही ! सांगा हे जरा समजुतीनं दौलतीच्या " छत्रपतींना " ! ( पदर झटकते )

**संभाजीराजे :** ( राजसंतापानं ) खाऽमोऽश ! मासाहेब म्हणून शिवाजी पडीनं

बोललो याचा भलताच मतलब नका घेऊ ! ( येसाजीला–जरबेत ) येसाऽजी, या तुम्ही ! आम्हीच सांगू " बऱ्या समजुतीनं " काय सांगायचं ते–एकेकाळच्या महाराणींना !

( 'जी' म्हणून मुजरा भरून–पार हबकलेला येसाजी–दाभाडे–जातो. क्षणैक रंगमंचावर फक्त अष्टभुजा व वाघजाई यांच्यावर आलटून पालटून दिवे झगमगतात. तसेच ते सोयराबाई—संभाजीराजे यांच्यावर झगमगतात. संभाजीराजे अष्टभुजेपासून तरातर पुढे झेपावतात. मधील झिरझिरीत पडदा झटकन हटवतात—मागे घंटानाद व संबळतुणातुणी निनादतात. )

**संभाजीराजे :** आमच्या रामराजांच्या मातुःश्री–आबासाहेबांच्या नावाचे कुंकू कपाळी लेवलेल्या—म्हणून–म्हणूनच गय करीत आलो आजवर आम्ही–तुमची. फाऽर भडकलेली आहे हवस तुमची—आवरा ती आता.

**सोयराबाई :** ( तेवढ्याच निर्धारानं ) बस्स ! कोण पुराव्यानं घेता तुम्ही आम्हास या अदावतीत ? दौलतीच्या सुरनीस–चिटणीस–हिरोजी फर्जंदासारख्या तोलदारांना हत्तीच्या पायी दिलंत. त्यानं साऱ्यांवरच जबर बसली या दिमाखात सुनावता काय हे आम्हास ?

**संभाजीराजे :** ( ठामपणे ) त्यांना आम्ही नाही दिलं हत्तीच्या पायी—तुम्ही–तुम्ही द्यायला लावलंत ! एकवार माफ करून आम्ही त्यांना पदरी घेतलं. का ? तर आमच्यापेक्षा दौलत मोठी मानून. सारी रयत हे जाणते. पण–पण ते दौलतीच्या पदरी लागायचे ते लागले तुमच्या हातास ! तुमच्या हाताच्या करामतीनं आमच्या कंठास ! ( सुस्कारतो—अस्वस्थ— बेचैन होतो–काही आठवून –भावविवश होत ) पूर्वी-पूर्वी नव्हता तुम्ही कधी अशा ! आम्हास बरी याद आहे—केवढ्या मायेनं खिलावत होता तुम्ही आम्हास हुलग्याचं माडगं ! रामराजे उपजण्यापूर्वी केवढ्या प्रेमभारानं जवळ घेऊन–थोपटत होता तुम्ही आमची पाठ !

**सोयराबाई :** ( खोचक ) तेवढी करी याद आहे म्हणायची 'छत्रपतींना' !

**संभाजीराजे :** बस्स ! आमच्या जन्मदात्या मासाहेब आमच्या बचपनी वाळंतव्याधीनं गेल्या. त्या वख्ती आम्हास पदराखाली घेऊन दूध पाजणाऱ्या गाड्यांच्या धाराऊला आजही म्हणतो—आणि मानतो आम्ही " आऊ ! " खरं तर ती पुण्याई 'तुम्ही' गाठीशी बांधायला पाहिजे होती !

**सोयराबाई** : 'पुण्याईच्या' गोष्टी "वाळतोंडी" ऐकायची आदत नाही आम्हास! आम्ही काही कुण्या घरी माहेरपणासाठी आलेल्या सुवासिनीचा घातपात करण्याची 'पुण्याई' नाही बांधलेली गाठीशी!! ( संभाजीराजे पूर्ण बेचैन–अस्वस्थ होत एकदम कानावर हात ठेवून गरजतात )

**संभाजीराजे** : खाऽमोऽष! जबान सावरा–तिला 'सती' मानलं आणि पूजलं प्रत्यक्ष आबासाहेबांनी. तिच्या नावाचं 'सतीचं वृंदावन' बांधलय त्यांनी.

**सोयराबाई** : आमच्या स्वारीचं—आणि तुम्ही सांगता? अफजलचीही कबर उठवलीय–त्यांनी—

**संभाजीराजे** : च्यूऽप! ( संतापून–नुसते थरथरून ) हे–हे–ऐकायला आज तेच हयात हवे होते—अफजलवर वाघनखे नाहीत एवढ्या शिताफीनं तेग चालवून ही बेगुमान जबानच दिली असती त्यांनी तुमच्याच हाती उतरून! काय जीव आहे—की भडकलेली ज्योत! जीभ आहे की जरंद–जहर!! ( हताश होत ) बाकी तुमचा तरी काय दोष! आमचीच झाली एक गफलत त्या कथल्यात आरोपित म्हणून दर्बारी पेश झालो तेव्हा—

**सोयराबाई** : ( पुरत्या छद्माने ) तेव्हाच गुन्हा कबूल केला असतात—आत्ताच्याच या धाडसानं—तर–तर 'महाराज' म्हणून स्वारीनं 'महाराणी' म्हणून आम्ही थोर मनानं तेव्हा केलंही असतं माफ–"बाळ" गुन्हेगारास!!

**संभाजीराजे** : ( शांतपणे ) गुन्हा आम्ही नाही–केला होता तुम्ही!

**सोयराबाई** : ( चमकून खोचक ) आम्ही? मतलब?

**संभाजीराजे** : ( भान घेत ) आम्हास आरोपित म्हणून पेश घेतलेल्या त्या दरबारात आबासाहेबांनी सवाल केला होता—"कोण घालणार होते बाईस तुमच्या खिलाफ भरीस? त्या वहिमी असामीचे नाव सांगा." तेव्हाच–सांगायला पाहिजे होते आम्ही वहिमीचे नाव–सारे रिवाज–संस्कार बाजूला सारून.

**सोयराबाई** : ( बेडरपणे ) मग आत्ता सांगा! म्हणा हवं तर त्या आम्हीच होतो म्हणून!!

**संभाजीराजे** : होय–होय होय–तुम्हीच होता! तुमच्या या पायावर रेखलेल्या आळत्याच्या मेंदीची नसेल एवढी आहे तुमच्या हरेक छुप्या जनाना चालीची गुंतवळ! तुमची तुम्हास तरी ती आज उकलतेय काय? त्या कथल्यात हकनाक बळी गेला, निष्पाप गोदावरीचा आम्ही झालो बदनाम. आबासाहेबांना झाला

उदंड मनःस्ताप–तुम्ही–तुम्ही मात्र राहिल्यात अल्हाद–नामानिराळ्या !

**सोयराबाई :** ( खोचक ) बराच पूर्वील हिसाब मनी धरून आलेले दिसतात छत्रपती !

**संभाजीराजे :** नुसता मनी धरून आलो नाही—तो पुरता पावता करण्यासाठी आलोत–" महाराणींना "–एका वख्तीच्या ! एकाच भरोशानं आज ना उद्या कधीतरी तो आमच्या संगती ऊरीफुटी दौडणाऱ्या मावळ्यांना उमगेल. राना-शिवारात कष्टून घाम गाळणाऱ्या दौलतीच्या कास्तकऱ्यांच्या ध्यानी येईल. ( थांबून–भान घेत ) ज्यांना साऱ्यांनी ' शिवाचा ' अवतार मानलं त्या आमच्या आबासाहेबांशी–तुमच्या–साक्षात् तुमच्या कुंकूबळाशी तरी काय चालीनं वागलात तुम्ही त्यांच्या अखेरी–अखेरी ? ( वाद्य )

**सोयराबाई :** ( प्रथम बेचैन–तडफडते–मग निकरानं ) काय ? स्वारींचंही—आम्हीच–आम्हीच काही बरं–वाईट केलं असं तर—

**संभाजीराजे :** ( एकदम ) तसं नाही म्हणणार आम्ही ! तेवढी तेवढी आहे शाबुत आमची बुध अद्याप ! तेवढे बेवकूफ ना ते होते—ना आम्ही आहोत–की तुमच्या हातून घात करून घेऊ ! पण–त्याहून काळीजतोड करणी केलीत तुम्ही जनाना छुप्या राजकारणाची त्याचं काय ?

**सोयराबाई :** ( मानभावीपणे ) त्याहून—करणी ? छुप्या राजकारणाची ? कसली ?

**संभाजीराजे :** आबासाहेब आजारी म्हणून बिछायतीला खिळून पडताच–उभा रायगडच ताब्यात घेतलात तुम्ही—' महाराणींच्या ' अधिकारात ! बाहुली खेळवावी तशी नाचवलीत गडावरची माणसं बुद्धिबळाच्या चालीनं.

**सोयराबाई :** ( खोटेपणाने ) बाई बाघजाई ! स्वारी गडावर असताना ? थोरल्या मासाहेबांना तरी असतं का ते फावलं ?

**संभाजीराजे :** ( एकदम ) सबूऽर. नावसुद्धा नका घेऊ आमच्या जगदंबस्वरूप थोरल्या मासाहेबांचं ! स्वप्नीदेखील त्यांच्या पंक्तीला नका मांडू तुमचा थाळा ! गुमान ऐका तुमचा करिना–आबासाहेब आजारी असता–गडाचे दरवाजेच बंद करून टाकले तुम्ही. आमच्या हाती त्यांचा एकही खलिता पडू नसे असा दरोबस्त बंदोबस्तच केलात. ते राहिले तळमळत इथं आमच्या भेटीसाठी—आम्ही राहिलो तडफडत पन्हाळ्यावर त्यांच्या दर्शनासाठी. नाही घडू दिलीत

तुम्ही त्यांची–आमची आखरी भेट ! ( पुरते बेचैन होतात. एकदम संतापून ) एवढ्यावर तरी थांबलात ? ज्यांनी माथ्यावर सोनमोहरांचा अभिषेक घेतला–मंत्रघोषात—त्यांचा त्यांचा—( थांबून कडाडत ) मंत्राग्नीनं न करता अंत्यविधी करविलात–तुम्ही भडाग्नीनं ! ! ( सूचक शहारती वाद्यं )

**सोयराबाई :** ( चिडून ) भलतेच्र भरकटताहेत छत्रपती 'बाळ तोंडी' ! 'छत्रपती' झाल्याचा गौर मानून बोलता काय हे आम्हास ? या साऱ्यास 'पुरावा' काय ?

**संभाजीराजे :** पुरावा–पुरावा ! 'आमचे' बंधू रामराजे 'तुमचेच' पुत्र आहेत यास लागेल का काही पुरावा ? साऱ्या अघटिताचा समूळ तलास—तपास घेऊनच बोलतो आहोत आम्ही—( खोचकपणे ) "बाळ–तोंडी !" 'काष्टमूर्ती' करवून आबासाहेबांचे सारे विधी पुन्हा करण्याची नौबत आणलीत तुम्ही–आम्हावर ! ( अस्वस्थ फेर घेतो पुन्हा शांतपणे–) एवढं एवढं करून तरी थांबलात ?

**सोयराबाई :** ( मार्मिक खोचकपणे ) आजवर आम्ही ऐकून होतो की 'कलुषा कब्जीच्या' संगतीत राहून 'छत्रपती ) काव्य का काय ते रचतात म्हणून ! पण आज–आज–मात्र आला चांगलाच पडताळा !

**संभाजीराजे :** जबान सिधी करा—'कलुषा कबजी' नका म्हणू यांना ! 'कवी कुलेश' म्हणा. जमत नसेल तर कवीराज म्हणा ! 'कबजी' हा देखील तुम्हीच कसबानं बक्ष केलेला मरातब आहे त्यांना ! आणि जमलं तर ध्यानी ठेवा—कटाव रचण्याइतकं सादिलवार नाही काव्य रचणं ! प्रांत नव्हे तो तुमचा

**सोयराबाई :** ( फणकारत ) बाई बाबजाई, भलताच संताप आला की कोण कुठला कलुषा–म्हणजे कवीराजाचं नाव घेताच छत्रपतींना ! ( ठासून ) आम्हीच काय सारा गड या तुमच्या काव्य का काय त्या प्रांताबद्दल बोलतोय.

**संभाजीराजे :** ते बघू आमचं आम्ही. बगल न देता ऐका–आम्हाला दस्त करण्याचा पहिला कटाव सफे फसला तरी दुधानं तोंड नाही पोळलं तुमचं ! रचलात पाठोपाठ दुसरा कटाव—त्याच दुखऱ्या आण्णाजींना हातास धरून. पाहिला होता आगीचा वारसा सांगणारा—तर दुसरा होता जहराचा वसा सांगणारा—होय विषाचा !

**सोयराबाई :** ( फेकून देत ) मन–माने बोलू नका ! खूप ऐकलं आम्ही आत्ता-पर्यंत ! कसला केला आम्ही दुसरा कटाव? कसं कराल ते शाबित ?

**संभाजीराजे :** भक्कम बोलता पुरावाच घेऊन आलोत आम्ही आज ! पन्हाळ्या-वर आम्हाला थाळ्याच्या अन्नातून विषप्रयोग करवून जिवे मारण्याचा कुटिल डाव रचला होता तुम्ही—प्रत्यक्ष आमच्या मासाहेबांनी ! ! ( वाद्य ) खैर जगदंबेची की एका धनगरानं वेळीच दिलेल्या विषपारखी अंगठीमुळे सलामत बचावलो आम्ही.

( आता चढत्या आक्रमक बोलात— ) एवढं—एवढं करून तरी थांबलात तुम्ही ? नाही ! या साऱ्याहून कुणाच्याही ध्यानी—मनी येणार नाही—असं खतरनाक रूप उमटलंय तुमचं या-या खलित्यात—तुम्ही खुद्द तुमच्या शिक्के दस्तुरानं औरंगपुत्र शाहजादा अकबराला लिहिलेला खलिता आहे. हीही खैर की त्यानंच स्वतःहून दिला तो आमच्या हाती–काय–काय जहर ओकलंय या खलित्यात तुम्ही दौलतीच्या साक्षात् एकेकाळच्या महाराणींनी–ऐका–कान उघडे ठेवून, हे तुमचेच बोल नीट ऐका–( खलितावळी–सोडून मध्ये उंचशी धरतात. टेपवर खलिता वाचलेला ऐकू येतो— )

" प्रति–अनाम दौलतहु–शाहजादे अकबर–यांसी–दंडवत–उपरी विशेस—

सांप्रत सारा बेत पुऱ्या सावधानगीने जमवून आणला असे पन्हाळप्रांती राजियास गुप्तरितीने अभक्ष्य भक्षण करवून, त्यांचा कायमचा पुरता बंदोबस्त करवीतच आहोत. तुम्ही बिनासंकोच जमेतिनिशी येऊन आम्हास मिळणे ! तुम्हास देणे तो मुलुख विचार—विमर्शे मसलतीने ठरवून तोडून देऊ ! ! ( वाद्य ) जरोर निघोन येणे ! "

(संभाजी राजे अस्वस्थ फेर घेऊन) व्वा ! व्वा ! काय शक्कल–काय अक्कल ! अभिषिक्त राजाला अभक्ष्य आणि–आणि उभ्या हयातभर ज्याच्याशी आबासाहेबांनी भांडण मांडले–त्या औरंगच्या बंडखोर शाहाजाद्यास दौलतीचा हिस्सा !!

( एकदम संतापून ) अरे, काय माणसं आहात की सैतान सारे ! तुम्हीच सांगा—तुमच्या या जीवघातकी कटावातल्या हस्तकांना आम्ही हत्तीच्या पायी द्यायला नको होतं तर—तर काय त्यांना अंबारी पाहिजे होती द्यायला बसायला मरातबानं ? ( सोयराबाई तोंडावर ओंजळ घेते ) सांगा–गुमान का ? का झाली

# अंक तिसरा

## प्रवेश पहिला

( संगमेश्वर येथील शिवालय दिसत आहे. देसायांचा वाडा व शिवलाय यांचे एकत्र ' जोडभान ' देणारे हे दृश्य आहे. म्हणजे वाड्यातून ये जा करणारा दरवाजा एका कोपऱ्यात स्पष्ट दिसतो आहे. मध्ये शिवालयाचे खांब, हमचौक, त्यावरचे दगडी कासव व उजव्या कोपऱ्यात शिवपिंडाचा प्रशस्त व अर्धवट निसटता भाग दिसावा. त्या दिसल्या भागावर मागे ' गॉज 'ची जागा आहे. ' गॉज ' व शिवपिंडी यांचे सानिध्य आवश्यक आहे. कारण त्या ' गॉज 'मध्ये शेवटी ' बस्ट 'मध्ये शिवाजी महाराज दिसणार आहेत. शिवालयात ओळंबल्या दोन-चार घंटांचा कल्लोळता नाद प्रथम होतो. हा नाद येसूबाईची मनःस्थिती व एकूण मराठी दौलतीची हालत यांचा सूचक आहे. तो मंदावला आहे पण थांबलेला नाही. पाठोपाठ लढाऊ स्त्रीवेष घेतलेल्या ( पुढील इतिहासातील ताराराणी सदृश पेहरावात ) कमरेला तलवार व कट्यार असलेल्या पुरत्या अस्वस्थ अशा महाराणी येसूबाई, जासूद-नायक बहिर्जी व मुजुमदार रघुनाथपंत हणमंते यांच्यासह प्रवेशतात. आता घंटानाद स्थिरावतो. तशी—)

**येसूबाई :** मुजुमदार रघुनाथपंत, शेवटी रायगड उतरून खासा आम्हीच आलो इथवॅर-या संगमेश्वरापावेतो. देसायांच्या वाड्यासमोर. बहिर्जी. आता एक पळभरही वाया न दवडता आम्हास टाकोटाक महाराजस्वारींच्या सामने पेश करा. स्वारी-आणि तीही इथं या संगमेश्वराच्या शिवालयात ! प्रसंग

कोण—मुलखाची हालत काय ? आता—आणि तेही आम्ही स्वस्थ राहावं ? ते होणे नाही. जा, नाईक, सिताब वर्दी द्या. सांगा. आम्ही आलोत— जातीनीशी.

**बहिर्जी :** ( वाकून ) जी. जासूदीच्या-ह्यातीचं समदं कसब पनाला लावतू म्होरं घालून आन्तो राजास्नी. रानीसाबांनी हतंच थांबावं ( मुजरा देतो. जातो )

**येसूबाई :** रघुनाथपंत, खेळण्याहून छंदोगामात्य कुलेशांचा खलिता येतो काय-स्वारी रायगड उतरून शिर्काणात उतरते काय—उतरते नि पुन्हा म्हणून परतत नाही. आम्हास कोण घोर ! बरे खलिता तरी काय मजकुराचा ?

**रघुनाथपंत :** आम्ही डोळ्यांखाली घातलाय तो राणीसाहेब, कुलेशांनी खलित्यात लिहिलंय—"गणोजी राजे शिर्के यांची शिर्काणाच्या वतनाची बाबत तडीस लागत नाही. शिर्क्यांनी स्वतःस शिर्काणाचे 'सवते राजे' म्हणून दवंडी पिटवून जाहीर केले आहे ! स्वामींच्या अधिकारास ते मानत नाहीत."

**येसूबाई :** ( हातवारा करत ) "हा घरचा मामला. स्वामींनीच जातीनीशी काय तो मार्गी लावावा." हा असा खलीता वाचून तर सोडला रायगड स्वारींनी. आम्ही जाणतो आमच्या दादासाहेबांना. त्यांच्या बाबीनं काही खास सावधानगीचं बोलावं स्वारींना म्हणून तर वाट पाहिली. स्वारी आज रायगडास परतेल—उद्या परतेल—पण...

**रघुनाथपंत :** पण मृगाच्या पावसाळी वाऱ्यावर, सावरीच्या म्हाताऱ्याच म्हाताऱ्या उडाव्या तशा एक ना दोन आवयाच आवया आदळताहेत गडावर. काय तर म्हणे महाराजांनी दौलत टाकली, कफनी धरली. छंदोगामात्य कुलेश. बावांच्या पार मुठीत गेले. राजधर्म सोडला. चंडीची अघोर आराधना मांडली आहे. यज्ञवेदी उठवून त्यावर पशुबली दिले जाताहेत—महाराज—महाराज नित्यनेमाने अभक्ष्य भक्षून—

**येसूबाई :** फार अडखळलात—संकोचलात तुम्ही बोलताना पंत. आम्ही बरा माग घेतला आहे साऱ्याचा—याहून वारेजोड बोलले जाते आहे—स्वारीबाबत,

**रघुनाथपंत :** ( चाचरत ) नाही—म्हणजे—'याहून अधिक'—ते काय नाही समजलो आम्ही.

**येसूबाई :** होय पंत, याहून अधिक ! तुमचा—आमचाच काय प्रत्यक्ष गनिम आलमगिराचाही विश्वास बसता बसणार नाही असं ! बेलाग जबानीनं आणि

चौटाप उधळलेल्या मनानं !

**रघुनाथपंत :** म्हणजे—काय नेमकं कानी तरी काय आलंय राणीसाहेबांच्या ? समजू द्या तरी आम्हास.

**येसूबाई :** रघुनाथपंत, तुम्ही मुजुमदार आहात. पूर्वी प्रांत कर्नाटक सुभेदार म्हणून राखलात. थोरल्या स्वामींचा काळ होताच बेदिल माणसांनी स्वारीविरुद्ध रचल्या कटावाची खबर ऐकून वडिलकीच्या थोर मनानं कळवळून रायगडी आलात. पोक्तपणाच्या मानानं बिरवाडीच्या भेटीत स्वारींना हिताच्या चार रोकड्या गोष्टी निडरपणे सुनावल्यात तुम्ही. ( क्षणैक थांबते ) झाली का स्वारी त्यासाठी त्यावेळी तुम्हावर खफा ? केली का तुम्हास काही याद राहील अशी सजा आमच्या स्वारीनं ?

**रघुनाथपंत :** ( भान घेत ) छे छे, मुळीच नाही. उलट—उलट आमच्या बोलण्यामागचा निर्मळ हेतु जाणून महाराजांनी—स्वामींनी 'कर्नाटकसुभा' म्हणून आम्हास परत पाठवण्याऐवजी इथंच ठेवून घेतलं 'दौलतीचे मुजुमदार' म्हणून.

**येसूबाई :** 'मुजुमदार' म्हणून मुजमूचे काम कशासंबंधी असते हे तुम्ही जाणताच.

**रघुनाथपंत :** जी. दौलतीतील खजिन्याच्या लहानथोर हिशेब—ठिशेबाशी संबंधीत असते मुजमू.

**येसूबाई :** म्हणूनच खजिन्याच्या हिशेब—ठिशेबाबाबत अकलेचा जो वकुब तुम्ही वापरता, तोच रोकडेपणाने थोडा वळता करा. आम्ही आता सांगतो आहोत त्या स्वारींच्याबाबत उठलेल्या आवयांचा नीट हिशेब मांडा आणि शांत अक्कल-हुशारीने निवाडा द्या पंत.

**रघुनाथपंत :** जी. पुरत्या निकोप मगदुरानं रास्त दिसेल—वाटेल तेच बोलत आलोय आलोत आम्ही. तसेच बोलू.

**येसूबाई :** स्वारीबद्दल आजकाल बोललं जातंय—या देसायांच्या वाड्यात चंडीचा यज्ञ मांडून वेदीसमोर बली म्हणून रेडे कापले जातात ! ( वाद्य ) कापल्या बळींच्या ओल्या कातड्यावर बसून स्वारी यज्ञात हवन करते. ( वाद्य ) तीर्थ म्हणून स्वारी भवतीच्या साऱ्यास सोमरस वाटते. ( वाद्य ) स्वतः घेते. बेहोष होते. ( प्रत्येक वाक्याबरोबर रघुनाथपंत चक्रावताहेत, कानांवर हात

ठेवतात ) गोंधळू–भेदरू नकात पंत. निवाडा पाहिजे तुमचा आम्हास. बोलले जाते—( क्षणैक थांबते. अडाणी मावळ्यांची वाक्य व तीही संभाजीराजांबद्दल बोलण्यास संकोचते. गोंधळते. निर्धारी होते. मावळी भाषेत बोलू लागते. ) बोलले जाते–आमच्या धारकऱ्यात, मावळ लोकात. प्रत्यक्ष आमच्या–आमच्या स्वारीबाबत–काय तर " आमचा संबूराजा त्या कनोजी कलुषा कब्जीच्या मुठीत ग्येला रं ! दारू काय प्येतो-रेडं काय कापतो. बाया काय नाचवतो ! ! " स्वतःशीच पिळवटून भरून येते घळाघळा रडू लागते. त्याच घोगरट आवाजात—) सांगा, पंत, ऐकूद्यात तुमचा निवाडा. राजांच्या–आमच्या स्वारींच्या या वर्तावाच्या हिशेबाचा ताळ सांगा. बोला पंत.

**रघुनाथपंत :** ( हात डोलवून, थरथरत ) नाहीऽऽ ! नाही, राणीसाहेब–आपण शांत व्हावं. सुमार असावं. मावळातलं नेणतं पोरही नाही, मानायचं हे–प्रत्यक्ष औरंगजेबाचा बंडखोर शाहजादासुद्धा करणार नाही हे असलं काही आकरीत धर्मकृत्य म्हणून. आमचे स्वामी तर थोरल्या धन्यांचे नित्यपूजेचे स्फटिक शिवलिंग पुजणारे आहेत. उमाजी आणि केशव पंडिताकडून रामायण आणि महाभारत ग्रंथ ऐकलेत त्यांनी बचपनी. हे शक्य नाही. होणे नाही. सुतराम नाही. आम्हास तर ऐकवतसुद्धा नाही.

**येसूबाई :** ( समाधानी, सुस्कारत ) नशीब–तुम्ही तरी मानता हे..आजकाल आपल्याच बोलावर माणसाचा–आपलाच विश्वास बसू नये अशी आल्येय नौबत पंत. आबासाहेब गेल्यापासून काय घडलं आणि काय नाही याचं चित्र आलं डोळ्यासमोर की काळजाचा देठ कसा पिळवटून जातो. ( घडून गेल्या घटना व काळाचं सूचक वाद्य )

**रघुनाथपंत :** आम्ही जाणतो ते सारं. थोरल्या स्वामींच्या माघारा एकापाठोपाट दोन कटाव झाले राजांच्या खिलाफ ! घरचे हे तिढे निपटून स्वामी राज्याची तवानी बांधणी करताहेत तोच प्रत्यक्ष खासा औरंगजेबच आला चालून दख्खनेवर.

**येसूबाई :** नुसता नाही आला पंत. दाबजोर फौजी बळाचा रेटा संगती घेऊन आला !

**रघुनाथपंत :** जी. तीन लाखांची कडवी हत्यारबंद फौज आणि चौदा कोटींचा खजिना दिमतीला घेऊनच उतरलाय तो दख्खनेत.

**येसूबाई :** ( आपल्याच भानात ) पाठीशी पैशा–माणसाचं हे बळ आणि उरात एक कळ घेऊनच ओलांडलाय त्यानं 'दख्खन–दरवाजा बऱ्हाणपूर.'

**रघुनाथपंत :** कळ ? मतलब ?

**येसूबाई :** होय—कळच. बऱ्हाणपूर मागे टाकतानाच एक कसम घेतलीय त्यानं. थेट कांजीवरमपासून काबूल पावेतो उभा मुलुखपट्टा 'इस्लाम' करण्याची ! ! ( सूचक वाद्य )

**रघुनाथपंत :** म्हणून तर तो सगळ्यात पहिला चालून आला आपल्या मराठी मुलुखावर. आपल्या मुलुखातच आहे चिवट झुंज देण्याची कसबी ताकद हे नेमकं हेरून.

**येसूबाई :** ( पूर्वीच्या काळचे भान घेत ) पुरती तीन सालं आपल्या पस्तीसांवर खानांनिशी जंगजंग पछाडलं त्यानं आपला मावळ मुलुख मुळानिशी उखडून काढायला.

**रघुनाथपंत :** अटीतटीच्या प्राणबाजीनं भिंगरीसारखं जनावर फेकत स्वामींनी तीन सालं दिली झुंज त्याच्याशी.

**येसूबाई :** रामसेज, जंजिरा, वऱ्हाड धरून केवढे दौडले आमचे विठोजी चव्हाण, नागोजी बल्लाळ आणि धनाजी-संताजी ! सरलष्कर मोहितेमामांनी तर कळसच्च केला मर्दानगीचा.

**रघुनाथपंत :** औरंगजेबाला त्याच्या हयातीतील पहिली "पिछाट" घेऊन औरंगाबादेत ठाण व्हायला भाग पाडलं, सरलष्करांनी आणि महाराजांनी.

**येसूबाई :** हताश बादशहानं मराठी मुलुखाला वैतागून शेवटी आपला मोहरा वळवला विजापूरच्या आदिलशाहीकडं. पंत, दख्खनियांची ती अवघी फळी बांधून औरंजेबाशी मुकाबला द्यावा हे आबासाहेबांचे राजधोरण होते. ते काटेकोर पाळण्यात काही झाला कसूर स्वारींचा ?

**रघुनाथपंत :** मुळीच नाही. उलट कवी कुलेशांसारख्या गैरमैदानी असामीलाही स्वामींनी प्रसंगी कार्यी लावले. वीस हजारांची कुमक देऊन पन्हाळ्याहून विजापुरास धाडले.

**येसूबाई :** पण दोनशे सालांपूर्वीची आदिलशाही नाही तगली पंत, औरंगसमोर. एक सालात कोसळली. लागोपाठ भागानगरची–कुतुबशाही शिकस्त झाली. आणि आबासाहेबांनी जसा अंदाज हेरला होता तसा—

**रघुनाथपंत :** तसाच्च—फेरचालीनं औरंगजेब आलाय चालून आपल्या मुलुखावर !

**येसूबाई :** ( अस्वस्थ होते. तळमळल्या येरझाऱ्या घालते ) त्याचे चौतर्फेनं दौलतीत घुसलेले खान ठाव उडवून टाकतायत आमच्या काळजाचा. अवघ्यांचा एकमेळ घालण्यासाठी तिळतिळ तुटते आहे आमची स्वारी. पुन्हा गेली तीन सालं. उसंत म्हणून कशी ती नाहीच स्वारींना. पाऊसवारा म्हणत नाही, ऊन-तापीचा मारा म्हणत नाही उरीफुटी धावते आहे नुसती गोफणगुंड्यासारखी अहोरात्र. त्यांची ही धाव–धावणी बघताना आमचा जीव कसा टांगणीला पडतो ! पण–पण—

**रघुनाथपंत :** ( मान डोलवत ) पण बाईअसामी असून जे राणीसाहेबांना वाटते –ते नाही वाटत जागोजागच्या वतनदारांस. कुतुब—आदिलशाही पडल्याच्या खबरा येतात काय—आणि–आणि पाण्यात ढेकळं विरघळावीत तशी औरंग-बादेला रांगा लावून फितवेखोरीनं खाशा असामीसुद्धा खिल्लती पांघरतात काय ! काही समजत नाही. कोण ? तर राजांचे पाव्हणे अचलोजी निंबाळकर घाटगे, पांढरे–एक का दोन ?

**येसूबाई :** ( शांतपणे ) पुन्हा कचरलात पंत ! आमच्या कानी आलंय—खुद्द आमचे दादा—गणोजीराजे जाऊन आलेत. औरंगाबादेच्या तळावर. म्हणून तर गड उतरून स्वारींना गाठण्याची घायकुती केली आम्ही ! वडिलधारे, जाणते आहात–बोला पंत, घडते आहे, दाटून येते आहे यात कसूर कुणाचा, आमचा ? स्वारींचा ? तुम्हा साऱ्या नेक चाकरांचा ? कुणाचा ?

( कवी कुलेश प्रवेशतात. ते झुकून मुजरा करीत असतानाच अतिव तिर-स्काराने ढवळून येत. )

**येसूबाई :** कोऽण–तुम्ही ? शामतच कशी झाली तुमची आमच्या सामने येण्याची ? आम्हास भेटणे आहे स्वारींना—तुम्हास नाऽही !

**कुलेश :** ( लवूनच ) क्षमा असावी महाराणी, काहीतरी गफलत होते आहे. गैर —गैरसमज होतो आहे आम्हांबाबत.

**येसूबाई :** ( राजसंतापानं ) खामोऽष ! जबान सावरा. तुम्ही असाल 'छंदो-गामात्य '–कुलएख्त्यार '–आम्ही–आम्ही दौलतीच्या अभिषिक्त 'महाराणी' आहोत ! ( कुलेश आदरानं झुकून–चटकन 'जी' म्हणतो ) स्वारीस भलत्याच

वाटेस लावणारी तुमची हवस पुरती जाणून आहोत आम्ही! शरम–शरम कशी नाही वाटली तुम्हास हे असं सिधे आमच्यासामने उभे ठाकताना? (गर्रकन् पाठ फिरवते–कुलेश व्याकुळतो–त्याच्यावर रघुनाथपंत व बहिर्जी माराच मारा करतात.)

**बहिर्जी :** अवरंगशाचं 'जासूद' मानत्यात–आपल्याच तळावयलं सम्दं धारकरी –तुम्हासी 'कबजीबाबा'! (कुलेश चक्रावून बघतो)

**रघुनाथपंत :** स्वामींशी खेळ ही आमच्याशी–पेशवे निळोपंतांशी 'गाठ' आहे हे बरे समजून असा छंदोगामात्य! (कुलेश पुरता गोंधळतो. कोंडीत सापडतो. त्या दोघांकडे आलटून पालटून जातो.)

**बहिर्जी :** (पुरती तराटणी देत) मुस्क्या आवळून जेरबंदच कराय आलोय तुम्हास्नी! (कुलेश असह्य पोटतिडीकेने कळवळून पुढं होत—येसूबाईंच्या पायांना हात लावून बसूनच)

**कुलेश :** (पिळवटून) आईसाहेब, वाटल्यास—या क्षणी गर्दन मारावी या छंदोगामात्य कुलेशाची. 'कुलदेवतेची' आण घेऊन सांगतो आम्ही–मासाहेब —या चरणाशी–दौलतीच्या सूर्यप्रतापी स्वामींशी–उफराटे, गद्दार–बेईमान नाही आम्ही. आत्ता नाही–पूर्वी कधी नव्हतो आणि इतःपरही असणार नाही. (भरून येऊन गदगदतो.)

**येसूबाई :** (मागे हटत) बस्स–स्वारींना घेऊन तुम्ही इथं संगमेश्वरात का? जाब द्या फक्त एवढ्याचाच!

**कुलेश :** (उठून–कळवळत) स्वामींनी गणोजीराजांना शिर्काणाबाहेर पिटाळलंय. ते थेट बादशहाच्या गोटात जाऊन दाखल झालेत. जाता–जाता–शिर्काण प्रभानवल्लीच्या लहानथोर वतनदारांस–सर्दारांस मन मानेल ते सांगून— स्वामीविरुद्ध भडकावून दिलंय त्यांनी.

**येसूबाई :** (जबरदस्त करडेपणे) आम्ही विचारतो आहोत – तुम्ही काय करताहात? स्वारी काय करते आहे?

**कुलेश :** (पुन्हा त्यांचे पाय धरत) आईसाहेब, भरोसा ठेवावा...खुद्द आम्ही जातीनिशी—प्रभानवल्ली–शिर्काणच नव्हे तर तळकोकणचा गाव नि गाव पायांखाली घालून–बेदिल–डायाडौल झालेल्या माणसांचा—मेळ घालण्यासाठी रात–दिन एक करतो आहोत.

**येसूबाई :** ( खोचकपणे ) आणखी कशा-कशाचा मेळ घालताहात स्वारींशी इथं बसून ? ' मराठी दौलतोचा राजा ' म्हणजे केव्हाही--कनवटीला लावता येईल असा---' कनोजी ' पगोडा वाटला की काय तुम्हास ?

**कुलेश :** ( कळवळून---समजावत ) नाही---नाही राणीसाहेब-आम्ही आमचा देश कनोज सोडून इथवर आलोत ते महाराजांची धमक-जरब जाणून-पारखूनच. कितीही ताकदवर झाली म्हणून टिटवी काही पश्चिम-दर्या पिण्यासाठी चोच उचलणार नाही हे जाणतो आम्ही. स्वामींची पडेल ती नेक सेवाच केलीय आम्ही. आणि करत राहू मासाहेब---

**येसूबाई :** ( झटकून टाकत ) शब्द बोलू नका. उन्हा-तान्हातूनसुद्धा गनिम-फौजा मुलुखभर दौडताहेत. गावागावांवर तुटून पडताहेत.

**रघुनाथपंत :** मोक्याच्या गड-कोटांना जागोजाग घेर पडताहेत.

**बहिर्जी :** आन तुमी रायगड सोडून खुशाल म्हाराजास्नी ख्याली खुशालीत गुतवून-हतं ऐषारामात---" असं मुलुखभरची रयत बोलतीया !"

**येसूबाई :** कुठल्या जन्मीची दावेदारी साधताहात ही दौलतीचे अन्न खादून ! कसल्या कसूराची घनघोर सजा देताय ही आम्हास अस्तनीतला अंगार बनून ( कवी कुलेश कानांवर हात ठेवून---किंकर्तव्य होऊन तळमळतो आहे तोच-संभाजीराजे प्रवेशतात. केस मुक्त-अंगावर भगवी शाल-संभाजीराजे प्रवेशताच ---येसूबाई पुढे होऊन नमस्कार करतात. पंत-बहिर्जी मुजरे देतात. कुलेश-मात्र सुन्नपणे तसेच उभे आहेत. )

**संभाजीराजे :** मराठी दौलतीच्या महाराणी-आबासाहेबांनी दिलेल्या शिक्के-कट्यारीच्या अधिकारी-आमच्या श्रीसखी आम्ही सांगतो, विश्वास टेवा. कसूर कुलेशांचा नाही-कसलाच नाहीं ! या पंतांचा, नाईकांचा अवघ्यांचा झाला अपसमज तर निपटता येईल तो. पण तुमचा-तुमचा होऊन नाही चालणार. शांत व्हा. शांत चित्ती बोला या कुलेशांबाबत काय बोलणे असेल ते-आमच्याशी ( आत्ता कुलेश झटकन् मुजरा देतो )

**येसूबाई :** स्वारी या कुलेशांच्या मुठीत पुरती पुरती गेलेय-असं म्हणतात सारेजण.

**संभाजीराजे :** आणि त्यावर इतरांनी ठेवला तसा तुम्हीही ठेवलात विश्वास ! एवढी आहे मोठी आणि भक्कम या कुलेशांची मूठ ? ( बहिर्जी, येसूबाई,

रघुनाथपंत एकमेकांकडे बघू लागतात ) राणीसाहेब, ह्यातीच्या चकभुलीनं दिलेरच्या गोटात गेलो आम्ही. ( खंतावत ) तो एक डाग. सल नाही निपटता निपटत अद्याप. झाली असेल तर ती, ही एवढी एकच अक्षम्य गफलत आहे आमची. एकच एक दगडगुंड बसताच आग्यामोहोळातील गांधील माश्याच माश्या उठाव्यात तशा आमच्या बाबीनं या आवयाच आवया उठताहेत आज. कोणकोण आहेत यामागं जाणायचंय तुम्हास ? आहे तुमच्या दिलाची तेवढी तयारी ?

**येसूबाई :** ती आहे म्हणूनच तर रायगड उतरून इथवर आलोत आम्ही. आम्हीच नाही—मुलूख चक्रावला आहे स्वारींच्या या गुमान—निसूर बसण्यानं.

**संभाजी :** मग ऐका तर ! या सर्वात हरोलीला आहेत ते तुमचे ' दादासाहेब ' गणोजीराजे शिर्के ! आबासाहेबांपासून तुम्ही—आम्ही त्यांना ' राजे ' म्हणत आलो हीच झाली आहे गफलत ! त्यांनी उगविलेल्या बोलवेला जागोजागच्या फितवेखोर वतनदारांनीही दिली आहे जोड आपल्या करामती बोलांची ! आम्हा विरुद्ध बकणार नाही तो एक मूर्ख अशीच हालत आहे आज चौफेर.

**रघुनाथपंत :** असं का घडावं ? थोरल्या स्वामींच्या समयी रजपूत मिर्झाराजा आला चालून. उभा बारा मावळ तसनस केला. रगडला त्यानं. पण मामुली रयत ती नाही डगमगली. क्षमा असावी, स्वामींच्या सावधानगीत काही कसर तर...

**संभाजी :** जाणतो आम्ही तुमच्या बोलण्याचा रोख. संकोचू नका पंत. मोहिमेत असताना आमचे थोरले महाराजसाहेब घेत होते तसे घेतो आम्हीही प्रसंगानुरूप मद्य. आजच नव्हे कैक सालापासून. ते नाकारण्यात डर कसला ? मतलब तरी काय ? पंत तुम्ही, राणीसाहेब तुम्ही, एक वजेनं तरी खयाल करायचा होता— आमच्याकडे आला तो औरंगजेबाचा बंडखोर शाहजादा अकबर मदतीसाठी येताना आमच्यासाठी नजराणा म्हणून काही मद्याच्या सुरया नाही आणल्या त्यानं आणली ती आमच्या विरुद्धच्या कटावाची कागदपत्रे—भेट म्हणून

**कवी कुलेश :** महाराणी, मुजुमदार, वहिर्जी, मासला म्हणून एकच बाब ध्यानी घ्यावी. आग्र्यातून थोरले स्वामी आणि स्वामी सलामत निसटले तर—मुलुख-भर बोलवा झाली की थोरल्या स्वामींना कुठेही गायब होण्याचे आणि कुठेही प्रकट होण्याचे एक ' चेटूक ' सायवळ आहे ! ठेवायचा का आपण साऱ्यांनी त्यावर भरोसा ?

**बहिर्जी :** आमी वाईच बोलावं का धनी ?

**संभाजी :** नाईक ? तुम्हास–आणि इजजत ? खरं तर बोलावं ते फक्त तुम्हीच आणि ऐकावं ते आम्हासह साऱ्यांनी. बोला बेशक बोला. जासुदांचे नायक म्हणून जागत्या डोळ्यांनी दौडताय चौमुलुख तुम्ही–ठेवलं तर तुम्हीच ठेवाल नेमक्या वर्मावर बोट !

**बहिर्जी :** ( वाकून ) जी. झाल्यालं हाय त्ये खरं काय हाय तर—थोरल्या धन्याच्या वख्ती–आदिलशाईचं आसू, कुतुबशाईचं आसू मुगलशाईचं आसू कुनी ना कुनी खानच चालून आलं दौलतीवर वयल्या हुकमापरमानं आलं आन हतं जाम फतलं, कुथलं. पर इमान इबवारानं आपल्या करतुतीच्या खोट्या खबरा मातुर वर धाडत ऱ्हायलं. पर या वक्ताला खुद्द बादशहाच आलाय बळजोरीनं–आन् त्येच्या रेट्याम्होरं आदिल–कुतुबशाया ढासळल्या. त्या ढासळल्या. तसं हतलं वतनदार हादारल्यात. आन् त्ये हादरल्यात तसं जागोजागच्च धारकरी येलबाडल्यात. बोलत्यात हो तसं–काय बी !

**कवी कुलेश :** आमच्या मुसक्या बांधायची गोष्ट तुम्ही आत्ताच काढलीत हा त्याचाच नमुना मानायचा काय नाईक ?

**बहिर्जी :** ( भान घेत ) थोरल्यांच्या जासूदांचं नाईक हाव आमी कुलेसबाबा ! छातवनावर दगूड ठेवूनच बोललाव आमी त्ये. त्याबगार घडतंय त्ये आमच्या रानीसायबान्नी, या पंतास्नी कळावं तरी कसं ? मुलुख मानतोय तसं आसतं तर पाठ तरी सोडली असती का आमी राजांची झळभर ? आन तुमच्या तरी गमज्या दिल्या असत्या का चालू ? घारवालानं कोंबडीचं पिल्लू उचलावं तसं तुमास्नी कवा उचाललं असतं अल्लाद त्ये राजास्नी दिकून नस्तं उमागलं राणीसाब, पंत, कुलेसबाबा, समद्या लोकांनी खाल्ल्याली हाय ती बादशाची हाय. त्येस्नी बांदाय पायजे. राजास्नी रायगडावर न्याय पायजे.

**संभाजी :** नाईक, नाईक, केवढं नेमकं बोललात ! आमच्या मनातलं आणि मतलबाचं बोललात ! आबासाहेबांची याद दिलीत तुम्ही. पंत, तुम्हास वाटते, प्रत्यक्ष आम्हीच खाल्ली आहे बादशहाची हाय असं ?

**रघुनाथपंत :** ( गडबडून, सावरत ) छे छे–कोण आणि कसं धाडस करील असं म्हणण्याचं ? जंजिऱ्याच्या मोहिमेत हबशाला दर्यापार करताना, आडवी आलेली खाडी लाकूडगाठी आणि कापडाच्या गोणींनी भरून काढण्याची

कोटीस केलेय स्वामींनी हे कोण विसरणार ?

**येसूबाई :** फिरंगाणातून फिरंग्यास हुसकून लावण्यासाठी मांडवीच्या खाडीत घोडा फेकला स्वारीनं हे जाणते सारी दौलत. म्हणून–म्हणूनच आलोत आम्ही सैरभैर होऊन, एकच्च विचारायला ! स्वारी इथं संगमेश्वरात का ठाण होऊन ?

**संभाजी :** ( स्वतःशीच बोलल्यासारखे ) का ?—का ? राणीसाहेब, पंत, नाईक सिंहगडावर सुभेदार तान्हाजी मालुसऱ्यांची झाली तीच, हातची ढाल तुटल्या-सारखी गत वाटतेय आज आम्हास आमची.—आमचे सरलष्कर हंबीरमामा —हंबीरराव वाईच्या लढाईत कामी आल्यापासून ! ( वाद्य ) ( असह्य कढाने ) मामासाहेब --( उसासतो )

**बहिर्जी :** ( जोड देत ) काय हाय खंडुबाच्या मनात त्येच न्हाई कळत. छातीचा कोट करून रानवाऱ्यागत मुलुकभर दौड घ्येनारं सरलस्कर वाईच्या लढाईत पडलं. छातवानावर तोपंचा गोळा आदळून घोड्यावयनं भुईला कोसळताना म्हनलं–( भरून येत ) “ थोरल्या धन्यांच्या काळजाचा सोनतुकडा हाय रं आमचा धाकला धनी. जगदंबेच्या दंडातला ताईत हाय रं त्यो ! जपा त्येला. मुजरा सांगा आखरीचा या मामासायबाचा संभूराजाला ! ”

**येसूबाई :** मामासाहेब गेलेत ! स्वारींच्या पाठचा सावलीसारखा आधार गेलाय ! म्हणूनच्च म्हणतो आम्ही रायगडी परतलं पाहिजे. स्वारी इथं का ?

**संभाजी :** परतणारच्च आहोत आम्ही. इथं थांबलो ते केवळ एकाच्च हेतानं ! तोंडावर आल्या गनिमास तोंड देण्यासाठी माणसाचं बळ कमी पडतं आहे— राणीसाहेब. त्यासाठी शिवाला ‘ साकडं ’ घालण्यासाठी थांबलोत आम्ही या शिवालयात ! माणसांच्या मनगटाचं बळही कार्यी लागत नाही तेव्हा त्यांच्या म्होरक्याला सादवावं लागतं ते एकाच्च शक्तीला—शिवाच्या ! निष्ठापूर्वक अनु-ष्ठानानं आराधना मांडली आहे आम्ही त्याची. उद्याच, महाशिवरात्रीच्या शुभ मुहूर्तावर सांगता करणार आहोत शिवाची !

**येसूबाई :** क्षमा करावी स्वारीनं मघापासून आम्ही बोलली त्याची ! आम्ही बोलली ते—

**संभाजी :** राहवलं नाही म्हणून–इथवर दौडत येऊन–आतड्याच्या ओढीनं ! आणि म्हणूनच प्रत्यक्ष तुम्हासच इथे बघताना पार चकित झालो आम्ही !

कसं सांगावं तुम्हाला—प्रत्यक्ष तुम्हालाच इथं बघताना आम्हास काय वाटलं ते ! ( भवतीच्या तिघांकडे बघत ) कुलेश, पंत, नाईक, एकांत चाहतो आम्ही. बोलणे आहे श्रीसखींशी–अं—महाराणींशी ! ( तिघेही एकदम लवतात. 'जी, आज्ञा' म्हणतात. कुलेश शिवालयात व बहिर्जी आणि रघुनाथपंत आल्या विंगेने बाहेर जातात. काही क्षण संभाजीराजे आपल्याशीच विचारात फेर घेतात. मागील सेटच्या दगडी कासवापाशी येऊन थांबतात. त्या कासवाकडे बघत—संपूर्ण नाटकात पूर्वी कधीच न वापरलेली उच्चारांची व आपल्यातच डुबलेल्या भावांची छटा वापरत खोल अर्थाने बोलतात ) आबासाहेबांच्या सूनबाई, मराठी दौलतीच्या महाराणी–श्रीसखी–छे–आमच्या प्राणप्रिय येसूबाई–येसू, आम्ही कळते झाल्यापासून—जिथे कुठे असू तिथे देवदर्शनासाठी मंदिरात गेलो आणि गाभाऱ्यातील देवमूर्तीचे दर्शन घेण्यापूर्वीच आघाडीच्या हमचौकात–पायाशी येऊ बघणाऱ्या या अशाच दगडी कासवाला बघताना नेहमीच खीन-भर तिथंच थबकलो—नकळत. एकाच विचारानं की–की हे दगडी कासव म्हणजे आमच्या हयातीचं प्रतीक तर नाही ना ?

**येसूबाई :** मतलब ? दगडी कासव आणि स्वारींच्या हयातीचं प्रतीक ? कसं म्हणावं ते ?

**संभाजी :** होय येसू. हे दगडी कासव आम्हाला आमच्या हयातीचं प्रतीकच वाटत आलं आहे. मंदिरात दर्शनासाठी येणाऱ्या हरएक भाविक दर्शनभक्ताचे कळत नकळत पाय पडतात ते या दगडी कासवाच्या पाठीवर ! भरल्या मनाचे नमस्कार रुजू होतात ते मात्र गाभाऱ्यातील मूर्तींच्या चरणांपाशी–आम्ही–आहोत या हमचौकातील दगडी कासवासारखे ! आबासाहेब–आबासाहेब आहेत ते दौलतीच्या गाभाऱ्यातील मूर्तींसारखे !

**येसूबाई :** आम्ही जाणतो स्वारींना केवढी वाटत असेल खंत अशा पाठीवर पडणाऱ्या लहानथोरांच्या पायांची ! केवढी कुचंबणा ! आमचाच नव्हता का झाला स्वारीबाबत अपसमज ?

**संभाजी :** नाही येसू. खंत पाठीवर पडणाऱ्या पावलांची मुळीच नाही. एवढी-सुद्धा नाही. खंत आहे ती मात्र एकाच बाबीची–आणि ती जरूर आहे—काळीजतोड खंत आहे ती येसू—

**येसूबाई :** कसली ?

**संभाजी :** उभ्या दौलतीत असा एकही जाणता मिळाला नाही की ज्याच्या ध्यानी कधी हे आलं की—या दगडी कासवाचीही नजर अहोरात्र जोडलेली असते ती—ती मात्र गाभारातल्या त्या मूर्तीच्याच चरणांठायी ! ( वाद्य )—हे नेमकं जाणणारे जाणते होते—आमचे आबासाहेब—आमच्या थोरल्या आऊसाहेब—आम्हास परखड खलिता लिहितानासुद्धा आमचा वकूब पारखून " याहून विशेष ते करावे " असा बोध देणारे समर्थ—आमच्या पाठीशी कळसूबाईच्या कड्यागत हमेश उभे ठाकलेले आमचे सरलष्कर—हंबीरमामा ! हे सारे सारे गेलेत आणि आज आम्ही कसे आहोत—जाणता येसू ?

**येसूबाई :** जी जाणतो आम्ही. हाती पेटती मशाल द्यावी आणि वर धरायला कोणतेच छत न देता ऐन पावसात उभे राहून, ती तेवती ठेवा असे एखाद्यास सांगावे तशी आहे ही हालत !

**संभाजी :** या समयी शिवाला नाही तर सांगावा तरी कुणास आम्ही आमच्या मनीचा हा सल साकडे घालून ?

**येसूबाई :** स्वारींना नेमके जाणणाऱ्यात मघा स्वारीनं आमचं—आमचं—नाव नाही घेतलं ते !

**संभाजी :** ( कळवळून ) येसूऽ !

**येसूबाई :** मूर्ती आणि कासव याबद्दल जसं वाटत आलंय स्वारींना, तसं आम्हासही वाटत आलंय एक खुद्द आमच्याबद्दल !

**संभाजी :** ( चमकून ) " जी ! " काय वाटत आलंय आमच्या येसूंना—श्रीसखींना—महाराणींना—आबासाहेबांच्या सूनबाईंना ?

**येसूबाई :** आम्हीसुद्धा आहोत त्या मंदिरातील हमचौक आणि गाभाऱ्यातील मूर्ती यांच्यामध्ये असलेल्या, उंबरठ्यावरच्या दगडी ठाणवईसारख्या !

**संभाजी :** ( चमकून ) मतलब ? ठाणवईसारख्या ?

**येसूबाई :** होय. ठाणवईसारख्याच ! उरात अपार सोशिकपणाचं करंजेल घेत मूर्तीच्या पायाशी आणि चौकातील कासवाच्या पाठीवर प्रकाश देत, जळत राहिलेल्या ठाणवईसारख्या !

**संभाजी :** ( भरून येत, येसूबाईजवळ येऊन खांद्यावर हात ठेवत ) येसू तुमचा सल तर कुणासच नाही कळून येणार. आम्हास उमगतो तो. उघड मात्र बोलता येत नाही. कधीच नाही आजवर नेमके बोलच सापडले नाहीत कधी

त्यासाठी म्हणूनच घेतलं नाही मघा तुमचं नाव! तुमच्या तोंडूनच आज हे ऐकताना आज मात्र फारऽफार जाणवून गेलं आहे आम्हास!

**येसूबाई :** ( अतीव उत्सुकतेने ) काय ?

**संभाजी :** आमच्याशी जोडलेलं तुमचं ' पत्नी ' हे नातं वगळता उरल्यासुरल्या तुम्ही आहात—तुम्ही आहात—

**येसूबाई :** कोण ?

**संभाजी :** खऱ्याखुऱ्या अर्थानं " शिवकन्या " आमच्या आबासाहेबांच्या.

**येसूबाई :** यासाठीच स्वारींची इथली शिवानुष्ठानाची सांगता होईतो आम्ही थांबावं म्हणतो इथं !

**संभाजी :** ( समजावीत ) येसू. आमचं ऐका. आमची नका चिंता करू. तुम्ही टाकोटाकीनं रायगड जवळ करा. खबरा आहेत एतिकादखानाच्या हशम-टोळ्या गडाभोवती चकरा टाकताहेत. गडावर शाहूबाळ एकले आहेत. सांगता होताच चळ्या घोड्यानिशी करू आम्ही रायगड जवळ—कारण—

**येसूबाई :** कारण ?

**संभाजी :** आम्ही खरे जाणतो येसू, पोरउमरीत सर्वांकडून दूर पारखं राहण्यात काय वेदना असते ती ! आम्ही—आम्ही अनुभवलेय ती मथुरेत–आबासाहेबांचा निरोप घेताना ! आमच्या मनी त्यावख्ती आबासाहेबांबद्दल रोष होता. आज तो नाही. राज्यकर्त्याला सारे मोह निकराने टाळावे लागतात ( जवळ येऊन हात हाती घेत ) येसू, हरेक क्षणी वाटतं तुम्ही जवळ असाव्यात. पण–पण राज्य आणि पत्नी एकाच वेळी नाही येत सांभाळता हे अनुभवानं पुरतं पटलंय आम्हास. निदान या घटकेला तरी गडावर आम्ही नाही–तुम्ही नाही असं नको व्हायला. याच पावली परता तुम्ही रायगडी.

**येसूबाई :** ( विचारात पडते ) जी रास्त आहे हा स्वारींचा सल्ला, निघू याच पावली आम्ही ! निघताना एक मात्र मनी येतं आहे मोकळ्या मनी बोलतो आहोत–राग नसावा स्वारींना. बोलू आम्ही ?

**संभाजी :** अवश्य बोला. बेशक बोल–येसू.

**येसूबाई :** आम्हावर–आम्हावर खप्पा होऊन आमच्या ' सवतीवशाला ' असं किती दिवस दूर लोटणार आहे स्वारी ! ?

**संभाजी :** ( गोंधळून–चमकून ) मतलब नाही समजलो आम्ही ! ' सवतीवसा ' ?

कोण—

**येसूबाई :** ( खोचक ) होय ' सवतीवसाच ! ' तिला क्षणभर दूर करावं असं नव्हतं वाटलं कधी स्वारीला - म्हणून तर आमच्या वाट्याला फाऽर फाऽर कमी येणं व्हायचं स्वारींचं !

**संभाजी :** ( पार गोंधळून ) काय बोलताय काय तुम्ही येसू ? असा आडून वार कशासाठी ? साफ–साफ बोला. तुमचा एवढा भरोसादेखील हरवून बसलो की काय आम्ही ?

**येसुबाई :** ( हसत कमरेच्या तलवारीची गाठ सोडवून ती संभाजीच्या समोर हसतच धरून ) ह्या सवतीबद्दल बोलत होतो आम्ही ! स्वारींना जशी आवडते —तशी आम्हालाही आवडते ही भरोशाची सोबतीण !— प्रत्यक्ष शिवशंकराच्या पुत्राला—गणेशालासुद्धा—शिवाचे आशीर्वाद पाठीशी असूनही गणांचा नायक म्हणून राक्षसांशी लढताना हत्यारच धरावं लागलंय हाती ! त्याची याद म्हणून ही तलवार स्वारींनं जवळ ठेवावी. ( येसूबाईजवळ येत संभाजी हसत तलवार हाती घेऊन मस्तकी लावतो विंगेकडे बघत बहिर्जीला साद घालतो.— " नाईक—बहिर्जी " )

**बहिर्जी :** ( " जी म्हणून प्रवेशत, मुजरा देऊन ) आज्ञा धनी !

**संभाजी :** ( बहिर्जीजवळ जात, खांद्यावर हात ठेवून ) नाईक, तुम्ही आणि पंत राणीसाहेबांसह परता रायगडी—टाकोटाक. आम्ही धर्मविधीची सांगता करून तुम्हापाठोपाठ आहोतच !

**बहिर्जी** : ( घुटमळत ) जी ! रानीसाब काय म्हन्त्यात ?

**येसूबाई :** ( समजावीत ) निघूया आपण नाईक, साऱ्यांनी एकाच जागी गुंतणं रास्त नाही.

**बहिर्जी :** ( तरीही ) धन्यांचा—रानीसाबांचा हुकूमच हाय तर निघूया ! पर—पर—त्ये शिर्कं दुकऱ्या मनानं शिरकानाभाईर निसटल्यात—म्हनून म्हन्ताव—त्येंचा त्येवडा खयाल ठिवावा धन्यांनी !

**संभाजी :** हे संगमेश्वर आहे नाईक—दाट गचपणात वसलेलं !—बंदिस्त ! सांगता होताच घेणार आहोत आम्ही शिर्क्यांचा माग !

**बहिर्जी :** जी. जुहार धनी. ( येसूबाई पुढे जाऊन संभाजीराजांना नमस्कार करते. राजे तिच्या डोक्यावर हात ठेवतात. येसूबाई बहिर्जीसह जाऊ लागते.

संभाजीराजे पाठमोऱ्या तिच्याकडे व हातच्या तलवारीकडे आलटून पालटून बघतात. स्टेजच्या मध्यभागी येतात. तलवारीकडे बघतात. मस्तकी टेकवून मग ती उंचावती अशी समोर धरतात. शिवापिंडीकडे जातात. क्षणैक पिंड निरखतात. हातची तलवार त्या शाळुंकेवर ठेवतात. )

**संभाजी :** आबासाहेबांनी स्फटिक शिवलिंगाच्या रूपात पुजलेल्या शिवा—आमच्या मुलुखभरच्या माणसा–माणसात, त्याच्या हातच्या हत्यारा–हत्यारात तुझं प्रलंयकर बळ ठासून भर. आमचे सरलष्कर हंबीरमामा गेलेत–त्यांच्या ठायी आता तूच खडा ठाक. ( शिवापिंडीजवळच्या 'गॉज' मध्ये हंबीरराव दिसू लागतात. अत्यंत मायाळ बोलात बोलू लागतात. संभाजीराजे भान हरपून त्यांच्याकडे बघतच राहातात. )

**हंबीरराव :** धाऽकऽलं—धाऽकऽलं, मानसं काय आळंब्यागत उपजत्यात आन जिरत्यात–जसं तुमास्नी न्हाई–रानीसाबास्नी न्हाई–तसं–तसं आमास्नीबी न्हाई पारकलं कुनी ! हयातभर घोड्यावर मांड घेऊन मुलुखभर चौफेर दौडलाव आमी. कशासाटनं ? प्वाट जाळाय ? सरलष्करकीची निस्ती चाकरी कराय ? धाकलं थोरल्या धन्यास्नी पाठचं भाव न्हवतं, बोललो न्हाई'कदी पर ती बानच निभावली आमी व्हईल त्येवडं करून !! धाकलं, लई अडचणीत हाईसा. जानताव आमी. एकच ध्येनात ठिवा–बाजी, तानाजी, मुरारबाजी ह्येंची कुवेंडी म्हंजी पाठीवयलं वझंच मानलं थोरल्यांनी. म्हनत आलं हमेशा–"कसले हे राजेपण कैक मरणांचे ओझे पाठीवर पेलत चालणारे ! कशासाठी ? एका स्वप्नाच्या पाठपुराव्यासाठी ? स्वप्ने ? साधुसंताना नसतात का काहीच स्वप्ने ? मग त्यांचा का असतो अट्टाहास मातीपेक्षा मनावर हुकूमत चालवण्याचा ?" तर धाकल नीट ऐकून ठिवा, थोरलं म्हनत आलं "साधुसंतांचा का असतो अट्टाहास मातीपेक्षा मनावर हुकूमत चालवण्याचा ?" परसंग आलाच तर धाकलं तुमास्नी शाबितच करावं लागंल याहून म्होरं जाऊन. मातीसाठनं मनावरबी हुकूमत चालवून ! ध्यानात ठिवा, शिवाम्होरं बसलायसा थोरल्यांचं नाव शिवाजीमहाराज ( ( गॉजवरचे दिवे जातात. )

**संभाजी :** ( उठून गॉजजवळ जात ) मामासाहेब—मामासाहेब—

( कवी कुलेश प्रवेशतात. कमरेला तलवार आहे. )

**कुलेश :** ( लगबगीनं ) स्वामी–स्वामी–काय झाले ?

( पाठीमागे अस्पष्ट कालवा ऐकू येतो. अगदी निसटत्या अशा ' दीनऽदीन च्या आरोळ्या ऐकू येताहेत )

**संभाजी :** काही नाही छंदोगामात्य. आम्हास–आम्हास भास झाला सर-लष्करांचा.

( पाठचा कालवा मोठा होतो. राजे त्याचा कानोसा घेऊन स्टेजवर चपळ हालचाली करतात. कुलेश बाहेर जाऊन पुन्हा आत येतात.)

**कूलेश :** ( साशंक तत्परतेने ) काहीतरी गडबड दिसते आहे स्वामी !

**संभाजी :** ( पूर्ण सावधानतेने ) हा कालवा कसला ? नगारे, शाजणं कसली ? कुलेश–छंदोगामात्य, हा–हा अचानक चालून आलेला हमला तर—

( मुसलमान वेशातला खबरगीर प्रवेशतो–अत्यंत भेदरलेला-गोंधळलेला असा—)

**खबरगीर :** धनीऽ—म्हाराज-घात झालाय-दगा झालाय–कोल्हापुरास्नं मुकर्रबखान हजार स्वारानिशी रातोरात चालून आलाय संगती इख्लासखान हाय.

( पाठीमागचा कल्लोळ वाढला आहे. नगारे, शाजणे वाढली आहेत. दीन दीनच्या आरोळ्या स्पष्ट ऐकू येताहेत. )

**संभाजी :** ( पुढे होत खबरगीराचे खांदे पकडून त्याला हलवत ) काय सांगतोस ? दगा ? रातोरातचा हमला ?

**खबरगीर :** (भेदरून, लटलटत) व्हय धनी ! समदं संगमेसुर हत्त्यारबंद हश्मांनी येरगाटलंय ! गोतास काळ झालेल्या गनोजीनं धन्यांच्या तळाची बित्तंबातमी दिलीया खानाला, कोल्हापूरच्या तळावर ! हजार हशमांचं भिरं घेऊन बानागत घोडी फेकत–मुकर्बरखान भिडलाय संगमेसुराला ! ( पाठीमागचा कालवा वाढतो ) म्हलोजीबाबा, घोरपड्यांचा जमाव घेऊन अटीतटीनं हातघाई करत्या हाईत खानासंगं गावशिवंवर.

( संभाजी झटकन पिंडीजवळ जातो. तलवार उचलतो. म्यानाबाहेर खेचतो. आता पाठीमागचा कालवा अगदी तोंडावर आला आहे. )

**संभाजी :** ( कुलेशाच्या खांद्यावर हात टेवत ) छंदोगामात्य–कवी कुलेश, तुम्ही जमेल त्या हुन्नरानं बाहेर पडा संगमेश्वराच्या. रायगड जवळ करा. आमच्या राणीसाहेबांना–शाहूबाळांना सांभाळा.

**खबरगीर :** न्हाई धनी–चिटपाखरूबी भाईर पडाय वाव न्हाई हशमांच्या

घेऱ्यातनं ! अटीतटीची हत्यारघाई जुंपलिया भाईर—गावभर. ( तलवारीचे खणखणाट )

**संभाजी :** ( स्थिर—शांत होत ) मतलब साफ आहे कवीराज. मनगटावर भरोसा ठेवून इथे लढलेच पाहिजे. ( खबरगीराला ) तू निघ—जा—म्हलोजीबाबांच्या मदतीला.

**खबरगीर :** जी. ( कमरेची तलवार उपसून निघून जातो. )

**कुलेश :** (झटकन वाकून राजांच्या पायांना हात लावत) स्वामी, ह्याक्षणी प्रसंगी प्राणांचं मोल देऊनही करू पुरा आयुष्याचा काव्यसर्ग—छंदोगामात्य म्हणूनच.

**संभाजी** :( हातची तलवार कपाळी भिडवत गर्जतो ) हर—हर—हर महादेवऽ ! जय भवानी !

**कुलेश :** ( जोड देत—तलवार कपाळी भिडवून ) जय भवानी ! हर ऽ हर—हर—महादेवऽ !

( सूचक असा मोठा टोल होतो. धीऽन धीऽन अशा थरारक आरोळ्या ठोकत मुकर्रब व इख्लास नंग्या तलवारीनिशी प्रवेशतात. मुकर्रब संभाजीवर, इख्लास कुलेशावर वार करतात. चौघांच्या तलवारी एकमेकांना भिडलेल्या असतानाच एकदम दिवे जातात. )

## प्रवेश दुसरा

( इंद्रायणी आणि भीमा यांचा ‘ स्पष्ट ’ असा ‘ संगम ’ पार्श्वभूमीला दूरवर दिसतो आहे. नक्की उगवतीचा की मावळतीचा हे कळू नये असा ‘ पूर्णगोल ’ सूर्य संगमावर प्रकाशतो आहे !!!

संगम—तीर धरून खूपसे ( संदर्भाप्रमाणे ६०,००० ) सैनिक तळ टाकून आहेत याचे भान देणाऱ्या ‘ मोगली ’ माटाच्या दाटीवाटीच्या राहुट्या पडद्या-वर चितारल्या आहेत. त्यात मध्येच कुठेतरी ‘ आगट्या ’ शिलगावलेल्या दिसत आहेत. या सर्वांच्या पुढे सेटच्या उजवे बाजूस—संभाजीराजे व कवी कुलेश यांना सजा दिली तो प्रशस्त व ‘ उंच ’ असा दगडी चौथरा दिसतो आहे. तो ‘ उंच ’ केवढा ? तर —

**तर स्टेजवरील सर्वांत उंच अशी ही जागा आहे.** तेथून संगम व राहुट्या-सुद्धा तळवटी अशा खालच्या पातळीवर दिसत आहेत. तळावर धुसर, अस्पष्ट अशा वेगवेगळ्या सैनिकी कामातील हशमांच्या वेगवेगळ्या पोझेसमधील आकृत्याही चितारलेल्या असाव्यात.

दगडी चौथऱ्यावर दोहोत पुरेसे अंतर असलेले असे क्रूससारखे पण नेमके क्रूसच नव्हेत असे लाकडी खांब आहेत. त्या दोन्ही खांबांना ओळंबते साखळदंड स्पष्ट दिसत आहेत.

दोन मोगली हशम खांद्यावर जाड पात्याच्या नंग्या तलवारी पेलत एक-मेकांविरुद्ध चालत चालत पहारा देताना दिसताहेत.

७ ● दगडी चौथऱ्याखालीच तळघराचा दिंडीसारखा दरवाजा दिसतो आहे. हे तळघर म्हणजे रंगमंचाचे एक प्रवेशद्वारच आहे. राजे व कुलेश यांना तळघरात ठेवले आहे. बरेचसे वैतागलेले हैराण पहारेकरी त्यावरच पहारा देत आहेत.

दूरवर तळावरची नमाजी बांग ऐकू येते—

" ला–इलाहऽ इ ल्लि ला ह ऽ मुहम्मद ऽ ररसु ल्लिलाह ऽ ऽ अल्ला ऽ हु ऽ अक्कऽबर !! "

ती ऐकताच पहारा देणारे रसुल खाँ व करीम खाँ हे पहारेकरी—**पहारा थांबवून**, हातातील तेगी खाली ठेवतात. गुढघे टेकून नमाज पडतात. मग उठून क्षणैक पहारा देतात. तो तसा देताना एकमेकांकडे—" आता आपणाला लवकरच उत्तरेकडे परतायला मिळणार " या अपेक्षेने अर्थपूर्ण हावभावाने बघतात. कळसूत्री बाहुल्यांप्रमाणे दोघे एकदम थांबतात. प्रेक्षकांना गोंधळात टाकेल असे मनसोक्त हसू लागतात. तशी—)

**करीम खाँ :** रसुल खाँ, रसुल खाँ, अब जल्दही लौटना नसीब होगा हमको हमारे मुल्क में—उत्तर मे

**रसुल खाँ :** नही तो क्या भाई करीम खाँ, पुरी सात सालं गुजरली या जन्या-दऱ्याच्या नाचीन मराठी मुलखात. हररोज लडाई. दररोज हत्यारमार ! तंग-तंग आये.

**करीम खाँ :** अरे, हे काय आदमी आहेत सैतान आहेत मरगठ्ठे म्हणजे. च्चलो काफरोंका सुभेदार ' संबा ' गिरफ्तार तो हुआ.

**रसुल खाँ :** उसका बम्मन शायर—तो कवी कुलेश—ओभी दस्त हुआ. खैर

खुदा की. ( जिभ चावत ) नही – नही – ( उपरोधानं ) खैर राजे (?) गणोजी की !

**करीम खाँ :** भाई रसूल, दःख्खन अब शिकस्त हुईही मानो—अरे हा सुभेदार आणि त्याचा शायर यूँ चुटकीसरशी शरण येतील—आला हजरतसमोर.

**रसुल खाँ :** ( दबक्या आवाजात ) लेकिन करीम खाँ, क्या अंदाजा है तुम्हारा ? काय करतील आपले रहेमदिल पातशहा सलामत या काफर कैद्यांचं ? या संबाचं आणि त्याच्या शायराचं ?

**करीम खाँ :** ( मान मागे टाकून हसत ) कैसा बेवकूफ सवाल पुछते हो रसुल ! शहजादे असून–सगे भाई असून–जो दाराशिकोहपर बीती—मुरादपर गुजरी—शुजाका हुआ वही हाल होगा इन नाचीज कंबख्तोंका ! ( दबून त्याच्या कानात सांगत ) अपने आला. हजरत नही करेंगे—कभी नही करते— ( उपरोधानं ) एऽहे बिलकुल नहीं करते.

**रसुल खाँ :** ( झिडकारत ) तुम भी कैसे पागल हो करीम खाँ. आपले हजरत कसे करतील असलं नापाक काम ? गर्दन उडवतील दोन्ही कमीन्यांची, मुकर्रब आणि इखलास खाँ—जल्लादांच्या हातून.

**करीम खाँ :** ( तशाच दबक्या आवाजात ) समझ लो यार रसुल खाँ पातशहा सलामत ऐसा नापाक काम कभी नही करते–करवाते है–कुराणशरीफके तौरपर मुल्लामौलवीसे ' वैय्यत ' लेकर करवाते है, हजरत ? ( कान चिमटीत पकडत ) तौबा तौबा कभी नही करते !

**रसुल खाँ :** ( त्याला जोड देत, ढोंगीपणे ) तौबा तौबा कभी नही करते ! ( दोघे एकमेकांकडे अर्थपूर्ण बघून खळाळून हसताहेत तोच विंगेतून मुकर्रब खाँ " कभी नही–हरगीज नही " असे म्हणत व इखलास खाँ " क्यों नहीं ? जरूर होगा खान " असे म्हणत प्रवेशतात. मुकर्रब खाँ मध्यम वयस्क, तगडा इखलास त्याच्याहून थोडा लहान वयस्क. दोघांच्याही खांद्यावर हिरव्या कंच खिल्लती आहेत. त्यांना बघताच पहारेकरी कुर्निसात देतात. तिकडे दुर्लक्ष करतात. )

**मुकर्रब खाँ :** कभी नही होगा—इखलास—कभी नही होगा—काफरोंका कैद सुभेदार ' संबा ' कभी नही होगा तैय्यार इस्लाम अपनाने.

**इखलास खाँ :** क्यो नही होगा ? जरूर होगा खानखानान, या काफरांची

औलादच डरपोक या मरगठ्ठ्यांच्या सुरमा-सालार नेतोजी पालकर नाही का झाला महंमद कुली खॉ ? येभी अपनायेगा हमारा पाक–इस्लाम–अपने शायर के साथ–अभी देखो मजाक.

**मुकर्रब खॉं :** कैसे नासमझ, बेवकूफ हो इखलास, अरे जिद्द नाही बघितलीस त्या दोघांची तू संगमपुरात ? विसरलास संभाला आणि त्याच्या शायराला किती मुष्किलीने गिरफ्तार करावं लागलय आपणाला ते ?

**इखलास खॉं :** तौबा तौबा कैसे भुलूँगा खान ! हा नाचीज शायर जख्मी होऊनही किती जोशात लढला संगमपुरात ! दंडातला बाण दंडातच रूपता ठेवून. अचरज की मिसाल है.

**मुकर्रब खॉं :** (रसुलला) अबे लवंडे, दोनों काफरोंको ठीक तऱ्हासे जखड रख्खा है नं तक्ताकुलाहमें ?

**करीम खॉं :** ( मध्येच ) जी हाँ हुजूर ! बिल्कुल कसके जखड रख्खा है दोनोंको ! पार जाम बंदिस्त केलंय दोघांनाही—सुभेदार संभाला आणि त्याच्या शायराला–इराणी पद्धतीच्या लाकडी खोड्यात.

**मुखर्रब खॉं :** ( त्याच्याकडे तिरस्काराने बघत ) तू बीच में क्यूँ बका रे दोजखी –लईम, नाचीज.

**इखलास खॉं :** ( करीमला ) अरे, ओ मेरे शेरे समशेर, कुछ खाया दोनों काफर कुत्तोंने ? अरे खाल्लय का दोन्ही कैद्यांनी काही ?

**रसुल खॉं :** ( मध्येच ) जी नाही हुजूर. कुछ भी नही. पुरे पाच दिन झाले दोन्ही कैद्यांनी काहीही खाल्लेले नाही. जंग जंग पछाडलं—दाद देत नाहीत दोघेही नबकार.

**इखलास खॉं :** ( चिडून ) खामोश ! तू क्यूं बका बीचमें दोजखके कुत्ते !

**मुकर्रब खॉं :** ( स्वतःशीच हसत ) साले ये दो हैं तो इनकी सौ तऱ्हा ! एक का मेल दुसरे को नही. कंबख्तो, त्या दोघांना बघा जरा. किती हाल झालेत दोघांचे कैद झाल्यापासून ! ढिम्म टबका उडाला नाही दोघांच्या दिलाचा एवढा सुद्धा. नही तो तुम—मरेल साले !

**इखलास खॉं :** संगमपुराहून इथवर–तुळापूर पावेतो किती मुष्किलीनं आणावं लागलंय दोघा काफर कैद्यांना. किस तऱ्हा ? तर—उंटाच्या पाठीवर लादून, दोरखंडांनी करकचून आवळून कडक—हत्यारी पहाऱ्यात. नही तो—

**मुकर्रब खाँ :** नही तो—रानवाऱ्यागत कुठूनही चाल घेत येणारे त्याचे मरगठ्ठे हशम आले असते. केव्हाच्च छापा घालून घेऊन गेले असते—शाही खजीना नेल्यासारखे दोघांनाही अल्लाद उचलून !

**इखलास खाँ :** कैसे जल्लोषमें धींड निकाली काफरोंकी—अकलूजसे लेकर बहादूरगड तक मुकर्रब खाँ ! ( धींडीचे भान देणारे रणहलगी, ताशे यांचे पार्श्वसंगीत. त्यात " धीन–धीन " अशा मिसळल्या आरोळ्या ऐकू येत आहेत मुकर्रब खाँ तो देखावाच्च पाहात असल्याच्या भानात )

**मुकर्रब खाँ :** कैसा शोर था इखलास वह ! कैसा माहौल ! एवढी हयात गेली या मुकर्रबची रणगाजी करण्यात मैदानावर पर ऐसा धिंड का नजरा–इन्शाला कभी नही देखा—कधी नाही पाहिला.

**इखलास खाँ :** ( त्याला जोड देत ) बहादूरगडच्या तळावर दुतर्फा नुसती माणसंच माणसं दाटली कैद्यांना बघायला. संबा कैद झालाय हेच सच वाटत नव्हतं—पटत नव्हतं कुणालाही.

**मुखलास खाँ :** ( त्याच भानात—पार्श्वसंगीत वाजतेच आहे.) कितने आदमी, कितनी औरते, कितने बच्चे—कैसी भींड थी वह ! इखलास, ताबुतांचा जल्लोष बघायलासुद्धा एवढी भीड नाही दाटत मुहर्रमात !

**इखलास खाँ :** साठ हजार हशमांच्या तळावर दोन्ही कैद्यांची—कधी हुई नहीं —होगी नही अशी विदुषकी पेहराव चढवून, साखळदंडात जाम जखडून, फरफटत धिंड काढली.

**मुकर्रब खाँ :** डोक्यावर उंच टोप्या काय, कमरेला घंटेच्या माळा काय, कपाळा भोवती काटेरी वेली काय, असे सजले होते हे काफर ताबूत इखलास. मर्द लोक जान मुठीत घेऊन दोघांना बघत होते—तर बच्चे आणि औरत लोग बेडरपणे दगडी गुंड फेकत होते दोन्ही जहन्नमी कैद्यांवर. क्या था वो नजरा ! पुरे बहादूरगड में 'शबे-बारात' मनाकर–गोश्त–बिर्याणीचे थाळे रिचवले प्रत्येकानं खूष होऊन इखलास. धींडीचा असला अजबोअजब नजारा कधी नाही पाहिला आम्ही–कभी नही.

**इखलास खाँ :** ( करीम रसुलवर चवताळून ) इसी लिए पूछ रहा हूँ सुस्त सुव्वरों, खाया कुछ उन दोनोंने ? अरे कुछ खाएगे नही तो जुबाँ कैसे खोलेंगे ? बोलेंगे कैसे ?

मुकर्रब खाँ : ( दोघांचेही खांदे गदगदा हलवून ) बोलो, दस्त कैदी खायेंगे नाही तो बोलेंगे कैसे ? अब तो खान बहादूर रुहुल्लाखान आनेवाले है—क्या देंगे उनको जवाब ? तौबा तोहमत की बात है. ( पुन्हा दोघांचे खांदे हलवून ) अरे बोलो भी कुछ—तुमने तो खाया है नं सुवा का ' सीर कुर्मा ' ?

इखलास खाँ : ये लौंडे क्या बोलेंगे खान ! मैं बताता हूँ. दोन्ही कैद्यांनी थाळे तर चाखलेच नाहीत पण चक्क थुंकले ते यांच्या थोबाडावर. बडी तोहम्मत की बात है ! रुहुल्ला खाँ आएंगें ! क्या होगा ? ( इखलास मुकर्रब चडफडत इकडे तिकडे फिरू लागतात. रसुल, करीम त्यांच्या मागून लटकत्या कुलंगी कुत्र्या-सारखे फरफटू लागतात ते पाहून असह्य चिडीनं मुकर्रब, इखलास दोघांवरही डाफरतात )

मुकर्रब : } दोजख के कुत्ते—जहन्नमी—पिछे-पिछे क्यों ? फरेबी, नाबकार.
इखलास : } ( दोघांवर वैतागून खेकसतात ) निकल जाव यहाँसे हरामजादे—खिसको—चलो-हटो !

( करीम, रसुल दुसऱ्या विंगेकडे जाऊ लागतात तोच पाठीमागच्या विंगेतून रुहुल्लाखाँ प्रवेशतो. तो मुकर्रब, इखलासपेक्षा वयानं मोठा, तगडा, करडा, वरच्या दर्जाचा असल्यानं धीमं पण जरबी बोलणारा )

रुहुल्लाखाँ : क्या चला है शोर—शोरगुल इखलास, मुकर्रब ? अरे किंचाळताय काय सारे असे साप—विच्चू डसल्यासारखे !

मुकर्रब खाँ { : ( दोघेही आदबीनं कुर्निसात करीत ) कुछ नही खानखानान.
इखलास खाँ { : कैसा शोर—कैसा शोर—कैसा शोरगुल. ठीक तो है सब.

( करीम, रसुल त्यांच्या तारांबळीची मागून नाटकी हावभावाने टिंगल करतात )

रुहुल्ला खाँ : मुकर्रब, कुछ बोला काफर मरहट्टोंका सुभेदार संबा ! कुछ खुली जुबाँ उसके शायरकी ?

इखलास खाँ { : ( लवून ) जी अब तक कुछ भी नही—काहीच बोलत नाहीत
मुकर्रब खाँ { : कैदी—काही खात नाहीत. कोशिश—कोशिश केली पुरी.

रुहुल्ला खाँ : बस ! बस ! खूब सुनली तुमची मर्दानगी ! दःखनी साले ढीले ते ढीले. जाओ. ले आओ दोनो दोजखळे कुत्तोंकी हमारे सामने. हम देखेंगे. ( मुकर्रब, इखलास ' जी ' म्हणून कुर्निसात करतात. रसुल, करीमला प्रथम

ढकलतात. मागून आपण दोघे तळघरच्या दिंडीदरवाज्यातून आत जातात )

**रुहुल्ला खाँ :** ( स्वगत ) विजापूर गिरा, भागानगरीकी शिकस्त हुई, संबा आपने शायर के साथ दस्त हुआ, मरहट्टोंकी हड्डीया नर्म हुई. ( खूश होऊन ) दफा हो गयी दःखन, अब दफा हो गयी खैर खुदा ताल की–परवरदिगारकी. ( नमाज पढू लागतो ) लाइलाहऽ इल्लि लाहऽ मुहम्मद–रे–रसुलिल्लाह— ( नमाज अर्धवट सोडून कोणीतरी बघितले की काय असा हावभाव करीत उठतो. गुढघ्यांचे ठसे जमिनीवर उठले काय या शंकेने ते पायाने पुसतो. मान डोलवत स्वतःशीच पुन्हा बोलतो. ) नहीं–नहीं ! क्या कर रहा है ये रुहुल्ला– काय हौसला तुझा–अरे, हा असा नमाज कुठेही, कुणाही समोर पढावयाचा नसतो—तो अधिकार फक्त ( कान चिमटीत पकडत ) आला हजरतांचा– पादशहा सलामतांचा–शहेनशहा–ए हिंदुस्थाँ आलमगिरांचा. तुझा ? ये ! कभी नही, बिलकुल नही ( तळघराच्या दिंडी दरवाज्यातून प्रथम करीम, रसुल मागे बघत प्रवेशतात. खांद्यावरच्या तलवारी सावरतात. पाठोपाठ मुकर्रब व इखलास कुलेश व राजांना घेऊन प्रवेशताहेत या पार्श्वभूमीला रणहलगी व संबळ तुण-तुण्याचे–चौघडा–नगाऱ्याचे पार्श्वसंगीत वाजते आहे. कुलेश व राजे यांनी चारपाच दिवस काही न खाल्ल्याने ते शरीराने घायाळ आहेत. पण पराकोटीच्या जिद्दीने मनाने ताठर आहेत. पार्श्वसंगीत थांबते !

**रूहुल्ला खाँ :** ( झटकन पुढे होत ) कुछ खाते नहीं—खाओगे नही–सुबेदार और शायर ! ( कुत्सितपणे ) ठीक है. रोजा करो ! हमने शबे बारात मना ली है. तुम रमझान मना लो. रमझान मना लो. ( मान डोलवत ) तक्ताकुलाहात जकडबंद आहेत तर कैसी ऐट ?

**संभाजी राजे :** हॅं.

**कवी कुलेश :** ( ताठपणे ) आम्ही रोजे करतो—उपवास करतो ते भाविकतेनं. खिल्लतीत जखडबंद असलेल्या खाना, नीट समजून घे—आम्ही तुझे थाळे ठोकरलेत, रोझे नाही केलेले.

**रूहुल्ला खॉं :** ( इखलासला ) ये साला 'शायर' है, ये – यूँही बकेगा ! ( संभाजीला )—" **सुबेदार** " तुम सियाने हो जरा सोच के जवाब दो—

**संभाजी राजे :** खाऽमोऽश ! पालतू प्राण्या, 'सुभेदार' कुणाला म्हणतोस ? 'राजे' म्हण ! तुझ्यासारख्या कैक फकिरांना खैराती वाटून रीतसर अभिषेक

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा, ठाणे
क्र. २०२४३ नों. दि ८१.३१.६४...

घेतला आहे रायगडावर आम्ही. आमच्या रयतेसमोर—होय, होय तुझ्या काफरां समोर. ‘ राजेच ’ म्हण तू आम्हास. ‘ सुभेदार ’ एवढ्या लांबलचक पल्ल्याचं नाही झेपायचं तुझ्या लाचार, लंगड्या जबानीला ! !

**इखलाब खाँ :**
**मुकर्रब खाँ :** } ( उसळून ) बत्तमीज ! कैदी हो तुम, दस्त हो — होश रखो.

**रूहुल्ला खाँ :** ( दोघांना रोखत गोंधळून ) क्या बोला वो ? काय म्हणाला ? ओहो पाच दिन का रोझा तोभी ये जोश ?

**कवी कुलेश :** “ राजे ” आणि “ सुभेदार ” या दोन्हीतला राजे हा शब्द म्हणायला छोटा आहे, सोपा आहे—तोच तू वापर असे म्हणतात आमचे राजे. तकलीफ नको तुझ्या लाचार जिभेला तेवढीसुद्धा. आम्ही त्यापुढे जाऊन म्हणतो, ‘ राजे ’ हा शब्द बोलायला छोटा आहे, सोपा आहे. मात्र कळायला व पचवायला फार अवघड आहे तो—बघ झेपतंय का ते तुला ?

( रूहुल्ला, इखलास, मुकर्रब गोंधळून एकदम एकमेकांकडे बघतात. त्याच गोंधळलेल्या स्थितीत )

**रूहुल्ला खाँ :** ठीक है–ठीक है ‘ राऽजे ’ ! आखरी मौका म्हणून आम्ही एकच सवाल पूछतो आहोत—‘ सुबेदाऽर ’ !

**कवी कुलेश :** ( जरब देत ) राजे बोलो !

**रूहुल्ला खाँ :** ठीक है ‘ राजे ’, सोच समझके जबाब देना. अभी आका अली खुद हजरत पधारेंगे इधर. हमें बता दो, कौन कौन थे हमारे फौजी फरेबी कुत्ते तुम्हें फितुर ? बता दो नाम सब जहन्नमींके.

**संभाजी राजे :** ( खोचकपणे ) काय अक्कल आहे तुझी खान ? तसे कुणी असतेच फितुर तर या लाकडी तख्ताकुलाहात आमच्याऐवजी तूच नसतास का दिसलास आत्ता ?

**इखलास खाँ :**
**मुकर्रब खाँ :** } ( उसळून ) जबान पाबंद रखो काफर.

**रूहुल्ला खाँ :** ( दोघांना थोपवित ) बेलगाम बोलता है–मगर सचही तो बोलता है सुबेदार–अं—

**कवी कुलेश :** ( जरब देत )—‘ राजे बोलो ! ( रूहुल्ला खां अनावर संतापतो. झटकन पुढे होत कवी कुलेशच्या कानशिलात देतो )

**रूहुल्ला खाँ :** तू बिल्कुल चूप बे शायर! दोजखी, लईम, बकवासी.

**कवी कुलेश :** ( त्याच्यावर एकटक डोळे रोखत ) हमें कुछ भी करो–कुछ भी कहो, लेकिन इन्हे 'राजे' कहो!! ( रूहुल्ला चडफडतो. संभाजीकडे जातो. )

**रूहुल्ला खाँ :** 'राऽजे' बता दो तुम्हारे सल्तनतका सब खजाना कौन कौनसे किलोंपर है? कुठं आहे तुझा खजिना?

**संभाजी राजे :** काय अंधा आहेस का काय तू खान? अरे आमचा खजाना बागलाणपासून शिवोली पावेतो भिडलेल्या आमच्या दौलतीच्या चाळीस गड-कोटावर आजही मौजूद आहे!

**रूहुल्ला खाँ :** मतलब?

**संभाजीराजे :** अरे जंजिऱ्यात कामी आलेला आमचा कोंडाजी फर्जंद, फिरंगाणात कुर्बान झालेला कृष्णाजी कंक हे लाख मोलाचे खजिनेच होते आमचे त्यांचा वसा सांगत आजही मौजूद आहेत आमचे खंडोजी बल्लाळ, संताजी घोरपडे आणि धनाजी जाधवांसारखे कैक गडागडांवर. खजानेच मानलेत रे खाना, आमच्या आबासाहेबांनी नि आम्ही या साऱ्यांना. नशीब असलच तुझ तर दिसतील तुला ते फक्त "रणमैदानावर"!

**रूहुल्ला खाँ :** ( लालचेने) ऐसे आदमियोंका खजाना ढेर पडा है हमारे फौजमें. हम पुछते हैं पैसोंका, रूपीयोंका, दमडीयोंका खजाना–किधर हैं वो?

**संभाजीराजे :** आम्ही ऐकून आहोत खान तुझ्या पातशहा सलामतला तर दमडीचीही लालच नाही म्हणून! टोप्या शिवून त्या विकून त्यांची खैरात करतो म्हणे तो फकिरांना आणि तू तर खजाना विचारतोस. मग सच्चा कोण? तुझा अल्ला हजरत की तू?

**रूहुल्ला खाँ :** ( गोंधळत ) ये भी सच है, पर सुबेदार—राजे आम्हाला सवाल नको–पाहिजे जबाब. बोलो कौन थे फितुर हमारे फरेबी कुत्ते?

**इखलास खाँ :** कहाँ है तुम्हारा सब खजाना?

**संभाजीराजे :** खान लोग तुमच्या कुठल्याच सवालाचा आम्ही जबाब नाही दिला तर? आम्हास सवाल करून जबाब घेण्याची आदत आहे, देण्याची नाही. जाणतोस हे तू?

**कवी कुलेश :** अरे आत्तापर्यंत बोलले राजे तुमच्याशी हीच झाली मोठी मेहेर

तुमच्यावर. बगावतखोर शाहजादा अकबराला विचारा गरज असेल तर—राजे प्रत्यक्ष बोलण्यासाठी किती तिष्ठावं लागतंय एकेकाला ते ?

**रूहुल्ला खाँ :** ( जरब देत )—चूप रहो तुम—बीचमें बकबक मत करो. बोलो कौन थे हमारे नमक हराम तुम्हें फितुर ?

**संभाजीराजे :** ( तिरस्काराने )–हूँ.

**इखलास खाँ :** बोलो कहा है तुम्हारा खजाना ?

**संभाजीराजे :** ( अधिक तिरस्काराने ) हूँ.

**मुकर्रब खाँ :** ( कुलेशला ) बोलो कहाँ है खजाना ? कौन थे फितुर ?

**रूहुल्ला खाँ :** अय अफसोस ! कैसी परेशानी है ये ? अब खुद आला हजरत पधारनेवाले हैं—इन दो अजब जानवरोंको देखने ( राजे व कुलेश यांना ) अरे बोलो भी तो कुछ—मुहमें तोबरा है क्या तुम्हारे ? बोलो.

**संभाजीराजे :**
**कवी कुलेश :** } हूँऽसाफ नाही ! यासाठी करा हवी तर रमझान, मुहर्रम आणि शबे बारात एकदमच साजरी.

( कवी कुलेश संभाजी राजांकडे फक्त अर्थपूर्ण नजरेने बघतो. विंगेत औरंगझेबाच्या आगमनाची शाही शाजने वाजू लागतात. पाठोपाठ पल्लेदार अशा अलकाबाच्या आरोळ्या ऐकू येऊ लागतात "बा आदबऽबा मुलाहिजाऽ तहे दिल होशियाँऽऽअबुल मुज्जफ्फर मुइउद्दिन मुहंम्मद, औरंगजेब, बहादूर, आलमगीर, आलमगीर, बादशहा गाजी, मालीके तक्ते ताऊसऽऽ, शहेनशहा ए–हिंदुस्थाँऽऽ तश्शरीफ ला रहे हैंऽऽ तहे दिल होशियाँऽऽ !" ( तीन वेळा राजदंडाचे दणदणीत ठोके पडतात ) तिघा खानांची व हशमांची तारांबळ उडते )

**रूहुल्ला खाँ :** इन्शाल्ला ! मरहब्बा ! खुद आला हजरत पधार रहे हैं—क्या होगा ? ( कळवळून असहाय्यतेने ) खैर—खैर हो कयामत की !

**मुकर्रब खाँ :** ( गडबडून ) तौबा तौबा पातशाहा सलामत खुद ?—माशाल्ला खैर हो कयामत की. पहले दफा हो रहा है की शहेनशहा कैदियोंको देखने पधार रहे हैं.

**इखलास खाँ :** खुद आका अली ? खैर कयामत की !

**रूहुल्ला खाँ :** ( एकदम दोघांवर खेकसत ) कमीनों—दख्खनी–डर क्यों गये

इतने ? अरे हबेलंडी का उडाली एवढी तुमची हजरतांचे नुसते नाव ऐकताच ! बघताय काय असे-जल्दी करा—या दोन्ही दोजखच्या कुत्त्यांना जखडून टाका पाहिले जंजिऱ्यात जाम नही तो—नही तो ये बेमुर्वत सीधे छलाग मारेंगे बादशहा सलामतपर ! जल्दी करो ! जखड डालो दोनोंको जंजिरोंमे. निकाल दो तक्ताकुलाह.

**मुकर्रबखाँ** : } ( एकदम कुर्निसात करतात ) जी हुजूर अभी जखडते हैं.
**इखलासखाँ** : } ( त्याच आज्ञा करीम रसूलला देतात. )

**मुकर्रबखाँ** : } निकाल दो तक्ताकुलाह !
**इखलासखाँ** : } जखड दो दोनोंको जंजिरोंमें ! जाम—कसके !

**रूहुल्ला खाँ** : ( दोघांवर उसळून धावत जात ) अरे, तुम क्या चने चबाने आये हो इधर ? खुद करो, तुम करो ( दोघांना पुढे ढकलत ) जाओ. ( मुकर्रब, इखलास, करीम व रसूल चौघेही अधूनमधून अर्थपूर्ण असे रूहुल्ला कडे बघत संभाजीराजे व कुलेश यांना चौथऱ्यावर ढकलत चढवतात. प्रथम चौथऱ्यावरच्या साखळदंडांनी जाम जखडून टाकतात. मग दोघांचेही ' तक्ताकुलाह ' उतरतात. हे सर्व झालेले पाहून मोठे काम केले अशा अर्थाने रूहुल्ला प्रथम हात झटकतो. )

**रूहुल्ला खाँ** : अब आने दो आला हजरतको—अब नही खतरा कुछ भी !

औरंगजेब बुढ्या मौलवी फक्रुद्दीनसह प्रवेशतो. हातात तसहीबची माळ. उतार वय. तरीही हालचाल व बोलणे तडफदार. तो प्रवेशताच सर्व आदबीनं कुर्निसात करतात, तिकडे दुर्लक्ष करीत एकटक फक्त संभाजीराजांकडे बघू लागतो. **पहिल्या अंकातील समाधी दुभंगताना होतो तोच विजेचा कडकडाट पुन्हा होतो.** दोघांवर भगवा—हिरवा असा आलटून पालटून प्रकाशझोत पडतो. खेचल्यासारखा औरंगजेब प्रथम चौथऱ्याकडे जातो. दोन्ही कैद्यांकडे बघत चौथऱ्याभोवती फेर घालतो. आत्यंतिक आनंदाने थरकाप उडविणारं प्रथम हसतो. आपण '**शहेनशहा**' आहोत याचं भान होताच तोंडावर हात ठेवून हास्य दाबतो. अतिशय आनंद झालाय पण तो प्रकट करता येत नाही असे हाव भाव करतो. भोवतीचे सारे त्याच्या हालचाली बघून गोंधळतात. औरंगझेब स्वतःच पुढे होतो. रूहुल्लाखानच्या खिल्लतीची गळ्याजवळची गाठ खेचून खिल्लत हातात घेतो. झटकतो. अंथरतो. त्यावर गुडघे टेकून नमाज पढण्याचा

पवित्रा घेतो. बाकीचे सारे केवळ आश्चर्यात पडले आहेत, पुतळ्यासारखे उभे आहेत. अत्यंत तिरस्काराने औरंगझेब गुस्ताखीचा कटाक्ष त्यांच्याकडे टाकतो. तसे तेही झटपट नमाजी पवित्रा घेतात. सारे मिळून 'सामूहिक' नमाज पढू लागतात—"ला इलाह इल्लीलाह..."

**कवी कुलेश :** ( राजांना ) महाराजांची स्वारी गप्प का? कसल्या विचारात?

**संभाजीराजे :** ( गुडघे टेकलेल्या औरंगझेबाकडेच बघत) विचारात? होय कविराज विचारातच आहोत आम्ही. तुमच्या सोबतीत 'बुधभूषणम्'चा काव्यग्रंथ बांधला आम्ही कैक शेर ऐकलेत तुम्हा तोंडून, कविराज–छंदोगामात्य कराल आत्ताच्या या गुडघे टेकलेल्या औरंगझेबावर एखादा देखणा, बेमिसाल शेर?

**कवी कुलेश :** ( चमकून ) आत्ता? या क्षणी? ( संभाजीराजे कवी कुलेशकडे चमकून बघतात )

**संभाजीराजे :** होय आत्ता! या क्षणी! दस्त असताना! हात, पाय, शरीर जखडबंद असले, कविराज तरी जबान तर नाही? मन–आत्मा तर नाही?

**कुलेश :** ( मुजरा केल्यासारखी मान लववून ) जी आज्ञा स्वामी. कुणी केले नसेल–करणार नाही असे या औरंगझेबाचे वर्णन करू या क्षणीसुद्धा आम्ही. राजीखुषीनं ऐकावं स्वामींनी ते ( खाकरतो ) ऐकावं—

"राजन हो तुम साँचे—
राजन हो तुम साँचे—
बहोत लढे तुम जंग!
तुव तप तेज निहारके
तुव तप तेज निहारके
तखत्–त्यजत औरंग!!"

"राजा, तू खरा राजा आहेस खूप खूप शर्थीची लढाई लढलास तू आणि तेच तुझ्या तलवारीचे तेज सहन न होऊन हा औरंग बघ–तख्त त्यागून भुईवर गुडघे टेकून बसलाय!!"

**संभाजी राजे :** व्वा! कविराज! बहोत खूब! सुरेख! ज्या तख्ताच्या प्राप्तीसाठी यानं आपली लहानथोर सगळी नाती ठोकरली, त्यागली, तेच तख्त क्षणासाठी का होईना आम्हासाठी त्यागलं यानं. सुरेख! सुंदर! मोकळे असतो, मुक्त असतो तर आम्ही एवढ्यासाठीही केला असता या 'हिंदोस्ताँ'च्या बाद-

शहाला एखादा कंठा बहाल! ( औरंगझेब आपल्या खिल्लतीवरून उठतो. इतरही तसेच उठतात. औरंग रूहुल्लाला त्याची खिल्लत उचलायचा इशारा करतो. रूहुल्ला त्याप्रमाणे उचलून ती झटकतो. स्वतःच ती खांद्यावर घेऊ लागतो. तोच औरंगझेब पुढे होऊन त्याला नजरेनेच रोखतो. त्याच्या हातची खिल्लत खेचून आपल्या हाती घेतो. स्वतःच ती झटकून रूहुल्लाच्या खांद्यावर पांघरतो. खिल्लतीची गाठ आवळता आवळताच कसला तरी विचार करतो. गाठ करकचून आवळतो. गरकन् वळतो. बाण आल्यासारखा राजावर धावून येतो.—)

**औरंगझेब :** नही बताओगे कौन थे-फितुर ? कहाँ छिपाया है तुम्हारा खजाना ? ठीक है ( अत्यंत थंड्या आवाजात पण कुतुहलानं ) एक बात बताओ. बोलो संबा, हमें देखकर—देखकर 'कौनसा' खयाल आया तुम्हारे मनमें सबसे पहले ?

( संभाजी राजे झटकन मान वळवतात. )

**संभाजी राजे :** सबसे पहले? आलमगीर तुला बघून आमच्या मनात सगळ्यांत पहिलाच खयाल उठला तो तुझा नव्हे—तर तुझ्या बापजाद्याचा !!

**औरंगझेब :** ( चक्रावून ) मतलब ? ( चिडून ) हमारे बापजादे ?

**रूहुल्ला खाँ :** ( उसळून ) हजरत के बापजाजे ?
**मुकर्रब खाँ :** शहेनशहा के बापजादे ?
**इखलास खाँ :** कैसी बेमुर्वती ?

( औरंगझेब तिघांना नजरेनेच रोखतो. )

**औरंगझेब :** ( राजांना ) कैसा खयाल ? बोलो. हम सुनना चाहते हैं.

**संभाजी राजे :** 'गाझी' म्हणवून घेणाऱ्या 'आलमगिरा', तुझ्या अब्याजाननं —त्या शहाजहाननं जगातल्या एका सुंदर इमारतीला जन्म दिला आहे.

**औरंगझेब :** कौनसे इमारतको ?

**संभाजी :** ताजमहालला. ताजमेहलको.

**कवी कुलेश :** एका सुंदर बेजोड 'कबरीला' !

**औरंगझेब :** ( वैतागून ) हम पुछते हैं 'हमें' देखकर कौनसा खयाल आया तुम्हारे मनमें ? 'ताज' को देखकर नाही ! सिधा जवाब दो.

**संभाजी :** अरे होय. तेच सांगतो आहोत. तुला बघताच आमच्या मनी खयाल

आला तो हाच की—तुझ्या अब्बाजाननं त्या खुबसुरत' इमारतीएवढ्याच एका 'बदसूरत' बच्च्यालाही जन्म दिला आहे !!

**औरंगझेब :** ( न समजून ) बदसूरत बच्चे को ? किसको ? सही बोलो.

**कवी कुलेश :** शहेनशहा म्हणवणाऱ्या नवरंगजेबा तुला ! ! ( रूहुल्ला चिडून कवी कुलेशला कानफडात देण्यासाठी 'खामोश बकवासी' म्हणून पुढे धावतो. )

**संभाजी राजे :** ( त्याला रोखत ) खामोश खान ! ( शांतपणे ) जो करना है, हमे करो, हमे बोलो. खान, कान उघडे ठेवून ऐक. 'खुबसुरत' ताजमहाल-एवढ्याच 'बदसूरत' बच्चाला जन्म दिलाय शहाजहान बादशहानं, या तुझ्या आलमगिराला, तुझ्या या औरंगझेबाला ! ! ( औरंगझेब तसबीहची माळ अनावर संतापाने ओढतो अस्वस्थतेने फेऱ्या घालू लागतो. रूहुल्ला, मुकर्रब, इखलास तिघेही संभाजी महाराजांवर धावतात. औरंगझेब त्यांना हातानेच थोपवितो. )

**औरंगझेब :** रूहुल्ला, दःखनी चूप रहो. बोलने दो उसे. गफलत झाली आमचीच एक एक—याच्या बापजाद्याला आणि याला आगऱ्याहून सलामत सुटून जाण्याचा मौका देण्याची ! बोल संबा—काय केलं असतंस आम्हीच आलो असतो तुझ्यासमोवर असे 'कैदी' म्हणून या आमच्या मौलवी फक्रुद्दीनसह तर ? काढली असतीस आमची धिंड ? दिलं असतंस हत्तीच्या पायी ? बोल काय केलं असतंस ? क्या करता तू ?

**संभाजीराजे :** तो तुझा वसा ! त्या निमित्तानंसुद्धा तोंडही बघितलं नसतं तुझं आम्ही औरंगजेब. आग्र्याच्या लाल किल्ल्यात—आपल्या कैद, बुढ्या बापाला—एका खांबात छोटेखानी आरसा बसवून 'प्रतिबिंबरूपानं' ताजचं आखरीचं दर्शन घडवलंस तू त्याला. आम्ही त्याच ताजमहालात तुला कायमचं बदिस्त ठेवून लाल किल्ल्याचं दर्शन घडवलं असतं रोज ! त्या निमित्तानं तरी तुला 'बाप' म्हणजे काय हे कळलं असतं ! आता—आता आम्हीच तुला करतो आहोत एक सवाल ! कैदी असून.

**कवी कुलेश :** ( राजांना अचूक जोड देत ) शक्य असेल तर अक्कलहुशारीनं जवाब दे त्याचा ! कुठला आला पहिलाच खयाल आमच्या राजांना बघताना तुझ्या मनात औरंगझेब ? (राजे अत्यंत समाधानानं कुलेशकडे बघताच रूहुल्ला,

मुकर्रब, इखलास असह्य कोंडीनं औरंगझेबाकडे बघतात. औरंगझेब हातची माळ सरासर ओढतो. तशी कुलेशच त्याचा आपणहून जबाब देतात.)

आम्ही सांगतो "हे ढेर पैदा झाले शाहाजादे आमच्या कैक बेगमांच्या कुशीत पर गफलतसे एक भी ऐसा कैसे नाही पैदा हुआ!" हा-हाच खयाल सर्वांत प्रथम मनात आला आहे औरंगझेब तुझ्या! (औरंगझेबच अनावर संतापानं कुलेशच्या रोखानं जाऊ लागतो. तसं 'रूहुल्ला' फक्त 'खाकरतो' निरूपायानं औरंगझेब स्वतःवर चरफडत मागे हटतो. पण तेवढ्याच शांतपणे कुलेशसमोर जातो. त्याला नीट निरखतो आणि स्वतःशीच बोलल्यासारखा मुकर्रब, इखलासला हुक्म फर्मावतो.)

**औरंगझेब :** (थंडपणे) दःखनी, जो भी सजा हम इस सुबेदार संभा को फर्माएंगे उसका पहला 'अंमल' इस शायरपर करो. बहोत होशियार है ये—इमान दो होशियारीका—इसे.

**इखलास खाँ :**
**मुकर्रब खाँ :** } (कमरेत लवून) जो हुकुम मेरे आका आली.

**कवी कुलेश :** खुशाल! आलमगीर आम्हा कदिम चाकरांची जोखीमच आहे ती. (राजांना) महाराज आपण नेहमी बोलत आलात—

"आम्ही म्हणजे मंदिरातील दगडी कासवासारखे तर आमचे आबासाहेब म्हणजे गाभाऱ्यातील मूर्तीसारखे. दर्शनभक्तांचा पाय कळत-नकळत पडतात ते या दगडी कासवाच्या पाठीवर, नमस्कार रुजू होतात ते गाभाऱ्यातील मूर्तींच्या चरणाठायी."

महाराज मग या क्षणी सांगावं आम्हासारखे चाकर म्हणजे नेमके कोण ते?

**संभाजीराजे :** कविराज, या क्षणी वाटतं—तुम्हासारखे चाकर म्हणजे—म्हणजे त्या मंदिराच्या प्रवेशद्वाराच्या पहिल्या पायरीसारखे! त्यांच्या तर पाठीवर पडतात त्या दर्शनभक्तांच्या पायीच्या धूळभरल्या फक्त वहाणा!

**कवी कुलेश :** बस्स! हे स्वामींच्या तोंडून ऐकलं—भरून पावलो आम्ही आज!

**औरंगझेब :** काफर संबा आमच्या बगावतखोर बेट्याला, त्या दोजखी अकबराला आसरा दिलास तू! आमच्या शेपटीवर पैर दिलास तू, खैर—एक बता काय काय केली त्यानं शिकायत तुझ्याकडे आमच्या खिलाफ?

**संभाजीराजे :** औरंगजेब, तू काय खबर खलिता पोहोचवणारा 'हारकारा' समजतोस आम्हास ? येता आमच्या आसऱ्यास तुझा बापजादा शहाजहान तर त्यासही दिला असता आम्ही आसरा. 'शहेनशहा' म्हणून नव्हे 'शरण' म्हणून !

**औरंगझेब :** ( तिरकसपणे ) बुतपरस्त संबा, तुला 'जीवानिशी' सोडण्यासाठी काय काय अटी घालू आम्ही तुला काही अंदाज ? कुछ अंदाजा ?

**संभाजीराजे :** औरंग, तू काय 'बेवकूफ' समजतोस आम्हास ? आमचा 'खजिना' विचारलास तू—तुझा दिल्लीचा खजिना आमच्या पायावर घालून—खुद्द आपली बेटी देऊन पुरी दःख्खन पायावर ओतलीस आणि—आणि जे घडणार नाही ते घडून एखाद्या गफलतीच्या क्षणी—आम्ही तुझा नापाक इस्लाम स्वीकारायला तयार झालो तरीही ('तरीही' हा प्रचंड जोर देऊन म्हणण्याचा शब्द आहे.) 'आम्हास ?' आणि तू' ? तेही 'जीवे' सोडणे ? शक्य नाही. होणे नाही, होणार नाही. कारण—कारण तू पक्का जाणतोस औरंगजेब—गाझी ! "संबा" या नावाचं 'मरण' घोड्यावर मांड ठोकून गेली नऊ वर्षं कसं हात धुऊन तुझ्या पाठीशी दौडलंय ते ! पुरी नऊ सालं झोप उडविलीय रे आलमगीरा तुझी आम्ही ! आता वखत जाया न करता विचार तुझ्या या तू नेहमी ढालीसारख्या वापरलेल्या मौलवीला—'कुराणे-शरीफ' बरहुकूम आमची सजा काय ती ! विचार सजा.

**कवी कुलेश :** तो दहावेळा कंबरेत लवून सांगेलच "सजा ए मौत !"

**फक्रुद्दीन :** ( एकदम पुढे होत ) ही मगरूरी ! ही बत्तमीजी-बे-शायर, सजा ए 'सीर्फ मौत' नही होगी. कुत्ते—'तिलमिलाहटकी मौत !' हाल हाल करणारी मौत.

**औरंगझेब :** ( मौलवीचा जामा धरून मागे खेचत अत्यंत कोरड्या थंडपणे ) संबा तुझ्या अब्बाजाननं—त्या काफर सेवानं एकट्यानंच पारखलं होतं अचूक आम्हास—आग्र्यात ! मान लिया तू त्याचा सच्चा बच्चा आहेस—आज तूही पेहचानलंस अचूक आम्हास. खयाल एकही रहा—कुठलीही लालूच दाखवून नाही, लालच दिखाकर नही तो—'जबरदस्तीनं' केलं आम्ही तुला 'इस्लाम' तर—तर बोलो क्या करोगे जबाब दो—क्या करोगे ?—बोलो ?

**संभाजी राजे :** ( त्याला जाणवेल अशा अत्यंत तिरस्काराच्या नजरेने त्याच्या

कडे फक्त बघत राहतात—ती ' नजर ' असह्य होऊन औरंगझेब एक एक पाऊल मागे टाकतो आहे. त्याचं अनुकरण मौलवीसह सारे त्याचे हस्तक नकळत करताहेत ) तर–तर हिंदूंची बेरहम कत्तल करणाऱ्या, त्यांच्यावर जुलमी जिझिया लादणाऱ्या, कुराणाला काळिमा फासणाऱ्या औरंगझेब—आलमगीरा–तर ' श्वास ' फेकल्यासारखा आम्ही ' संबा ' या नावाचा आमचा जीवच शिवाच्या पिंडीवर अर्पून टाकू ! ! हात, पाय, देह नसला तरी याक्षणी औरंग, ज्याला हिंदू लोक ' प्राण ' म्हणतात तो ' श्वास ' आमचा आहे—फक्त आमचा—आमच्याच कबजात असलेला––कुठल्याही क्षणी तेवढ्याच जरबेनं आम्ही त्यास ' थांबवू ' शकतो. नाही शिरायचं हे केव्हाच तुझ्या खोपडीत ! ' जबानीनं ' नव्हे ' नजरेनं ' सांगतो आहोत आम्ही. नीट डोळे उघडे ठेवून वाच–पढ लो–गौरसे पढ लो–औरंग–या ' जीवाचं ' नाव ' जगदंबा ' आहे !!!

**औरंगझेब** : ( ती नजर असह्य होऊन आपली स्वतःची नजर कुठेतरीच अवकाशात लावतो, स्वतःशीच बोलल्यासारखा— ) तौबा, तौबा अपने बाप के साथ दरबार पेश आया था आग्रामें तब कितनी ' मासूम ' थी ये नजर—अब देखो कैसे ' घूरके ' देखता है—कितनी ' नफरतसे ' ( एकदम किंचाळत) रूहुल्ला, इखलास, मुकर्रब सबसे पहले ' निकाल दो ' ये ' नाचीज आँखें ' !!! जळजळीत तापलेल्या ' सांडशीनं ' याचे डोळे ' जाळून टाका ' पहले. (जाण्यासाठी गर्रकन वळतो. )

**संभाजी राजे** : ( खदखदून हसत ) आलमगीर आग्र्यात नाही पण आज पारखलास तू—आमच्या डोळ्यापाठीमागे उभ्या असलेल्या देहाचा अचूक मतलब ! खुशाल जाळून टाक आमचे डोळे–कुराणाची ढाल समोर धरून आपली राजहवस पुरी करणाऱ्या, हिंदुस्थानभर मनमाना हैदोस घालणाऱ्या तुलाही–आम्ही दिलंय एक नाव ! ते मात्र ऐकूनच जा याक्षणी–( जाणारा औरंग पाठमोराच थांबतो. त्याच्या पाठीवर राजांचे शब्द पडतात ) आमच्या कोशात तुला एकच नाव आहे. फक्त एकच ( थांबून ) " सुऽव्वऽरऽ का ऽऽ बच्चा ऽऽ सुऽव्वऽर ! "

**औरंगझेब** : ( असह्य तडफडाट होऊन ) रूहुल्ला, इखलास, मुकर्रब आँखें जलानेसे पहले ये बेगुमान, बेमुर्वत " जुबाँ " जडसे कटवा दो. डोळे जाळण्या-

पूर्वी याची बेगुमान, बेमुर्वत जबान छाटून टाका मुळासकट !!

**रूहुल्ला खाँ :**
**इखलास खाँ :** जो हुक्म मेरे आका.
**मुकर्रब खाँ :**

**औरंगझेब :** ( एक पाऊल पुढे टाकत बेभानपणे ) पुरे बदन की 'खाल' निकाल दो इसकी 'साल' काढा याच्या अंगाची, सोलवटून तेगीच्या पात्यानं.

**कवी कुलेश :** ( प्रचंड आत्मनिर्भयपणे हसत ) चंदनाच्या खोडाची साल काढली तरी त्याचा अंगभूत सुगंध नाही कमी होत औरंगजेब ! उलट तो वाढतो–चौमुलुख–पसरूनही अंगुळभर मागे उरतोच उरतो !

**रूहुल्ला खाँ**
**इखलास खाँ** क्या क्या बकते हो बे शायर ?

**कवी कुलेश :** ( राजकवीच्या 'अशरण' भावात )

" गंध लाता है चंदन—
छिल जानेके बाद !
महक उठता है सुरमा
लडते-लडते मरने के बाद !! "

**संभाजी :** ( अभिमानानं भरून येत ) व्वा ! बेमिसाल कवीराज ! बहोत खूब छंदोगामात्य–असतेच मोकळे आमचे हात याक्षणी-तर तर या औरंगजेबाच्या अंगावरचा कंठा खेचून बक्षच केला असता आम्ही–तुम्हास या क्षणी–नाहीतर हिंदोस्ताँच्या गरीब रयतेवर जुलमी जिजिया लादूनच चढवलीय त्यानं तो कंठी ?

**रुहुल्ला खाँ :**
**इखलास खाँ :** क्या बेजबान बक रहे हो दोनों भी ?

**संभाजी :** ( अतिव तिरस्कारानं ) जुम्मे के जुम्मे आंघोळ करणाऱ्यांना नाही समजायचं कधीच–'चंदन' म्हणजे काय–आणि त्याचा 'गुण' काय असतो ते खान !

**औरंगझेब :** ( चिडून ) हम न्हाते नही क्या ? नमकीन पाणी छिडका दो इख्लास इसके छिले बदनपर ! मीठाचे पाणी शिपकवा याच्या सोलवटलेल्या नापाक अंगावर ?

( संभाजी–कुलेश औरंगजेबाकडे पाहून कमालीच्या एकमेळान हसतात )

**औरंगझेब :** ( संतापाने–थरथरत ) खाऽमोष–काफर–नाचिज कैदी शख्स. हँस क्यों रहे हो ?

**संभाजी :** ( तत्परतेनं फेकून देत ) औरंगजेब–आम्ही तुला हरवणार–शिकस्त देणार ! तशी पैजच बोललोय या आमच्या शायरांना–आमची धींड तू काढलीस तेव्हाच !

**औरंगझेब :** ( चरफडत ) मतलब ? हमारी शिकस्त ?

**संभाजी :** होय शिकस्त–तुझी–हिंदोस्ताँच्या बादशहाची ! अरे, आम्ही आमच्या या शायरांना केव्हाच बोलून बसलोत की–" आम्हाला–आम्हाला कडव्यात कडवी सजा फर्मावण्याखेरीज रास्ताच नाही तुला ! "

**औरंगझेब :** ( तिरस्कारानं ) तो भी हँसतो हो ! बेवकूफ !

**संभाजी :** होय ? हे हसणं कधीच नाही शिरायचं तुझ्या मुगलाई भेज्यात औरंगजेब ! हे हारजितीचं हसणं आहे. तू देशील ती सजा आम्ही हसतच पेलणार–त्यानं तुला कळून येईल की एक मानी मनाचा राजा प्रत्यक्ष मरणाला कसा सामोरा जातो ते ! याक्षणी आम्ही मरणाला हरविणं यासारखी आमची जीत नाही–आणि तुझी–हार–शिकस्त नाही दुसरी !!

**कवी कुलेश :** आमच्या लाखांच्या पोशिंद्या राजांचं हे रूप बघताना–तुझ्या जानवरी मगजात एकच एक खयाल–हयातभर सतत उठत राहील—अलमगीर—

" मैने ढेर शहजादे पैदा किये–सब के सब मक्कार–नाबकार निकले–एक भी नही निकला ' संऽबा ' जैसा !!

**औरंगझेब :** ( अनावर तीव्र संतापानं ) खाऽमोऽष ! रूहुल्ला–इखलास ले जाव दोनों–बेमुर्वत जहन्नमींको सामनेसे—( त्याच बेभानपणे ) मर जाएगे दोनों लईम, काफर कुत्ते तिलमिलाहटसे !! मरून जातील हे दोघे तडफडून—तळमळून–बादमे इनके सर कटवा दो बदनसे. भाले की नोंकपर उनकी भी ढिंड निकालो और फेक दो इन कुत्तोंके सर शाही कुत्तोंके सामने–फौजी मुक्काम के बाहर–जाओ ! निकलो ! ( अतीव संतापाने तिघाही खानांच्या खांद्या वरच्या खिल्लती काढून जमिनीवर आपटून वादळानं काठी थरथरावी तसा संतापाने थरथरत क्षणैक उभा राहातो. )

**संभाजी राजे :** ऐकलीत छंदोगामात्य—कवीराज—कुलेश, आपली सजा ऐकलीत ? डरलात ? कचरलात ?

**कवी कुलेश :** ( लवून ) मुळीच नाही स्वामी. सजेचा पहिला ' अंमल ' आम्हावर होणार हे जाणूनसुद्धा नाही. याक्षणी खंत मात्र एकाच सामोऱ्या येणाऱ्या सत्याची वाटते आहे सजेचा अंमल ' पहिल्यानं ' आम्हावर—जाणार ' पहिले' आम्ही–महाराज–स्वामी आपण जोडी साथीनं ' बुधभूषणमूचा ' काव्यग्रंथ पुरा केला पण हयातीचा हा " जीवनभूषणम् " ग्रंथ मात्र आखरी श्वासापावेतो नाही पुरा करू शकणार–जोडीसाथीनं. का ? तर–तर–नेहमीसारखं 'कवीराज' म्हणून आपण याद फर्मावताच ' जी ' म्हणून नाही होऊ शकणार हजर सेवेस तत्परतेने आम्ही–आखरीपावेतो–आता ! त्यासाठी–त्यासाठी या कदिम चाकरास आत्ताच क्षमा असावी–क्षमा असावी स्वामी !! मुजरा.

**संभाजी राजे :** ( अतीव भारावलेल्या बोलात ) कवीऽराज ! शायर हो तुम सांचे–शायर हो–छंदोगामात्य–साँचे. ( कवी कुलेशवरचाही दिवा जातो. आता फक्त संभाजीराजे, साखळदंड, त्याच्या खालचा चौथरा एवढ्यावरच प्रकाश आहे. पार्श्वभूमीला चार—पाच निवडक पात्रांची निवडक वाक्ये—टेपवर वाजून जातात—ती अशी—

**शिवाजी राजे :** शंभूराजे—भुलू नका कधीच की अगोदर मरतात ती मनं— आणि मग मरतात ती माणसं !

**जिजाऊ :** बाळ शंभू—तुम्हास बघितलं की वाटतं—' पुत्रमुखदर्शनानं आई धन्य होत असेल पण नातवाच्या मुखदर्शनानं अवघं ' स्त्रीपण ' धन्य होतं !

**समर्थ :** याहून विशेष ते करावे—

जिवित तृणवत मानावे !

जय जय रघुवीर समर्थ ऽऽ !

**हंबीरराव :** धाकलं,—मान्सं काय पावसाळी आळंब्यागत उपाजत्यात आन जिरत्यात–पर थोरलं धनी त्ये धनीच—शिवाचं अवतार !

**धाराऊ :** ल्येकरा–सारथिक झालं रं माजं तुला दूद पाजल्याचं !

**संभाजी राजे :** ( संपूर्ण नाटकात वापरली नाही अशा आवाजाच्या लयीत व वाक्यांच्या फेकीत )

जाणते म्हणतात, अशा क्षणी माणसाला त्याच्या हयातीचा पट आणि

भोवताल सामोरा येतो. होय. आम्हासही दिसतो आहे हयातभर घोड्याच्या टापांखाली आम्ही तिन्ही हंगामात तुडविलेला आमचा मावळ–मुलुख— दिसताहेत पावसाळ्याच्या हंगामात रायगडाचा घेर धरून उतरणाऱ्या पावसाळी तिन्हीसांजा ! तास फोडून उतू जाणारे कुशावर्ताचे आणि गंगावर्ताचे तलाव ! गडउतरंडीवर करवंदीच्या आणि रामेटाच्या झुडुपात रेकणाऱ्या रातकिड्यांच्या जमेती ! हिवाळ्याच्या हंगामात आमच्या चाळीसांवर गडकोटांना बिलगून बसलेले दहिदाट धुके ! त्याच धुक्याचे चढत्या दिवसाबरोबर तटबंदीच्या गार, दगडी पाठवणार उठलेले दहिवराचे पाणथेंब ! निशाण चौथऱ्या–चौथऱ्यांच्या पायतळी धुमसत धूरफेक करणाऱ्या, आंब्याच्या आणि बाभळीच्या लाकूड-गाठी ! ऊनतापीच्या हंगामात दूरवर डोंगरपायथ्याशी आमच्या प्राणप्रिय कुणब्यांनी पेटविलेले शिवारातले रानतरवे ! आंब्याच्या चिंचेच्या घेरांखाली रवंथ करीत विसावलेली जनावरे ! एक ' राजा ' म्हणू नव्हे, ' एक सेनापती ' म्हणून नव्हे, एक ' शिलेदार ' म्हणून नव्हे—एक ' माणूस ' म्हणून आमचं या मातीशी असलेलं नातं !! माणसाचं मातीशी काही नातं असतं काय ? होय माणसाचं मातीशीच असतं नातं. " मातीत मरणारे कैक असतात. मातीसा मरणारे फार थोडे–मोजकेच असतात !!! " लाभेल आम्हास हे भाग्य ??

( स्वगताचा एक टप्पा संपतो. राजे चौफेर बघतात. मग )

( टप्पा, लय दुसरी )

आखरीच्या भेटीत आबासाहेब आम्हास पन्हाळ्यावर म्हणाले–जीवाच्या देठानं " लेकरा, एवढीशी सादिल असते–डोळ्याची पापणी. पण ती कस्पटसुद्धा घेत नाही कधी ऐन वादळवाऱ्यातही ! भुलू नका बाळ शंभू कधीच की, " अगोदर मरतात ती मनं आणि मग मरतात ती माणसं ! " ( निर्धारानं, नाही आबासाहेब कधीच नाही भुलणार आम्ही तुमचे हे बोल. पाठीवर पडणारे पाय पेलत आले हे दगडी कासव हयातभर—आज त्याच्या छतावरचे आभाळ कोसळून पाठीवर पडले तरीही त्याची ' जाळलेली ' नजरसुद्धा आखरी श्वासापावेतो जोडलेली राहील ती तुमच्याच ' चरणांठायी '. आबासाहेब फक्त तुमच्याच चरणाठायी

( तिसरी लय )

थोरल्या आऊ, धाराऊ, तुम्ही मायेचं लिंपण घालून जपलेला, पोसलेला हा जीव तुमच्या बोलांना, दुधाला कधीच नाही लागू देणार ' डाग '—थोरल्या

भाऊ, तुम्ही तर म्हणत आलात—“ पुत्रमुखदर्शनानं ‘ आऊपण ’ धन्य होतं पण नातवाच्या मुखदर्शनानं अवघं ‘ स्त्रीपण ’ धन्य होतं. ” याक्षणी आम्ही शाबित करू की तुम्ही म्हणजे साक्षात जगदंबेला पडलेलं ‘ स्त्रीरुपातलं ’ गोमटं “ स्वप्न ” होतं. आणि—आणि आम्ही म्हणजे त्या स्वप्नानं पाहिलेलं ‘ पुरुष रुपातलं रोकडं सत्य !! ’

( चौथी लय )

आमच्या प्राणप्रिय श्रीसखी—महाराणी–येसूबाई–छे—“ येसू ” आम्हासमोर हुलग्याचं वाफरतं, गरम माडगं ठेवताना तुम्ही हमेश म्हणत आलात—“ आमचं तर बांधलं आहे—रानवाऱ्याशी बाशिंग ” ऐकताय आम्ही सांगतो आहोत ते ! नीट निसबतीनं ऐका—आमच्याशी ‘ पत्नी ’ हे नातं वगळता उरल्यासुरल्या तुम्ही आहात त्या साक्षात ‘ शिवकन्या ’—आमच्या आबासाहेबांच्या कन्या !! आमच्याशी—रानवाऱ्याशी बांधलेल्या त्याच बाशिंगाची याद ठेवून जिद्दीनं आमच्या शाहूबाळांच्या मस्तकी राजमंदिल बांधाल ? कराल–कराल आमचं हे एवढं आखरीचं “ मागणं ” पुरं ? या इंद्रायणी आणि भीमा यांच्या काठचा रानवाराच घालतो आहे हे ‘ मागणं ! ’ शाहूबाळ, मथुरेत आबासाहेबांच्या पायांना हात लावून आम्ही एकलेच मागे राहिलो हे एवढेच फक्त ध्यानी ठेवा.

आमच्या आठही मासाहेबांपैकी जन्मदात्या मासाहेब तर आम्ही नीट पाहिल्याच नाहीत ! राहिलेल्या सातांपैकी याक्षणी सामोऱ्या येतात त्या दोन—फक्त दोनच ! पहिल्या–सती गेलेल्या मासाहेब. मासाहेब पुतळाबाईसाहेब. सतीच्या चितेवर त्या चढल्या एकल्या—आबासाहेबांसाठी ! त्यांना चूड देण्यासाठी आम्ही गेलो तेव्हा त्या म्हणाल्या—चितेवरून–“ बाळराजे, आमचे हे ‘ रूप ’ बरे ध्यानी ठेवा ! ” मासाहेब, तुमच्या त्या बोलांचे ‘ रूप ’ कसे कोरीव लेण्यासारखे कोरलेले आहे आमच्या काळजावर !! कसे विसरू आम्ही ते ?

दुसऱ्या मासाहेब ? ( ऊसासतो ) आमच्या खिलाफ कटावच कटाव रचणाऱ्या (विलक्षण तळमळतो ) ‘ सावत्रपणाच्या मोहजालात गुरफटून राजहवसेनं पेटलेल्या ! होय–तुम्हासही या मराठी दौलतीच्या अभिषिक्त राजाचा याक्षणी लेवार ‘ अदबमुजरा ’–आमच्या रामराजांच्या मातुश्री म्हणून–आबासाहेबांच्या नावे कुंकू कपाळी लेवत होता म्हणून. आमच्या सरलष्कर हंबीरमामांच्या

भगिनी होता म्हणून !!!

( हंबीररावांचे नावाबरोबर, टेपवर पार्श्वभूमीला " धाऽकलं–धाऽकलं " नुसता शब्द वाजतो तो ऐकताच सैरभैर झालेले राजे इकडे तिकडे ब लागतात. " धाकलं—ऽ धाकलंऽ "—होऽय खूऽप खूऽप थोरले होतात याक्षणी — या क्षणीही–तुम्हाला आम्ही ' मुजरा ' म्हटलं तरी मानवलं नसतं तुम्हाला, एवढे थोरले होतात !!

( लय पाचवी )

समर्थऽ—समर्थ–आबासाहेबांच्या ठायीच मानले आम्ही तुम्हाला !

( पार्श्वभूमीला जय जय रघुवीर समर्थ व हर हर महादेव असे अस्पष्ट घोष ऐकू येतात )

तुम्ही आबासाहेबांची याद देत खलित्यात आम्हास म्हणालात–" शिवरायाचा आठवावा प्रताप–शिवरायाचा आठवावा साक्षेप–भूमंडळी–याहून–याहून विशेष ते करावे. जीवित तृणवत मानावे. " तृणवत ? समर्थ, तुमच्या त्या तृणाच्या पात्यालाही असतं ' भय ' जळून भस्मसात होण्याचं ! याक्षणी–याक्षणी आम्हाला तेही उरलेलं नाही. कारण–कारण—

( टप्पा शेवटचा–पूर्ण अभिनय अविष्काराचा )

समर्थ, आम्हाला दिसतो आहे आई जगदंबेचा मांडलेला केवढा तरी मोठ्ठा गोंधळ. उभ्या मावळ मुलुखभर मांडला आहे त्याचा " गोंधळ चौक ! " ऐकू येताहेत संबळ तुणतुण्यांचे नादच नाद हरहर महादेवाच्या किलकाऱ्याच — किलकाऱ्या.

( पाठीमागे तसे वातावरण, संगीत व घोषणा तयार होते. इंद्रायणी आणि भीमा यांच्या संगमावरचा दिवा उजळतो. )

समर्थ, आबासाहेब, थोरल्या आऊ, धाराऊ, श्रीसखी, हंबीरमामा, आमच्या पिछाडीला दौडणाऱ्या असंख्यात मावळ वीरांनो, आमच्या उभ्या देहाचा झाला आहे आज एक आभाळाएवढा उंचच उंच पाचपेडी–पाजळता, पेटता पोत !!! पोताला कसलं अग्नीचं–हत्याराचं भय ?

पाठीमागे पूर्ण संगीत निनादते आहे—एवढे की प्रवेशाच्या सुरुवातीच्या नमाजी वातावरणाचे प्रेक्षकांस पूर्ण विस्मरणच व्हावे. )

आमच्या देहाचा पाचपेडी पाजळलेला पोत !! हा समोरचा इंद्रायणी आणि

भीमा यांचा ' पावन संगम ! ' याच इंद्रायणीच्या काठी ' ज्ञानोबांनी ' आपली ' गीता ' रचली—ज्ञानेश्वरी. याच इंद्रायणीच्या काठी तुकोबांनी आपली 'गाथा' गुंफली—भगवत—गाथा. त्याच इंद्रायणी आणि भीमा यांच्या पावन संगमावर आज आमच्या देहातून कोसळत्या रक्ताच्या थेंबाथेंबातून आम्हीही लिहितो आहोत एक ' राजगाथा ! ' रचतो आहोत एक सार्थ काव्यग्रंथ— " शंभुभूषणम् ! " ह्या देहाचा हा पाचपेडी पाजळला पोत समोरच्या इंद्रायणी आणि भीमा यांच्या पावन संगमात डुबवला जातो आहे.

—जगदंब

—जगदंब

( पाठची वात्सल्य पूर्ण थांबते. राजांवरचेही दिवे जातात. एक ज्योत रंगमंचावर प्रकाशत असलेल्या संगमात डुबविली जाते आहे असे दिसते. स्पष्ट व लक्षात राहील असा ' चर्रर ' — ' जगदंब ' असा एकमेकात मिसळलेला आवाज टेपवर येतो !! भैरवी सूर निनादतात. )

अंक समाप्त

" शुभं भवतु "

ग्रंथ, वाचनालय शाखा.
क्र. 20283 नों. दि 9.3.98
वि नाटक ... क्र. ....................
IRBK-0120243
IRBK-0120243